दंडकारण्य शैक्षणिक व सांस्कृतिक विकास संशोधन संस्था
गडचिरोली द्वारा संचालित

**श्री गोविंदराव मुनघाटे कला व विज्ञान महाविद्यालय कुरखेडा, जिल्हा गडचिरोली**

वार्षिक २०२४-२५

# मृदगंध



**आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष विशेष**

# महाविद्यालयाच्या गौरवमुद्रा




गोंडवाना विद्यापीठ आंतरमहाविद्यालयीन वार्षिकांक २०२३-२४ स्पर्धेतील द्वितीय क्रमांकाचा पुरस्कार स्वीकारताना प्राचार्य डॉ. राजाभाऊ मुनघाटे व संपादक मंडळ


SPIC MACAY

MEMORANDUM OF UNDERSTANDING

महाविद्यालयाचा स्पिक मैकेसोबत केलेला सामंजस्य करार




'पर्यावरणातील बदल' या आंतरराष्ट्रीय परिषदेत प्राचार्य व उपप्राचार्य यांचा सहभाग




'रीफॉर्म २०२४' च्या आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये माननीय प्राचार्यांचा सहभाग

दंडकारण्य शैक्षणिक व सांस्कृतिक विकास संशोधन संस्था गडचिरोली द्वारा संचालित

**श्री गोविंदराव मुनघाटे कला व विज्ञान महाविद्यालय कुरखेडा, जि. गडचिरोली**

# मृदगंध

वार्षिक २०२४–२५



आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष विशेष

# मृद्गंध

वार्षिक २०२४–२५



**श्री गोविंदराव मुनघाटे कला व विज्ञान महाविद्यालय कुरखेडा, जि. गडचिरोली**


**मुख्य संपादक**
प्रा. डॉ. रवींद्र विखार

**संपादक मंडळ**
प्रा. डॉ. दशरथ आदे
प्रा. डॉ. नरेंद्र आरेकर
प्रा. डॉ. भाष्कर तुपटे
प्रा. डॉ. गुणवंत वडपल्लीवार
श्री. सतीश मुनघाटे
श्री. आशिष बगमारे
कु. कल्याणी उईके
श्री. श्रेयश टेंभूर्णे



**प्रकाशक**
प्राचार्य डॉ. राजाभाऊ मुनघाटे

**मांडणी / निर्मिती**
मलय ग्राफिक्स, नागपूर

**मुखपृष्ठ सौजन्य** : Pinterest.com

# दंडकारण्य शैक्षणिक व सांस्कृतिक विकास संशोधन संस्था, गडचिरोली



**श्रद्धेय गोविंदराव मुनघाटे**
संस्थापक अध्यक्ष



**श्रद्धेय कमलताई मुनघाटे**
संस्थापक सचिव

## कार्यकारी मंडळ



**प्राचार्य डॉ. राजाभाऊ मुनघाटे**
अध्यक्ष



**मान. देवाजी नरुले**
उपाध्यक्ष



**डॉ. प्रमोद मुनघाटे**
सचिव



**मान. अनिल मुनघाटे**
सहसचिव



**मान. पांडूरंग पा. म्हशाखेत्री**
सदस्य



**मान. डॉ. सुरेश लडके**
सदस्य



**मान. सुग्रीव दुधमोचन**
सदस्य



**मान. नामदेव बानबले**
सदस्य



**मान. सौरभ मुनघाटे**
सदस्य

## प्राध्यापक वृंद



**प्रा. किशोर खोपे**
(उपप्राचार्य) राज्यशास्त्र विभागप्रमुख



**प्रा. डॉ. अभय साळुंखे**
(उपप्राचार्य) सूक्ष्मजीवशास्त्र विभागप्रमुख



**प्रा. डॉ. दशरथ आदे**
इतिहास विभागप्रमुख



**प्रा. डॉ. अनिल भोयर**
ग्रंथालय विभागप्रमुख



**प्रा. डॉ. नरेंद्र आरेकर**
मराठी विभागप्रमुख



**प्रा. हेमलता उराडे**
मराठी विभाग



**प्रा. डॉ. अमित रामटेके**
इंग्रजी विभाग



**प्रा. डॉ. संजय महाजन**
अर्थशास्त्र विभागप्रमुख



**प्रा.डॉ. प्रमेश दाणी**
वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख



**प्रा. डॉ. राखी शंभरकर**
वनस्पतीशास्त्र विभाग



**प्रा. डॉ. गणेश सातपुते**
रसायनशास्त्र विभागप्रमुख



**प्रा. तृप्ता वाकडे**
सूक्ष्मजीवशास्त्र विभाग



**प्रा. डॉ. दीपक बन्सोड**
प्राणिशास्त्र विभागप्रमुख



**प्रा. डॉ. भाष्कर तुपटे**
भौतिकशास्त्र विभागप्रमुख



**प्रा. डॉ. निकेश लोखंडे**
भौतिकशास्त्र विभाग

## प्राध्यापक वृंद



प्रा. डॉ. रवींद्र विखार
समाजशास्त्र विभागप्रमुख



प्रा. डॉ. संदीप निवडंगे
रसायनशास्त्र विभाग



प्रा. डॉ. गुणवंत वडपल्लीवार
भूगर्भशास्त्र विभागप्रमुख



प्रा. डॉ. हेमंत मेश्राम
प्राणिशास्त्र विभाग



प्रा. धनराज लंजे
रसायनशास्त्र विभाग



प्रा. डॉ. सोनल भोयर
गणित विभाग



प्रा. डॉ. कौस्तुभ राऊत
इंग्रजी विभाग



प्रा. रूपाली तोंडरे
इलेक्ट्रॉनिक्स विभाग



श्री. शैलेश हडप
गणित विभाग



प्रा. तिरूपती बोरकर
जीवशास्त्र विभाग



प्रा. सुभाष घोंगडे
भौतिकशास्त्र विभाग



प्रा. हरीश बावनथडे
मराठी विभाग

# शिक्षकेतर कर्मचारी वृंद



**श्री. मधुकर बोबाटे**
मुख्य लिपीक



**श्री. रत्नाकर वासेकर**
वरिष्ठ लिपीक



**श्री. मंगेश मुनघाटे**
कनिष्ठ लिपीक



**श्री. राजेंद्र काचीनवार**
ग्रंथालय परिचर



**श्री. सतिश मुनघाटे**
प्रयोगशाळा सहाय्यक



**श्री. गजानन भोयर**
प्रयोगशाळा परिचर



**श्री. आशिष बगमारे**
प्रयोगशाळा परिचर



**श्री. कैलास जांभुळकर**
प्रयोगशाळा परिचर



**श्री. सुभाष चिकराम**
प्रयोगशाळा परिचर



**श्री. उज्ज्वल मोरे**
प्रयोगशाळा सहाय्यक



**श्री. अजय वासनिक**
प्रयोगशाळा सहाय्यक



**श्री. नोमराज गोन्नाडे**
शिपाई



**श्री. राजेश्वर गुडेकर**
शिपाई



**श्रीमती उषाताई गजभिये**
परिचारिका

# गोंडवाना विद्यापीठाच्या सत्र २०२३-२४ च्या गुणवंत यादीतील महाविद्यालयाचे विद्यार्थी



**चक्रधर भोयर**
बी.एस्सी. अंतिम वर्ष



**कुणाल कुमरे**
बी.एस्सी. अंतिम वर्ष

# महाविद्यालयाच्या प्लेसमेंट सेलद्वारे निवड झालेले विद्यार्थी



**तुषार सहारे**



**निखिल लेदे**



**अभिलेश पिलारे**

# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोलीच्या विविध क्रीडा/खेळ संघाचे अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेत प्रतिनिधीत्व केलेले महाविद्यालयाचे गुणवंत खेळाडू (कलर होल्डर)



**हरिश माणिकराव नन्नावरे**
सॉफ्टबॉल व बॉल बॅडमिंटन



**भूषण दादाराम डोकरमारे**
सॉफ्टबॉल



**अस्पाक सिराज शेख**
सॉफ्टबॉल व बॉल बॅडमिंटन



**लोचन मोहन झोडे**
सॉफ्टबॉल



**दर्शना हरिदास मडावी**
सॉफ्टबॉल



**साक्षी धर्मराव कोडापे**
सॉफ्टबॉल



**साहिल दीपक पेंदाम**
बॉल बॅडमिंटन



**कल्याणी विठ्ठल उईके**
बॉल बॅडमिंटन



**भूमिका शालिक वट्टी**
बॉल बॅडमिंटन



**लक्ष्मी कोडापे**
मिनी गोल्फ



**अमन दिगांबर तुलावी**
हॉकी



**पद्म भूषण**
**शाम बेनेगल**
थोर चित्रपट दिग्दर्शक



**पद्मश्री**
**मनोज कुमार**
प्रसिद्ध चित्रपट अभिनेते



**पद्मश्री**
**पंकज उधास**
प्रसिद्ध गझल गायक



**पद्म भूषण**
**उस्ताद राशिद खान**
प्रसिद्ध शास्त्रीय गायक



**पद्मश्री**
**मारोती चितमपल्ली**
प्रसिद्ध पक्षीतज्ज्ञ



**पद्मविभूषण रतन टाटा**
प्रसिद्ध उद्योजक



**पद्मविभूषण झाकीर हुसैन**
प्रसिद्ध तबला वादक

यांच्यासह
स्वकर्तुत्वाने समाजाचे विविध क्षेत्र उजळून काढीत
इतरांचे आयुष्य प्रकाशमान करता - करता
वर्तमानातून देह रुपाने निखळलेल्या विभूतींना
'मृदगंध' ची भावपूर्ण आदरांजली

## महाविद्यालय विकास मंडळ (CDC)

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. डी. बी. नरुले | अध्यक्षांचे प्रतिनिधी |
| २. | डॉ. प्रमोद मुनघाटे | सचिव |
| ३. | प्रा. पी. एस. खोपे | विभागप्रमुख |
| ४. | डॉ. आर. व्ही. विखार | शिक्षक प्रतिनिधी |
| ५. | डॉ. एन. व्ही. लोखंडे | शिक्षक प्रतिनिधी |
| ६. | डॉ. कु. आर. बी. शंभरकर | शिक्षक महिला प्रतिनिधी |
| ७. | श्री. एम. ए. मुनघाटे | शिक्षकेतर प्रतिनिधी |
| ८. | प्राचार्य सी. एल. डोंगरवार | शिक्षण क्षेत्र प्रतिनिधी |
| ९. | श्री. रामभाऊ वैद्य | उद्योग क्षेत्र प्रतिनिधी |
| १०. | श्री. केशवराव गुरनुले | समाजसेवा क्षेत्र प्रतिनिधी |
| ११. | डॉ. अभय सोळुंके | IQAC समन्वयक |
| १२. | अध्यक्ष विद्यार्थी परिषद | विद्यार्थी प्रतिनिधी |
| १३. | सचिव विद्यार्थी परिषद | विद्यार्थी प्रतिनिधी |
| १४. | डॉ. आर. जी. मुनघाटे | सदस्य, सचिव |



# गोंडवाना विद्यापीठ गीत

गोंडवाना नव तपोवन आदिजन वन परिसरी
विश्वविद्यापीठ हे ज्ञानार्चना या मंदिरी ।।धृ।।

स्रोत आदिम संस्कृतीचा या प्रदेशी निर्मळ
शास्त्र, विद्या अन् कलेतून अमृताचे ओहळ
त्या झऱ्यांना करुनि विकसित मिळवू विद्यासागरी ।।१।।

बन्धुता, स्वातंत्र्य, समता, न्यायनीतीला जपावे
विश्वशांतीस्तव नवे आव्हान हे पेलून घ्यावे
उंच, उन्नत झेप घेतिल छात्र इथले अंबरी ।।२।।



# प्राचार्यांचे मनोगत...

प्रिय वाचकहो,

आमच्या विद्यार्थ्यांचा लेखनाविष्कार 'मृद्‌गंध' च्या रूपाने आपल्या हाती देताना मला मनस्वी आनंद होत आहे. श्रद्धेय गोविंदराव मुनघाटे साहेबांनी कुरखेडा सारख्या अतिदुर्गम आदिवासीबहुल भागात लावलेले हे महाविद्यालयरूपी रोपटे ३४ वर्षांचे झाले; ते विविधांगाने बहरले, समृद्ध झाले. कला व विज्ञान शाखांतून शिक्षण घेऊन बाहेर पडलेले विद्यार्थी समाजाच्या विविध स्तरांवर आपले कर्तृत्व सिद्ध करीत असताना त्यांच्या सिद्धतेत आमचे 'काही तरी' असल्याचे समाधान मनात बाळगून आणि विद्यार्थ्यांसाठी त्याहून अधिक काही करण्याची आकांक्षा उरात घेऊन हे महाविद्यालय मार्गक्रमण करीत आहे. समाज, विद्यापीठ, शासन आयोजित अनेक उपक्रमांतील विद्यार्थ्यांचा सहभाग त्यांच्या सर्वांगीण विकासाला पोषक ठरावा म्हणून महाविद्यालयाच्या स्तरांवर अनेक उपक्रमांचे सातत्यपूर्ण आयोजन केले जातेच, पण आयुष्याच्या संक्रमणावस्थेतून जाणाऱ्या तरुणांच्या अंतर्मनांचा मागोवा घेण्याचे साधन म्हणून दरवर्षी महाविद्यालयाचा हा 'मृद्‌गंध' दरवळतो आहे. मागील अनके वर्षांपासून त्या त्या शैक्षणिक वर्षात घडणाऱ्या महत्वपूर्ण घटना, त्यांचे समाजजीवनावर व त्यातही संवेदनशील अशा तरुणाईच्या मनावर पडणारे पडसाद समजून घेण्याच्या दृष्टीने 'मृद्‌गंध' विशेषांकाच्या रूपाने काढण्याचा पायंडा आम्ही निर्माण केला आहे. जिल्हा, विद्यापीठ, राज्य अशा विविध स्तरांवर अनेक पुरस्कार मिळवून विद्यार्थ्यांच्या या लेखनाविष्काराने आपले साहित्यमूल्य, विचारमूल्य अधोरेखित केलेले आहे. अनेक वाचकांना 'मृद्‌गंध'च्या प्रकाशनाची लागलेली आतुरताच वार्षिकांकाचे महत्व विशद करते.

संयुक्त राष्ट्रसंघाने २०२५ हे 'सहकार वर्ष' म्हणून घोषित केले असल्याने आपल्या भवतालाशी विद्यार्थी किती सजग आहेत? या वर्तमानात त्यांचे सहकार विषयक चिंतन किती सखोल आहे याचे दर्शन या 'सहकार विशेष' या अंकातून घडावे, ही माफक अपेक्षा आहे. सध्या महाविद्यालयीन शिक्षण घेणारी विद्यार्थ्यांची पिढी ही मोबाईलच्या युगात जन्माला आलेली असून तंत्रज्ञानाच्या अंगा-खांद्यावर वाढलेली आहे. मोबाईलच्या कॅमेऱ्याने सेल्फी काढण्याची सोय केल्याने आजूबाजूला माणसं उभी असतानाही फोटो काढण्यासाठी त्यांच्या हातात मोबाईल न देता स्वतःच स्वतःची फोटो काढण्याची मनोवृत्ती तरुणांमध्ये वाढत-रुजत सेल्फीशवृत्ती उजागर होत आहे. 'एक मेका साह्य करू, अवघे धरू सुपंथ' या संतवचनांनुसार झालेल्या मानवी समाजाच्या प्रगतीचा प्रवास सहकारतत्वाने सुदृढ केला आहे. याचे स्मरण तरुणाईला व्हावे आणि आपल्या जिल्ह्यातील, राज्यातील, देशातील सहकार क्षेत्राची माहिती त्यांच्या प्रतिभेतून चिंतनातून तरुणाईच्या भावना व विचारांचे दर्शन या अंकातून होईल. हा उदात्त हेतू या वार्षिकांकामागे आहे.

आदिवासीबहुल भागातील आमचे महाविद्यालय संस्था, कर्मचारी, विद्यार्थी यांच्या कर्तृत्वाने एक गणमान्य महाविद्यालय म्हणून पुढे येत आहे. महाविद्यालयाचे नॅकद्वारे पूनर्मूल्यांकन झाले असून २.९९ गुण घेऊन विद्यापीठातील नामांकित दर्जा प्राप्त करणारे महाविद्यालय ठरले आहे. हे संस्थेचे पदाधिकारी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विशेषतः आज्ञाधारी विद्यार्थी यांच्या सहकार्याचे फलित आहे. सेवा, संस्कृती, संशोधन अशा विविध क्षेत्रांतील विद्यापीठाचे आदर्श महाविद्यालय, आदर्श प्राचार्य पुरस्कार, उत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी, उत्कृष्ट रासेयो पथक, उत्कृष्ट स्वयंसेवक पुरस्कार, उत्कृष्ट वार्षिकांकाचे सातत्याने मिळणारे पुरस्कार, महाराष्ट्र शासनाचे ग्रीन कॉलेज अवार्ड, राजीव गांधी गतिमानता पुरस्कार, राष्ट्रपिता महात्मा गांधी व्यसनमुक्ती सेवा पुरस्कार, गडचिरोली जिल्हा गौरव पुरस्कार, अशा अनेक पुरस्कारांसह विविध स्पर्धांमधील विजय, राज्य, राष्ट्र आणि आंतरराष्ट्रीय परिषदांमधील सहभाग सातत्याने वाढत आहे याचा आनंद असला तरी समाधान मात्र नाही. विद्यापीठाच्या काही सुवर्ण पदकांवर आमच्या विद्यार्थ्यांनी उमटवलेली नाममुद्रा अधिक वाढत राहील ही अपेक्षा करतो. तसेच वार्षिकातील लेखनाविष्कार आस्वादताना 'मृद्‌गंध' मध्ये लिहिणारे विद्यार्थी लेखनकलेच्या प्रांगणात लौकिक प्राप्त साहित्यिक म्हणून चमकतील तसेच सहकार हा केवळ लिहिण्याचा आणि वाचण्याचाच विषय नव्हे तर जगण्यात उतरविण्याचा विषय आहे म्हणून आमचे काही विद्यार्थी सहकार क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाने झळकावेत अशी आशा बाळगतो, सर्वांना शुभेच्छा देतो. प्रा. डॉ. रवींद्र विखार आणि संपादन मंडळाने नियोजनपूर्वक या वार्षिकांकाचे संपादन केले, मलय ग्राफिकचे संचालक श्री. माधव लोखंडे यांनी सुबक छपाई केली याबद्दल त्यांचेही मनःपूर्वक अभिनंदन!

धन्यवाद!

**डॉ. राजाभाऊ मुनघाटे**



# संपादकीय...

वाचक मित्रांनो,

२०२४-२५ या शैक्षणिक सत्रातील महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी शब्दबद्ध केलेला विचाराविष्कार 'मृद्‌गंध' आपल्या हाती देताना विशेष आनंद होत आहे. महाविद्यालयीन जीवन म्हणजे उत्साह, उन्मेदासह सृजनाचा काळ समजला जातो. हे दिवस सळसळत्या तरुणाईने भारलेले आणि अनेक गोष्टींतील गंमत अनुभवतांना गंभीरपणे चिंतन-मनन करण्याचेही असतात.

आमच्या महाविद्यालयाचे प्रेरणास्रोत दंडकारण्य शिक्षण संस्थेचे कुलपुरुष, नवनिर्मित गडचिरोली जिल्हा गौरवगीताचे रचयिता कवी, लेखक, कलावंत व कलासक्त श्रद्धेय गो. ना. उपाख्य गोविंदराव मुनघाटे साहेबांच्या कलात्मकतेचा वारसा जपणारे हे महाविद्यालय आणि 'मृद्‌गंध' म्हणजे तरुणाईच्या लेखनाविष्काराचे हक्काचे व्यासपीठ होय.

विद्यार्थीरूपी हिऱ्यांवर पैलू पाडण्याचे काम सातत्याने करताना व्यक्तिमत्व विकासासाठी एक महत्वपूर्ण कला असलेल्या लेखनकलेच्या माध्यमातून पुढे प्रतिभासंपन्न कवी, लेखक, साहित्यिक घडावे यासाठी 'मृद्‌गंध' ही एक मोठी संधी ठरते आहे. महाविद्यालयीन तरुणाईकडे काहीसे साशंक नजरेनं पाहिलं जात असताना अनेक विद्यार्थी देश-विदेशातील विविध क्षेत्रात आणि समाजात घडणाऱ्या बऱ्यावाईट घटनांचे अवलोकन आणि विचारमंथनही करीत असतात. तसेच त्यावरील क्रिया प्रतिक्रिया वेगवेगळया माध्यमातून व्यक्त करीत असतात. यादृष्टीने 'मृद्‌गंध' हे एक उत्तम माध्यम ठरते आहे.

संयुक्त राष्ट्रसंघाने २०२५ हे वर्ष '**सहकार वर्ष**' म्हणून जाहीर केलेले आहे. त्याला अनुसरून 'सहकार' हा मुख्य विषय घेऊन अनेक लेख, कविता आमच्या विद्यार्थ्यांनी लिहिल्या आहेत. ''बिना सहकार नहीं उद्धार'' हे सहकाराचे मूलमंत्र आमच्या विद्यार्थ्यांच्या लेखांतून प्रतिबिंबित होताना दिसून येते.

याशिवाय विद्यार्थ्यांची प्रतिभा, आवडी-निवडी आणि भाव-भावनांनुसार लेख, कविता, संकलित माहिती देण्याचे आवाहन करण्यात आले होते, हे सर्व लेखन साहित्य मराठी, हिंदी व इंग्रजी अशा विभागवार वर्गीकरणातून या अंकात प्रकटले आहेत. याशिवाय महाविद्यालयातील काही विभागांच्या उपक्रमांचा विभागप्रमुखांनी अहवालाच्या रूपाने सादर केलेला दृष्टीक्षेपही इथे समाविष्ट केला आहे.

'मृद्‌गंध'चा स्वभाव, रूप आणि स्वरूप हे महाविद्यालयाचे कल्पक, कलासक्त प्राचार्य, डॉ. राजाभाऊ मुनघाटे यांच्या संस्काराचा भाग आहे. त्यांच्या कल्पक सूचना व मार्गदर्शनामुळेच हा अंक पूर्णत्वास जाऊ शकला. महाविद्यालयाचे उपप्राचार्य पी. एस. खोपे आणि उपप्राचार्य प्रा. डॉ. अभय साळूंके यांचेही सहकार्य लाभले. संपादक मंडळातील माझे मुख्य सहकारी प्रा. डॉ. दशरथ आदे, प्रा. डॉ. नरेंद्र आरेकर व प्रा. डॉ. भाष्कर तुपटे यांनी वार्षिकांक निर्मितीच्या प्रत्येक टप्प्यावर समर्थपणे साथ दिली. तसेच प्रा. डॉ. गुणवंत वडपल्लीवार, श्री. सतीश मुनघाटे, श्री. आशिष बगमारे आणि विद्यार्थी प्रतिनिधी श्री. श्रेयश टेंभूर्णे व कु. कल्याणी उईके या सहकाऱ्यांचे आणि मलय ग्रॅफिक्स नागपूरचे श्री. माधवजी लोखंडे यांचे वार्षिकांक सिद्धीस मौलिक योगदान लाभले. या सर्वांप्रति कृतज्ञता व्यक्त करतो आणि या सत्रात काळाच्या पडद्याआड गेलेले विविध क्षेत्रातील नामवंत यांच्यासह जीवनाची विविध अंग आपल्या कर्तृत्वाने समृद्ध करणाऱ्या सर्वांच्या कार्यास व स्मृतीस 'मृद्‌गंध' समर्पित करतो.

धन्यवाद !

**प्रा. डॉ. रवींद्र विठोबा विखार**

# अनुक्रमणिका


**सहकार विभाग विशेष**

१. आंतरराष्ट्रीय सहकारिता वर्ष २०२५ ...२
२. भारतातील सहकार चळवळीचा प्रारंभ व विकास ...४
३. महाराष्ट्रातील सहकार ...५
४. सहकार क्षेत्रातील ... अरविंद सावकार पोरेड्डीवार ...७
५. सहकारातून... आम्ही आमच्या आरोग्यासाठी ...९
६. सृष्टी : नवी दृष्टी ...१३
७. सहकार क्षेत्रातील दीपस्तंभ ...१६
८. ग्रामीण भागातील बचत गट व स्वयंरोजगार गट ...१८
९. सहकार क्षेत्रापुढील आव्हाने व उपाय ...२०

**सहकार कविता**

१. गाथा सहकाराची ...२३
२. सहकाराचे मंत्र ...२३
३. सहकार दीप जळू दे... ...२४
४. स्वतःसाठी नाही, सगळ्यांसाठी ...२५
५. हातात हात, बचतीची बात ...२५
६. गोड स्वप्नांची गोड वाट सहकारी साखर कारखाने ...२६
७. बचत गटाची शान (ग्रामीण खेड्यांची जान) ...२६

**मराठी विभाग**

१. तबल्याचा बादशाह झाकीर हुसेन ...२८
२. भारतातील महाकुंभ ...३०
३. महिलांचे रक्षण करणारा पोस्को कायदा ...३१
४. भौतिकशास्त्र : विश्वाचे रहस्य उलगडणारा ...३३
५. जिद्दी – अरुणिमा सिन्हा ...३४
६. तरुणाई व व्यसनाधीनता ...३७
७. सकारात्मक व नकारात्मक विचार ...३८

**मराठी कविता**

१. आठवणी त्या रक्ताच्या (आतंकवादाच्या छायेत) ...३९
२. कृत्रिम बुद्धिमत्ता : नवयुगाचा प्रकाश ...४०
३. ग़ज़लसम्राट पंकज उधास ...४०
४. तंबाखू खाऊ नको ...४१
५. ती हसते पण काहीच म्हणत नाही! ...४१
६. पण लक्षात कोण ठेवतं? ...४२
७. भौतिकशास्त्र : शास्त्रज्ञांचा अनोखा प्रकाश ...४२
८. माझ्या घरातील आरसा ...४३
९. रसायनशास्त्र : घटकांचे जादूई खेळ ...४३
१०. शिवरायांचा इतिहास ...४४
११. सुनीता यांच्या मोहिमेतून... ...४४
१२. जगायचंय ...४५
१३. स्वाभिमानाचा आवाज ...४५
१४. आजच्या विठोबाची वारी ...४६
१५. कॉलेजची वाट आणि NSS ची साथ ...४६

**हिंदी विभाग**

१. अंतरराष्ट्रीय ग्लेशियर संरक्षण वर्ष २०२५ ...४८
२. क्वांटम विज्ञान और... ...४९
३. नशा ...५०
४. महिला सशक्तिकरण ...५१
५. जीवन हर दिन एक नया खुला पन्ना है ...५२

**हिंदी कविता**

१. भारतीय समाज और स्त्री ...५३
२. प्लास्टिक मुक्त करे ये भूमि ...५३
३. भारत कुमार की गाथा ...५४
४. एक चीज ...५४

**English Section**

1. Human Rights Violation... ...46
2. Maruti Chitampalli ...57
3. Bookies ...58
4. The Comedy King : Ashok Saraf(Mama) ...59
5. Psycological Facts ...60
6. Positive Approach ...60
7. SOCIAL MEDIA ...61
8. The Bermuda Triangle Mystery ...62
9. OLD IS GOLD ...63
10. THE VALUE OF TIME ...63
11. A Friendly Father : The Ultimate Blessing ...64

**English Poems**

1. HOPE ...65
2. I Promise ...65

**अहवाल विभाग**

१. उन्नत भारत अभियान ...६७
२. राष्ट्रीय सेवा योजना ...६९
३. शारीरिक शिक्षण विभाग ...७५
४. ग्रंथालय विभाग ...७८
५. रोजगार मार्गदर्शन केंद्र ...८०
६. सांस्कृतिक विभाग ...८२
७. महात्मा गांधी अध्ययन केंद्र ...८४
८. टोबॅको अवेअरनेस सेंटर ...८६
९. महिला अध्ययन केंद्र व लोकसंख्या शिक्षण ...८७
१०. मानव्यशास्त्र विभाग ...९०
११. राष्ट्रीय सांप्रदायिक सद्भावना विभाग ...९२
१२. सहल विभाग ...९३
१३. सायंन्स स्टडी फोरम ...९४



# सहकार विभाग



# आंतरराष्ट्रीय सहकारिता वर्ष २०२५

**श्रेयस टेंभूर्णे**, बी.एस्सी. अंतिम

**सहकारिता** ही मानव समाजाच्या उन्नतीसाठी एक महत्त्वाची संकल्पना आहे. जेव्हा अनेक लोक एकत्र येऊन आपापल्या गरजा पूर्ण करण्यासाठी, सामाजिक, आर्थिक, व शैक्षणिक उद्दिष्टांसाठी सहकार्य करतात, तेव्हा सहकार प्रणाली घडते. संयुक्त राष्ट्र संघटनेने २०२५ हे वर्ष *आंतरराष्ट्रीय सहकारिता वर्ष* म्हणून साजरे करण्याचे जाहीर केले आहे. यामागील मुख्य उद्देश म्हणजे जागतिक स्तरावर सहकार तत्त्वांचा प्रचार व प्रसार करणे, सहकारी संस्था व संघटनांना बळकट करणे, आणि विकासाच्या प्रक्रियेत सामान्य जनतेचा अधिकाधिक सहभाग घडवून आणणे.

सहकारितेची मूळ भावना म्हणजे 'सर्वांसाठी, सर्वांनी.' ही एक लोकशाही प्रक्रिया आहे ज्यात निर्णय प्रक्रियेमध्ये प्रत्येक सदस्याचा सहभाग असतो. भारतात सहकार चळवळीला फार मोठा इतिहास आहे. वर्ध्याचे सहकारी साखर कारखाने, अमूल दूध संघ, इत्यादी संस्था या सहकार तत्त्वांवरच उभ्या आहेत. या संस्थांनी फक्त आर्थिक सक्षमीकरणच केले नाही, तर ग्रामीण भागातल्या लोकांना रोजगार, शिक्षण व सामाजिक सन्मानही दिला.

२०२५ मध्ये जेव्हा आपण *आंतरराष्ट्रीय सहकारिता वर्ष* साजरे करत आहोत, तेव्हा हे लक्षात घ्यायला हवे की, जागतिक संकटे – जसे की गरिबी, बेरोजगारी, शिक्षणाची कमतरता, आरोग्यसेवा यामध्ये सहकार संस्थांची भूमिका अधिक प्रभावी ठरू शकते. कोरोना महामारीनंतर जगाला हे प्रकर्षाने जाणवले आहे की स्थानिक पातळीवरील सहकार्य व एकत्रित प्रयत्न हेच खऱ्या अर्थाने संकटांशी सामना करू शकतात.

सहकार्य म्हणजे एकत्र काम करणे आणि एकमेकांना मदत करणे. ही व्यवस्था समाजातील प्रत्येक घटकाला स्वावलंबी बनवण्यास आणि आर्थिक असमानता कमी करण्यास मदत करते. सहकारी संस्था शेती, बँकिंग, विपणन, गृहनिर्माण, शिक्षण, आरोग्य आणि इतर अनेक क्षेत्रांमध्ये योगदान देतात.

१. आर्थिक विकासात योगदान: सहकारी संस्था स्थानिक आणि जागतिक अर्थव्यवस्था मजबूत करतात.

२. सामाजिक समावेशन: ते समाजातील सर्व घटकांना समान संधी प्रदान करते.

३. शाश्वत विकास: सहकारी मॉडेल पर्यावरणपूरक आहे आणि दीर्घकालीन विकासाला प्रोत्साहन देते.

४. सक्षमीकरण: महिला, शेतकरी, कामगार आणि लहान व्यापाऱ्यांना स्वावलंबी होण्यास मदत करते.

आंतरराष्ट्रीय सहकार्य वर्ष २०२५ चे उद्दिष्ट: संयुक्त राष्ट्रांनी २०२५ ला आंतरराष्ट्रीय सहकार्य वर्ष म्हणून घोषित करण्यामागील अनेक उद्दिष्टे आहेत:

जागतिक स्तरावर सहकारी संस्थांची भूमिका वाढवणे.

सहकार्य आणि सामूहिक प्रयत्नांचे महत्त्व अधोरेखित करणे.

शाश्वत विकास उद्दिष्टे (SDGs) साध्य करण्यात

सहकारी संस्थांचा सहभाग मजबूत करणे.

समाजातील कमकुवत घटकांना आर्थिक आणि सामाजिकदृष्ट्या सक्षम करणे.

भारतात सहकारी चळवळीचा समृद्ध इतिहास आहे. १९०४ मध्ये सहकारी संस्थांच्या स्थापनेपासून ते आजपर्यंत, ही चळवळ ग्रामीण आणि शहरी भागात आर्थिक विकासासाठी एक महत्त्वाचे साधन राहिली आहे.

**कृषी सहकारी संस्था :** शेतकरी पतसंस्था आणि दुग्ध सहकारी संस्था शेतकऱ्यांसाठी वरदान ठरल्या आहेत.

**बँकिंग सहकारी संस्था :** सहकारी बँका ग्रामीण आणि शहरी दोन्ही भागात आर्थिक सेवा देत आहेत.

**उद्योग आणि व्यापारात सहकारी संस्था:** अमूलसारख्या सहकारी संस्था स्वावलंबनाची उदाहरणे आहेत.

या वर्षात विविध देशांमध्ये सहकारी चळवळीवर आधारित शिबिरे, कार्यशाळा, परिसंवाद, आणि चर्चासत्रांचे आयोजन केले जाईल. यामधून युवकांना सहकार चळवळीमध्ये सहभागी होण्यासाठी प्रेरणा दिली जाईल. नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून सहकार संस्था अधिक पारदर्शक व उत्तरदायी बनवण्यावर भर दिला जाईल. शेती, दुग्ध व्यवसाय, सूक्ष्म वित्त संस्था, शिक्षण संस्था, महिला स्व-सहायता गट - या सर्व क्षेत्रांत सहकार तत्त्वांची पुनर्स्थापना घडवून आणण्याची ही एक सुवर्णसंधी आहे.

अखेरीस, सहकारिता ही केवळ एक आर्थिक रचना नाही, ती एक जीवनपद्धती आहे - जिथे लोक एकमेकांच्या गरजा ओळखून, सहभावनेने पुढे येतात. अंतर्राष्ट्रीय सहकारिता वर्ष २०२५ आपल्याला या तत्त्वांना पुन्हा एकदा उजाळा देण्याची आणि भविष्यातील समाज अधिक न्याय्य, समृद्ध आणि सामूहिक हिताचे बनवण्याची दिशा दाखवत आहे.

• • •





# भारतातील सहकार चळवळीचा प्रारंभ व विकास

**सावी कुमरे**
**एम.ए .भाग २ (समाजशास्त्र)**

**सन** १८९५ मध्ये सर फ्रेडस्क्री निकोलसने सहकारी पतसंस्थेचा आपल्या भारतात प्रथम पुरस्कार केला. त्यानंतर सहकारी चळवळीचा विकास हे सरकारी धोरण म्हणून वेगळे झाले.

भारतातील सहकारी चळवळीचा प्रारंभ हा दुर्बलांच्या एकजुटीतून, अडचणींचा परिहार करण्याच्या प्रयत्नातून झाला. सहकारालाच 'आपत्तींची अपत्ये' असे संबोधले जाते. वेगवेगळ्या देशात निर्माण झालेल्या सामाजिक, आर्थिक, राजकीय आपत्ती व संकटातून या सहकाराचा जन्म झाला. आपल्या देशात सहकाराचा उगम हा शेतकऱ्यांच्या दारिद्र्यातून, दुष्काळग्रस्त व रोगग्रस्त परिस्थितीतून झालेला आहे. सदैव उपेक्षित राहिलेली शेती व क्षीण होत चाललेले कुटीर उद्योग यामुळे ग्रामीण जनता कर्जाच्या खाईत बुडून गेली होती. आपला भारत देश हा शेतीप्रधान असूनही महाजनांच्या विळख्यात सापडला होता. भारतीय शेतकऱ्याची वर्णन 'कर्जात जन्म, कर्जात जीवन आणि कर्जातच मृत्यू' असे केले जाते. ब्रिटिश राजवटीत ही प्रक्रिया अधिक वेगाने चालू होती. या वास्तविकतेचा परिणाम दक्षिण भारतातील असंतुष्ट कर्जबाजारी शेतकऱ्यांवर झाला. परिणामतः 'रोखे फाडीची मोहीम' सरकारला १८७९ मध्ये मंजूर करावी लागली. १८८३ चा जमीन सुधारणा कायदा व १८८४ चा शेतकऱ्यांचे कर्ज कायदा सरकारने अमलात आणला. त्यापूर्वी १८७९ मध्ये डेक्कन एग्रीकल्चर रिलीफ ॲक्ट शेतकऱ्यांना सूट देण्यासाठी मंजूर करण्यात आला होता.

सर निकोलस यांच्या भगीरथ प्रयत्नांतून १९०२ मध्ये सहकारास कायद्याचे स्वरूप प्राप्त झाले. इंग्लंडमधील 'फ्रेंडली सोसायटीज' एक्सच्या धर्तीवरच हा कायदा करण्यात आला व तो मार्च १९०४ रोजी संपूर्ण भारतात अमलात आला.

या कायद्यातील तरतुदी पुढील प्रमाणे :-

१) एकाच गावात राहणारे, एकाच वर्गाची कोणतीही दहा लोक काटकसर आणि स्वालंबनाच्या हेतूने सहकारी संस्था स्थापन करू शकतील

२) ठेवी जमा करणे व कर्जवाटप करणे हे त्यांचे प्रमुख कार्य राहील.

३) ग्रामीण संस्थांची जबाबदारी अमर्यादित राहील व त्यांच्या सभासदांपैकी चार पंचमाऊस सभासद शेतकरी असले पाहिजेत.

४) होणाऱ्या फायद्यातून लाभांश न वाटता तो गंगाजळीत जमा करावयाचा व अशी पुरेशी रक्कम जमल्यावर त्याचे बोनस शेअर मध्ये रूपांतर करावयाचे.

अशाप्रकारे भारतातील सहकार क्षेत्राचा सहकार चळवळीचा प्रारंभ व विकास झालेला दिसून येते.

•••



# महाराष्ट्रातील सहकार

**कार्तिक बुद्धे**
एम. ए. मराठी

**महाराष्ट्र** हे भारतातील सहकार चळवळीचे अग्रणी राज्य मानले जाते. सहकार म्हणजे लोकांनी एकत्र येऊन सामूहिक प्रयत्नांतून स्वतःच्या व समाजाच्या आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक उन्नतीसाठी केलेला यशस्वी प्रयोग. महाराष्ट्राने हा प्रयोग सर्वांत यशस्वी रितीने अमलात आणला. सहकार ही संकल्पना ग्रामीण भारताला आर्थिक बळकटी देणारी असून, महाराष्ट्रात ती केवळ आर्थिक व्यवहारापुरती मर्यादित न राहता ग्रामीण जीवनशैलीचा एक अविभाज्य भाग ठरली आहे. कृषीप्रधान राज्य म्हणून शेतकऱ्यांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी आणि ग्रामीण भागाचा आर्थिक विकास साधण्यासाठी सहकार चळवळीने महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

सहकार क्षेत्राची सुरुवात ब्रिटिश काळात झाली असली तरी, स्वातंत्र्यानंतरच्या काळात महाराष्ट्रात याला विशेष बळ मिळाले. सहकार चळवळीचा उदय १९०४ मध्ये ब्रिटिशांनी सहकारी कर्ज संस्था कायदा लागू केल्याने झाला. स्वतंत्र भारतात विशेषतः महाराष्ट्रात याला प्रचंड गती मिळाली. १९६० च्या दशकात कृषी व ग्रामीण विकासासाठी सहकारी संस्था, साखर कारखाने, दूध संघ, पतसंस्था व सोसायट्या यांची स्थापना मोठ्या प्रमाणावर झाली. यामध्ये वसंतदादा पाटील, शरद पवार, यशवंतराव चव्हाण यांसारख्या नेत्यांचे योगदान उल्लेखनीय आहे.

माणूस हा सामाजिक प्राणी आहे. तो एकट्याने जगू शकत नाही. कुटुंब, शाळा, संस्था, समाज हे सारे सहकारावरच चालतात. बालक जन्माला आल्यानंतर त्याचे संगोपन, शिक्षण, आरोग्य या सर्व गोष्टींमध्ये विविध व्यक्ती, संस्था सहभागी होतात. हेच सहकाराचे उत्तम उदाहरण आहे. सहकारामुळे माणसामधील आपुलकी, विश्वास, सहकार्य, समंजसपणा वाढतो. लोक एकत्र आल्याने सामाजिक प्रश्न सोडवण्याची क्षमता वाढते. उदा. ग्रामविकास, स्वच्छता मोहिमा, पाणी व्यवस्थापन या गोष्टी सहकाराशिवाय शक्य होत नाहीत. शेतकरी सहकारी संस्था, साखर कारखाने, दूध संघ, पतपेढ्या, सहकारी बँका या सर्व संस्था लोकांच्या एकत्रित प्रयत्नातून चालतात. यातून रोजगारनिर्मिती होते, आर्थिक स्थैर्य मिळते आणि ग्रामीण भागाचा विकास होतो.

सहकारामुळे छोट्या लोकांना मोठे स्वप्न पाहण्याची आणि ते साकार करण्याची संधी मिळते. सहकारी तत्त्वांवर चालणाऱ्या संस्था लोकांमध्ये जबाबदारीची भावना निर्माण करतात. हे संस्था नफा मिळवण्यापेक्षा समाजासाठी काम करतात. त्यामुळे सहकारातून निर्माण होणारी आत्मनिर्भरता हे मानवी जीवनाचे मोठे सामर्थ्य आहे. आजच्या स्पर्धात्मक युगात सहकाराची गरज अधिक आहे. कोरोनासारख्या संकटात शेजारी, संस्था, आरोग्य कर्मचारी यांनी एकत्र काम केल्यानेच संकटांवर मात करता आली. यामुळे सहकार हा फक्त एक आर्थिक संकल्पना नसून मानवी जगण्याची गरज आहे.

**महाराष्ट्रात खालील प्रमुख सहकारी क्षेत्रे कार्यरत आहेत :**

- **सहकारी साखर कारखाने**
  साखर उद्योगात महाराष्ट्र आघाडीवर असून, साखर कारखाने हे बहुतेक सहकारी तत्त्वावर चालतात.
- **दुग्ध व्यवसाय सहकारी संस्था**
  अमूलच्या धर्तीवर 'आरे', 'गोकुळ', 'वारणा' इत्यादी दूध संघ कार्यरत आहेत.
- **पतसंस्था आणि बँका**
  जिल्हा सहकारी बँका, अर्बन बँका आणि पतसंस्था ग्रामीण व नागरी भागात आर्थिक सेवा पुरवतात.
- **शेती सेवा सहकारी संस्था (SSS)**
  बियाणे, खते, औषधे यांचे वितरण करताना शेतकऱ्यांचे हित साधणाऱ्या संस्था.

**यशोगाथा व प्रभाव**

- **वारणा सहकारी साखर कारखाना :**
  केवळ साखर उत्पादनातच नव्हे तर शिक्षण, आरोग्य, उद्योग क्षेत्रातही भर घातली.
- **गोकुळ दूध संघ :**
  कोल्हापूर जिल्ह्यातील लाखो शेतकऱ्यांना आर्थिक स्थैर्य प्राप्त करून देणारा प्रकल्प.
- **जिल्हा बँका आणि SHG (Self Help Groups) :**
  महिला सक्षमीकरण व ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना.

**अडचणी व आव्हाने**

- **राजकारणाचे अतिक्रमण**
  अनेक सहकारी संस्था राजकीय हस्तक्षेपामुळे अपयशी ठरल्या.
- **अकार्यक्षमता आणि भ्रष्टाचार**
  अनेक सहकारी संस्था योग्य व्यवस्थापनाअभावी बंद पडल्या.
- **स्पर्धात्मक बाजारपेठ**
  खासगी व मल्टिनॅशनल कंपन्यांमुळे सहकारी संस्थांना टिकणे अवघड होत आहे.

**भविष्यातील दिशा व संधी**

- **डिजिटायझेशन आणि पारदर्शकता**
  आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून पारदर्शकता व कार्यक्षमता वाढवणे आवश्यक.
- **युवा सहभाग वाढवणे**
  तरुण पिढीने सहकार क्षेत्रात पुढे येणे आवश्यक आहे.
- **सस्टेनेबल व नवोन्मेषात्मक उपक्रम**
  जैविक शेती, प्रक्रिया उद्योग, सौरऊर्जा इत्यादी नव्या संधी.

**निष्कर्ष**

सहकार ही संकल्पना महाराष्ट्राच्या ग्रामीण भागासाठी वरदान ठरली आहे. काही अडचणी असूनही, योग्य नियोजन, पारदर्शकता, आणि तरुण नेतृत्वाच्या मदतीने हे क्षेत्र पुन्हा भरारी घेऊ शकते. सहकार हा केवळ आर्थिक व्यवहार नसून सामाजिक बांधिलकीचा व लोकशाहीचा एक सुंदर प्रयोग आहे.

• • •





# सहकार क्षेत्रातील गडचिरोलीचे उत्तुंग शिखर : अरविंद सावकार पोरेड्डीवार

**कु. कल्याणी विठ्ठल उईके**
एम.ए. मराठी - द्वितीय

**राज्याच्या** सहकार क्षेत्रात आपल्या कार्यशैलीने वेगळा ठसा उमटविणारे, गडचिरोली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे पहिले अध्यक्ष होण्याचा बहुमान मिळालेले आणि महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे माजी उपाध्यक्ष म्हणून अनेक वर्ष जबाबदारी सांभाळणारे आणि सध्या महाराष्ट्र राज्याच्या सहकार महामंडळाचे अध्यक्ष म्हणून कार्यरत असलेले अरविंद सावकार पोरेड्डीवार हे सहकार क्षेत्रातील मोठे व्यक्तिमत्व. पण केवळ सहकार क्षेत्रापुरतीच त्यांची ओळख नाही. गडचिरोली जिल्ह्याच्या निर्मितीपासून या जिल्ह्याच्या जडणघडणीत, विविध प्रकारच्या विकासात्मक वाटचालीत त्यांचे प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष योगदान आहे. या जिल्ह्यातील विविध समस्या आणि संस्कृतीचाही त्यांना अभ्यास आहे.

१९८५ मध्ये चंद्रपूर जिल्हा सहकारी बँकेतून गडचिरोली जिल्हा सहकारी बँक वेगळी झाल्यानंतर अरविंद सावकार पोरेड्डीवार हे या बँकेचे पहिले अध्यक्ष झाले. ८ नोव्हेंबर १९८५ रोजी गडचिरोलीत एका छोट्या इमारतीत बँकेची पहिली शाखा सुरू झाली. त्यावेळी बँकेचे भागभांडवल जेमतेम २५ लाख रुपये होते. त्यावेळी बँकेवर प्रशासक होते. काही दिवसातच निवडणूक झाली आणि महाराष्ट्रातील सर्वांत तरुण अध्यक्ष म्हणून त्यांची निवड झाली. गडचिरोली जिल्ह्यातील लोकांचे जीवनमानही खूप साधे होते. काही तालुक्याच्या ठिकाणीसुद्धा बँकेची सुविधा नव्हती. मुळात बँकेतून होणारे व्यवहारच मर्यादित होते. सर्वसामान्य, गोरगरीब माणसाचा बँकेशी फारसा संबंध येत नव्हता. इंटरनेटची सुविधा तर कुठेच नव्हती. त्यामुळेच राष्ट्रीयकृत बँका कुठे शाखा उघडण्याची हिंमत करत नव्हत्या. बँक सुरु झाल्यानंतर सुरुवातीच्या काळात रिझर्व्ह बँकेच्या पथकाने बँकेचे परीक्षण केले आणि ही बँक आर्थिकदृष्ट्या सक्षम होणार नाही, असा शेरा दिला होता. परंतु अरविंद सावकार पोरेड्डीवार यांच्या नेतृत्वात रिझर्व्ह बँकेच्या पथकाने दिलेला तो शेरा खोटा ठरवत बँकेला यशस्वी करून दाखविले. हे काम सोपे नव्हते. खूप अडचणी होत्या, पण सर्व अडचणींवर मात करत नागरिकांना बँकिंगची सुविधा देण्यासाठी ग्रामीण भागात शाखांचा विस्तार करण्याचा निर्णय घेतला. केवळ शाखा विस्तार करूनही उपयोग नव्हता. सामान्य माणसाला बँकिंगच्या व्यवहाराशी कनेक्ट करून, त्यांची आर्थिक गरज भागवणे, घेतलेल्या कर्जाची योग्य वेळी परतफेड करणे अशी आर्थिक शिस्त लावण्याचे काम जिल्हा बँकेच्या माध्यमातून त्यांनी सुरू केले. त्याचा परिपाक म्हणून आज सुविधा, तंत्रज्ञान, उत्कृष्ट सेवा आणि योग्य प्रशासनाच्या बाबतीत महाराष्ट्रातच नाही देशातील एक आघाडीची बँक म्हणून गडचिरोली जिल्हा सहकारी बँकेला ओळखले जाते. हे आपल्या सर्वांसाठीच गडचिरोली जिल्ह्यासाठी अभिमानास्पद आहे.

अध्यक्षपदावर १० वर्ष राहिल्यानंतर तत्कालीन सहकार कायद्यानुसार सलग दोन टर्म अध्यक्षपदावर राहता येत नसल्यामुळे छोटे बंधू प्रकाश पोरेड्डीवार यांच्याकडे अध्यक्षपद सोपविले आणि ते संचालक म्हणून राहिले. त्यानंतर महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेवर संचालक म्हणून निवड झाली. पुढे राज्य सहकारी बँकेचे उपाध्यक्ष, राज्य मार्केटिंग फेडरेशनवरही संचालक झाले. याशिवाय इंडियन पोटॅश लिमिटेड या देशपातळीवरील संस्थेवर सुद्धा त्यांना काम करण्याची संधी मिळाली. या सर्व जबाबदाऱ्या पार पाडताना त्या संस्थांमध्ये चांगले बदल करणे, त्या संस्थांच्या माध्यमातून आदिवासी, दुर्गम भागांमध्ये चांगली सेवा कशी देता येईल यावर त्यांचा भर राहिला. त्यातूनच दोन पिढ्यांमधील कार्यकर्ते जुळत गेले. त्या कार्यकर्त्यांना नावानिशी ओळखण्यासोबत त्यांच्या सुखदु:खात ते सहभागी होतात. चांगले काम करताना कार्यकर्त्यांचे प्रेम आणि विश्वास माणसाला नेहमी उर्जा देत असतात. अरविंद

सावकार गडचिरोली जिल्ह्यातील कोणत्याही तालुक्यातील कोणत्याही गावात गेले तरी लोकांचे जत्थेच्या जत्थे त्यांच्या भेटीला येतात. आजही प्रौढ, तरुण त्यांच्यासोबत सेल्फी काढण्यासाठी आतुर असतात. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे आकर्षण आबालवृद्धांना आहे. हे त्यांनी केलेल्या कामाचे निदर्शक आहे.

महाराष्ट्रात अनेक जिल्हा सहकारी बँका डबघाईस आल्या. काहींवर प्रशासक बसले. पण गडचिरोली जिल्हा बँकेवर ही स्थिती कधीच आली नाही. उलट महाराष्ट्रात या बँकेचे नाव आदराने घेतले जाते. या बँकेवर सुरुवातीपासून पोरेड्डीवार परिवाराचे वर्चस्व आहे, हे खरे आहे. पण ही घराणेशाही नाही. लोकांनीच पोरेड्डीवार कुटुंबियांना तिथे बसविले. कारण पोरेड्डीवार सावकारांच्या नेतृत्वातच बँकेचे काम सुरळीत चालू शकते हा लोकांचा विश्वास आहे आणि त्या विश्वासाला अरविंद सावकार, प्रकाश सावकार आणि आता प्रंचित सावकार पोरेड्डीवार यांनी आजवर कधी तडा जाऊ दिला नाही. हे कुटुंब आजही बँकेच्या ग्राहकांच्या आणि कर्मचाऱ्यांच्या गळ्यातील ताईत बनून आहे. बँकेची सुरुवात झाली त्यावेळी गडचिरोलीसारख्या आदिवासी-बहुल, अशिक्षित, दुर्गम क्षेत्र असणाऱ्या जिल्ह्यात कोणाला कर्ज देतानाही मोठी रिस्क राहात होती. पण बँक ही लोकांच्या, शेतकऱ्यांच्या सुविधेसाठी आहे हे लक्षात ठेवून सेवा दिली. लोकांवर विश्वास टाकला, लोकांनीही बँकेवरचा आणि पोरेड्डीवार परिवारावरील विश्वास दृढ केला, कोणत्याही राष्ट्रीयकृत बँका दुर्गम भागात सेवा देण्यास तयार नसताना जिल्हा बँकेच्या शाखा तिथे उघडल्या. आपण प्रामाणिक राहिलो तर लोकही आपल्याशी प्रामाणिक राहतात यावर दृढ विश्वास ठेवून अरविंद सावकार कार्य करीत राहिले व मार्गदर्शक बनून पुढील अध्यक्षांना संचालक मंडळास मार्गदर्शन करीत राहिले.

सहकाराला स्वाहाकार न करता काम करायचे याचे बाळकडू त्यांना त्यांचे वडील माजी आमदार स्व. नामदेव सावकार पोरेड्डीवार यांचे कडून मिळाले. तो संस्कार त्यांनी जपला, रुजवला आणि पुढच्या पिढीकडे सुपूर्द केला. त्याच शिकवणीवर आजही वाटचाल सुरू आहे. त्यामुळे ही बँक यशस्वी झाली. आता तर बँकेने युपीआय ॲप, मोबाईल बँकिंग सुविधा, आधारबेस पेमेंट प्रणाली यासारख्या अनेक अत्याधुनिक सुविधाही आपल्या ग्राहकांना उपलब्ध करून दिल्या आहेत. त्यामुळेच ही बँक २५ लाखांच्या भागभांडवलावरून आज ३ हजार कोटींच्या भांडवलावर पोहोचली आहे.

महाराष्ट्रातील अनेक सहकारी संस्था डबघाईला येताना दिसतात. मात्र येथील गडचिरोली जिल्हा सहकारी मध्यवर्ती सहकारी बँक मात्र सातत्याने यशाचे नवे नवे शिखर काबीज करताना दिसते. संपूर्ण जिल्ह्यात शाखांचे जाळे पसरवित अरविंद सावकार पोरेड्डीवार यांच्या मार्गदर्शनात ग्राहकांचा विश्वास जिंकत इथल्या जनतेला आर्थिक पाठबळ देण्याचे कार्य केले आहे. या बँकेला सहकारनिष्ठ पुरस्कार, बँको ब्लू रिबन पुरस्कार, वैकुंठभाई मेहता पुरस्कार असे राष्ट्रीय आणि राज्य पातळीवरील अनेक सन्मान प्राप्त झालेले आहेत. या बँकेने गडचिरोली सारख्या आदिवासीबहुल नक्षलग्रस्त जिल्ह्यातील सर्व खेड्यापाड्यांना बँकेद्वारे जोडले. अरविंद सावकार पोरेड्डीवार यांच्या मार्गदर्शनात यशाची अनेक शिखरे पादाक्रांत करणारी ही बँक केवळ आर्थिक नफा मिळवून थांबत नाही तर जोडोनिया धन उत्तम व्यवहारे । उदास विचारे वेच करी।। या तुकोबांच्या वाणीला कृतीरूप देण्याचा प्रयत्न त्यांनी सुरू केलेल्या अनेक सामाजिक उपक्रमांमधून दिसून येतो. रोवणे रोवणाऱ्या स्त्रियांसाठी साहित्य वितरण असो, लघु उद्योग करणाऱ्या व्यापाऱ्यासाठी सुरू केलेल्या योजना असोत कि वाघांच्या हल्ल्यात किंवा जंगली श्वापदांच्या हल्ल्यात प्राण गमावलेल्या व्यक्तींच्या कुटुंबियांना मदतनिधी देण्याचे उपक्रम, जिल्ह्यातील विविध क्षेत्रात कर्तृत्ववान असलेल्या व्यक्तींचा 'जिल्हागौरव पुरस्कार' देऊन गौरव करण्याचा उपक्रम असे सारे उपक्रम सामाजिक बांधिलकीचे प्रतिक आहेत.

अरविंद सावकार पोरेड्डीवार सहकार क्षेत्रासोबतच, सांस्कृतिक, राजकीय, आध्यत्मिक, पर्यावरणीय तसेच शैक्षणिक क्षेत्रातील अभ्यासू व्यासंगी मान्यवर म्हणून सुपरिचित आहेत. ते गोंडवाना विद्यापीठ परिक्षेत्रातील सर्वांत मोठ्या सर्वोदय शिक्षण मंडळाचे अध्यक्ष आहेत. अनेक सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक संस्थांचे विश्वस्त म्हणून ते कार्यरत आहेत. तरीही गडचिरोली जिल्ह्याचे सहकारचे अनभिषिक्त सम्राट, संपूर्ण महाराष्ट्रात सहकार महर्षी अरविंद सावकार पोरेड्डीवार ही त्यांची ओळख गडचिरोली जिल्हावासीयांची मान उंचावणारी आहे. गडचिरोली जिल्ह्यातील मानदंडतील एक महत्त्वाचे मानदंड म्हणून गडचिरोली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचा गौरवपूर्ण उल्लेख करावा लागतो आणि या क्षेत्राला उंची प्राप्त करून देणारे उत्तुंग व्यक्तिमत्व म्हणजे अरविंद सावकार पोरेड्डीवार साहेब आहेत. त्यांच्या उत्तुंग कर्तृत्वाला सलाम!

•••



# सहकारातून साकारलेली लोकचळवळ : आम्ही आमच्या आरोग्यासाठी

**कु. अलिना वसिम शेख, बी.एस्सी. – भाग १**

**सहकाराचा** संबंध केवळ आर्थिक क्षेत्राशीच असतो असे नाही. समाजाच्या विविध अंगांना समृद्ध करणाऱ्या अनेक घटकानाही सहकार तत्त्वाचा परीसस्पर्श होतो म्हणून त्या क्षेत्रातील कामाचेही सोने होते. गैरसरकारी स्वयंसेवी संस्थांचा महाराष्ट्रातील यशस्वी प्रवास सर्वज्ञात आहे. जवळपास यशस्वी झालेल्या सर्व स्वयंसेवी संस्थांनी आपल्या कामात सहकाराचे तत्त्व अंगिकारले आहे.

आमच्या गडचिरोली जिल्ह्याची राज्य आणि राष्ट्रीय पातळीवर ज्या मोजक्या संस्था, घटना आणि व्यक्तींमुळे होते त्यामध्ये स्वयंसेवी संस्था अग्रणी आहेत. या संस्थांमध्ये आमच्या कुरखेडा तालुक्यात असणारी आणि महाराष्ट्र, मध्यप्रदेश, छातीसगढ सह अनेक राज्यात विविध स्वरूपाचे सामाजिक कार्य करणारी 'आम्ही आमच्या आरोग्यासाठी' ही स्वयंसेवी संस्था आपल्या नावातच सहकार धारण करणारी संस्था आहे. या संस्थेचे अर्ध्वयू डॉ. सतीश गोगुलवार आणि श्रीमती शुभदा देशमुख यांनी या संस्थेची पायाभरणी १९८२ ला केली.

या काळात गडचिरोलीत सामाजिक उलथापालथ सुरू होती. छत्तीसगड आणि तेलंगणाच्या सीमेलगत नक्षली आंदोलन मूळ धरत होतं. पण त्याचबरोबर लोकशाहीवर विश्वास असलेल्या चळवळीही जोर धरत होत्या. नारायणसिंह उईके हे या भागातील जुने आदिवासी नेते. त्यांच्या शब्दावर परिसरातले हजारो आदिवासी जमत. सुखदेवबाबू उईके हे त्यांचे शिष्य. सुखदेवबाबू 'जागृत आदिवासी संघटने'च्या माध्यमातून जोरदार काम करत होते. आदिवासींना जमीन हक्क, शिक्षण, सन्मान मिळवून देण्यासारख्या प्रश्नांवर ही संघटना काम करत असे. मोहन हिराबाई हिरालाल, मोहन मुत्तेलवार, डॉ. गोगुलवार–शुभदाताईही हे संघटनेशी जोडल्या गेल्या. या मित्रांनी आरमोरी तालुक्यात 'आपण आपला मार्ग शोधू!' ही मोहीम सुरू केली. तरुणांनी खेड्यात जावं, प्रश्न–समस्यांचा अभ्यास करावा, त्यावरची उत्तरं शोधत आपापला जीवनप्रवास करावा असं या मोहिमेचं स्वरूप. त्यातून डॉ. गोगुलवार–शुभदाताईंसाठी आपला मार्ग शोधण्याचीच एक पायवाट गवसली आणि आम्ही आमच्या आरोग्यासाठी' संस्थेचा जन्म झाला.

संस्थेच्या आवारात शिरलं की एक फलक आपलं स्वागत करतो – 'लोगों के पास जाओ, उनके ज्ञान को प्रस्थान बिंदू मानो, उनके ज्ञान पर विश्वास करो, उनके साथ काम करो, अच्छा काम वह माना जायेगा जब काम पूरा होने




पर लोग कहे – ये हमने किया है!' 'आम्ही आमच्या आरोग्यासाठी'च्या कामाची दृष्टी अन् सार या विचारांमध्ये एकवटलंय.

राज्यात रोहयो १९७८ मध्ये सुरू झाली असली तरी गडचिरोलीत त्याची माहिती पोहचली नव्हती. त्यामुळे हेच पहिले काम हाती घेतले. रोहयोतून काम मिळण्यासाठी गरजूंनी तलाठी कार्यालयात अर्ज दिला की त्यानंतर १५ दिवसांत त्यांना काम मिळणं अपेक्षित असतं. मागणी करणाऱ्या मजुरांना काम मिळालं नाही, तर काम मिळेपर्यंत दर दिवसाचा एक रुपया बेरोजगार भत्ता हा कायद्याने मजुरांचा हक्क होता. पण याची माहितीच नसल्यामुळे लोकांना ना काम मिळत होतं, ना बेरोजगार भत्ता. 'आपण आपला मार्ग शोधूया.' मोहिमेच्या कार्यकर्त्यांनी बांधकाम व लाकूड कामगार संघटनेच्या माध्यमातून ही माहिती गरजूंपर्यंत पोहचवायला सुरुवात केली. त्यासाठी योजनेची माहिती पत्रकं गावोगावी वाटण्यात आली. ही मोहीम इतकी प्रभावी ठरली की लोक वेगवेगळ्या गावांतून मोठ्या प्रमाणावर लोक येऊ लागल्याने तलाठ्यांनी पोलिसांना बोलावलं. लोकांनी आपल्या कार्यालयाला घेराव घातल्याची तक्रार केली. पोलिस आल्यावर लोकांनी त्यांना सांगितलं, आम्हाला फक्त आमच्या अर्जाची पोच हवी आहे. ते ऐकून पोलिसही नरमले. तलाठ्याला पोचपावती देणं भाग पडलं. या आंदोलनामुळे डॉ. गोगुलवार–शुभदाताईंचा सत्याग्रह आणि कायद्याच्या ज्ञानावरील विश्वास वाढला. या आंदोलनामुळे मजुरांना रोहयोअंतर्गत कामं मिळू लागली.

आदिवासी समाजासोबत काम करताना डॉ. गोगुलवार साहेब – शुभदाताई यांना जाणवलेला एक महत्त्वाचा प्रश्न होता, तो म्हणजे महिलांना समाजात सन्मान का मिळू नये. त्या शोधात हे दाम्पत्य दारूबंदीच्या चळवळीत सहभागी झाले. गावोगाव दारूच्या प्रश्नावर बैठका सुरू झाल्या. नवऱ्याच्या नशेमुळे बायकांना होणारा त्रास शुभदाताईंनी या काळात जवळून पाहिला. डॉ. अभय बंग यांनी या अनुभवाला अभ्यासाची बैठक देऊन दारूवरील खर्चाचं गणित उलगडून दाखवलं. दारूमुळे गरिबीत पडणारी भर महिलांच्या लक्षात आली. त्यातून गडचिरोलीत दारूबंदीचं आंदोलन उभं राहिलं. गडचिरोलीतून दारूबंदीची मागणी करणारं पहिलं निवेदन कुरखेडा तालुक्यातून गेलं. ते महिला कार्यकर्त्यांच्या वतीने शुभदाताईंनी मुख्यमंत्र्यांना पाठवलं. अर्थातच सरकारने काही लगेच दखल घेतली नाही. खूप चिवट लढा द्यावा लागला. तेव्हा कुठे १९९२ मध्ये गडचिरोलीत दारूबंदी झाली. महिलांच्या मागणीमुळे झालेली ही राज्यातील पहिलीच दारूबंदी आहे.

गडचिरोलीसारख्या दुर्गम भागात डॉक्टरांचं प्रमाण कमी होतं. बाहेरचे डॉक्टरही तिथे जाण्यास उत्सुक नसत. त्यामुळे लोक नाइलाजाने बोगस डॉक्टरांच्या आश्रमाला जात किंवा पूर्वापार चालत आलेल्या वैदू किंवा भगताला दाखवत. पैशापायी पैसे खर्च होत आणि रोग समूळ बरा होतच नसे. डॉ. गोगुलवार यांनी या प्रश्नाचा माग घेत गावोगाव फिरती सुरू केली. ते वैदूंच्या भेटी–गाठी घेऊ लागले, तसं त्यांच्या लक्षात आलं की वेगवेगळ्या गावात निरनिराळ्या औषधांची माहिती असलेले वैदू आहेत. कुणी काविळीवर, तर कुणी सर्पदंशावर इलाज करतो. कुणाला महिलांच्या आजारांची जाण आहे. वैदूंचं हे ज्ञान गुरूशिष्य परंपरेवर आधारलेलं. गुरूकडून ज्ञान संपादन करण्यासाठी शिष्याला कष्ट घ्यावे लागत असत. औषधी वनस्पती शोधत जंगलात तंगडतोड करावी लागत असे. गुरूचा विश्वास बसल्यानंतरच तो आपलं ज्ञान शिष्याला देत असे. त्यामुळे आपल्याकडच्या औषधांची माहिती दुसऱ्यांना देण्याची वैदूंची तयारी नसे. हे लक्षात आल्यावर त्यांनी वडसा आणि कुरखेडा तालुक्यातल्या वैदूंच्या पुन्हा एकदा भेटी घेतल्या. या वैदूंचा विश्वास संपादन केला. वैदूंकडच्या औषधी वनस्पतींचे उपयोग आयुर्वेदाच्या कसोटीवर तपासले. त्यानंतर कोणत्या आजारावर कोणत्या वनस्पतीचं मूळ, खोड, पानं उपयोगी ठरतात, याचं प्रमाणीकरण करण्याचं किचकट आणि प्रचंड काम त्यांनी अंगावर घेतलं. गावोगावच्या बचत गटातील महिलांना त्यांनी प्रशिक्षण द्यायला सुरुवात केली. त्याआधी वैदूंकडचं ज्ञान मुख्यत: आदिवासी पुरुषांपुरतंच मर्यादित होतं. ते या प्रयत्नांमुळे महिलांकडे आलं. जुन्या काळी घरात साध्या आजारांवरच्या उपचारांसाठी घरोघरी आजीचा बटवा असे. त्यात काही घरगुती औषधं असत. त्याच संकल्पनेत संशोधित वनौषधींची भर घालून डॉ. गोगुलवार यांनी घरात उपयोगी पडणाऱ्या औषधांची पेटी विकसित केली. स्थानिक

पातळीवर ही औषधं लोकप्रिय करण्यात पुढाकार घेतला. 'आम्ही आमच्या आरोग्यासाठी'ने प्रशिक्षित केलेले वनौषधी तज्ज्ञ गावागावांत-पाड्यापाड्यांवर जाऊन इतरांना प्रशिक्षित करू लागले. आजही 'आम्ही आमच्या आरोग्यासाठी' विविध वनौषधींचं उत्पादन करून ते विविध संस्था आणि उपचारकर्त्यांना पुरवतो. एका एम.बी.बी.एस. डॉक्टरने केलेला हा आगळा वेगळा प्रयोग आहे. आधुनिक ॲलोपथी ज्ञानाची आढ्यता सोडून लोकपरंपरेचं महत्त्व ओळखून लोकांचं ज्ञान लोकांसाठी खुलं करण्यात डॉ. गोगुलवार साहेबांचे मौलिक योगदान आहे.

'आम्ही आमच्या आरोग्यासाठी'चं आणखी एक उल्लेखनीय काम म्हणजे आदिवासी विभागात उभारलेली बचत गटांची चळवळ. ऐंशीच्या दशकाच्या उत्तरार्धात आपल्या देशात बचत गटांची चळवळ जोर धरू लागली. त्याकाळी पुणे जिल्ह्यात सुधा कोठारी आणि वर्ध्यात सुमनताई बंग यांनी बचत गटांचं काम सुरू केलं होतं. आजही कुठला नवा विचार गडचिरोलीत पोचायला उशीरच लागतो. पण शुभदाताईंमुळे त्या काळातच बचत गटांची चळवळ गडचिरोलीत रुजली आणि फोफावलीही. गडचिरोलीत आजही प्रत्येकी दोनपैकी एक महिला बचत गटाची सदस्य आहे. महाराष्ट्राच्या इतर आदिवासी भागांपेक्षा हे प्रमाण बरंच जास्त असावं. पैसे बचतीची सवय नसल्याने कायम तंगीत राहणाऱ्या आदिवासींमध्ये ती सवय रुजली. अर्थव्यवस्थेत दीनवाणा-दुबळा मानल्या गेलेल्या आदिवासी समाजाची क्रयशक्ती वाढली, कित्येक महिला लघु उद्योजक म्हणून पुढे आल्या  याचं श्रेय निश्चितच 'आम्ही आमच्या आरोग्यासाठी'च्या कामाला जातं.

'आम्ही आमच्या आरोग्यासाठी'चं काम असं विविध क्षेत्रात पथदर्शी ठरलंय. लोकशाही रुजवणं हे त्यांच्या कामातलं सूत्र प्रकर्षाने जाणवतं. 'आम्ही आमच्या आरोग्यासाठी'ने बचत गटांना सशक्त केलं, त्यासोबतच ग्रामसभांनाही बळ दिलं. गडचिरोलीत तेंदूपत्ता, हिरडा, बांबू, मोह, मध अशा विविध वनौपजांचं समृद्ध जंगल आहे. पण या वनौपजांवर समृद्ध झाले ते व्यापारी आणि दलाल. आता २००६चा 'वन अधिकार कायदा' आल्यानंतर गावाच्या हद्दीतल्या जंगलाचं संवर्धन आणि व्यापाराचे हक्क ग्रामसभांना मिळाले. मोहन हिराबाई हिरालाल आणि देवाजी तोफा यांच्या नेतृत्त्वाखाली गडचिरोलीतल्याच मेंढा लेखा गावाने स्वशासनाचा प्रयोग यशस्वी केला. आपल्या मित्रमंडळींचा हा अनुभव सोबत घेऊनच 'आम्ही आमच्या आरोग्यासाठी' देखील कुरखेडा आणि कोरची तालुक्यातील जवळपास १०० ग्रामसभा सशक्त करीत आहे.

गडचिरोली जिल्ह्यातील गावांना आपल्या संपत्तीची जाणीव करून देण्यात आणि त्याचं आर्थिक फायद्यात

Amhi
Amchya
Arogyasathi
Reg.No. F134 /Gad.

रूपांतर करण्यात या संस्थेचं मोठं योगदान आहे. पूर्वी आदिवासी पारंपरिकरीत्या जंगलातून मध गोळा करत. त्यासाठी मधाची पोळी जाळली जात. त्यासोबत मधमाशाही मरत. डॉ. गोगुलवार साहेबांनी अन्य संस्था आणि तज्ज्ञांची मदत घेऊन मध संकलनाची योग्य पद्धत रुजवली. त्याचप्रमाणे या भागात लोक घरच्याघरी साळीतून तांदूळ वेगळा काढत. त्यासाठी एक लाकडी यंत्र असायचं. या यंत्राला ढेकी म्हणतात. ढेकीतून कांडलेला हातसडीचा तांदूळ हल्ली लोकप्रिय आहे. कारण या तांदळात स्टार्च आणि जीवनसत्वं असतात. पण जागोजागी राईस मिल आल्याने ढेकीने तांदूळ कांडण्याची पद्धत लोप पावली. डॉक्टरांनी हातसडीच्या तांदळाचं महत्त्व गावकऱ्यांना पटवलं. आयआयटीच्या तज्ज्ञांनी ढेकीसदृश, पण कष्ट वाचवणारं यंत्र विकसित केलं. या यंत्रातून कांडलेल्या तांदळाला बाजारपेठ मिळवून देण्यासाठी तर 'आम्ही आमच्या आरोग्यासाठी'ने प्रयत्न केलेच, पण हा तांदूळ स्थानिकांनी आहारात घ्यावा यासाठीही जनजागृती केली. तंत्रज्ञान आणि परंपरांचा मेळ घालून लोकांना आर्थिक स्वावलंबी बनवण्याचे काम केले.

ग्रामीण भागातील विकलांगांचं पुनर्वसन हे देखील असंच एक दुर्लक्षित क्षेत्र. आदिवासी भागातले प्रश्न कितीही गंभीर असले तरी तिथेदेखील अस्थिव्यंग, अंध, मतिमंद, कुष्टरूग्ण, सिकलसेल निमियाचे रुग्ण आणि त्यांचे प्रश्नही असतातच. 'आम्ही आमच्या आरोग्यासाठी'ने गडचिरोली, चंद्रपूर, भंडारा व गोंदिया या चार जिल्ह्यांत अशा अनेकविध विकलांगांचं संघटन उभारलं आहे. विकलांग बांधवांना एकट्याच्या बळावर अपंगत्वाचं प्रमाणपत्रं मिळवणं, तसंच सरकारी योजना, पेन्शन आणि इतर सवलतींचा लाभ मिळवणं कठीण जातं. 'आम्ही आमच्या आरोग्यासाठी'ने बांधलेल्या संघटनेमुळे विकलांग सामूहिक शक्तीच्या जोरावर आपले हक्क मिळवू लागलेत. वेगवेगळ्या शासकीय योजनाची माहिती देण्याकरीता आणि शासनासोबत कामाच्या अनुषंगाने माहिती देण्याकरीता जाणीव जागृतीचे कार्यक्रम घेणे, शासन यंत्रणेला आमंत्रित करून त्यांना दिव्यांग स्नेही बनविणे, या सगळ्या व्यक्तीच्या कामाच्या अनुषंगाने संस्थेच्या कार्यक्षेत्रामध्ये वाढ होऊन कार्यक्षेत्र विस्तारलेला आहे. १०५५ दिव्यांग व्यक्तीचे बचतगट

आहेत. चंद्रपूर, नागपूर, भंडारा, गोंदिया, गडचिरोली या क्षेत्रातील लोक संघटना तयार करून नियोजित वेळी, नियोजित तारखेला, नियोजित स्थळी एकत्र बसून आपल्या हितार्थ प्रश्नावर चर्चा करून प्राधान्याने प्रश्न सोडविण्याकरिता शासनासोबत समन्वय साधत आहेत. आतापर्यंत संस्थेच्या मदतीने १०३४ दिव्यांग व्यक्तींना १६ प्रकारचे गरजेनिहाय साहित्य उपलब्ध करून दिले आहे. लोकांची क्षमतावृद्धी झालेली आहे. लोक स्वतःहून पुढे येत आहेत, स्वतःच्या समस्यांची सोडवणुक दिव्यांग स्वतः करीत आहेत.

२०१६ पासून दिव्यांग व्यक्ती रोजगार-स्वयंरोजगार प्रशिक्षण कार्यक्रमाअंतर्गत १८ ते ३० वयोगटातील मुकबधीर, कर्णबधीर, अल्पदृष्टी, अस्थिव्यंग मुलामुलींना कौशल्य आधारित प्रशिक्षण देऊन डीमार्ट, ली-मेरिडीयन, बिगबास्केट फिल्पकार्ड, केएफसी, इंडीगो एअर लाईन्स एअरपोर्ट नागपूर, रायपुर, दिल्ली. इत्यादी वेगवेगळ्या नामांकित खाजगी कंपन्यामध्ये १२००० ते १८००० हजार रुपये मानधनावर ७४५ दिव्यांग व्यक्तींना रोजगार मिळवून देत आईवडिलांच्या खांद्यावर असलेले मुलांच्या दिव्यांगत्वाचे ओझे कमी करण्यात आले आहे. सामाजिक उद्यमशीलता विकास कार्मक्रमाअंतर्गत २५० दिव्यांग बांधवाना शेळीपालन, कुक्कुटपालन, लघुउद्योग व्यवसायाचे प्रशिक्षण देऊन त्यांना शेळीपालन, कुकुटपालन, बांगडी व्यवसाय, चहानास्ता सेंटर, चप्पल दुकान, किराणा दुकान, कटलरी, स्टेशनरी इत्यादी व्यवसायाला लावून त्यांना स्थायीत्व आणलेले आहे. सोबतच दिव्यांग व्यक्तीची संगती शेतकरी उत्पादक कंपनीची निर्मिती केली. ५६० दिव्यांग बांधव भागधारक बनून शेळीच्या आजाराचे, संरक्षण, प्रतिबंध उपचाराचे प्रशिक्षण मोफत घेऊन झालेले आजार ओळखणे, औषधोपचार करणे हे कौशल्य हस्तगत करून शेळीपालकांनी आपला जम बसविला आहे.

महात्मा गांधीजींच्या विचारांचा प्रचंड प्रभाव, जयप्रकाश नारायण यांच्या कार्याचे संस्कार आणि संघर्ष वाहीनीची शिकवण घेऊन बाहेर पडलेले डॉ. सतीश गोगुलवार साहेब आणि शुभदाताई देशमुख यांनी आपल्या हृदयातील करुणा आपल्या कार्याच्या रूपाने या परिसरातील उपेक्षितांच्या जखमांवर पांघरली आणि अनेक समस्यांनी ग्रस्त असलेल्या या भागाला ज्ञानाची, आपल्या संविधानिक हक्कांची उब देण्याचे महान कार्य केले आहे. आपल्या चार मित्रांसह या दोघांनी सुरु केलेला हा जनसेवेचा प्रवास अनेक कार्यकर्त्यांच्या सहकार्याने हातात हात घेऊन समृद्ध झालेला आहे. हा प्रवास अधिक समृद्ध होत जावा हीच शुभेच्छा.

(संदर्भ : प्रशांत खुटे, संगीता तुमडे)

• • •



# सृष्टी : नवी दृष्टी

**कु. काजल कापगते**
**बी.ए. – भाग एक**

**आमच्या** महाविद्यालयाचे यावर्षीचे रासेयोचे विशेष शिबिर येरंडी येथे घेण्यात आले. या शिबिरात मी शिबिरार्थी म्हणून सहभागी झाले होते. एक दिवस शिबिरातील दुपारच्या बौद्धिक सत्रामध्ये सृष्टी या स्वयंसेवी संस्थेचे संस्थापक मान. केशवभाऊ गुरुनुले हे आम्हाला प्रमुख मार्गदर्शक म्हणून लाभले होते. त्यांनी यावेळी मार्गदर्शन करताना त्यांच्या सृष्टी या संस्थेच्या कार्याचीही माहिती दिली होती तसेच आम्हाला आमच्या शिबिर स्थळाच्या समोरच असलेल्या आपल्या कार्यालयास भेट देण्याचे, अधिक जाणून घेण्याचे आवाहन केले होते.

केशवभाऊंचे अतिशय महत्त्वपूर्ण मार्गदर्शन, त्यांनी केलेले कार्य व आम्हा युवकांना केलेले आवाहन यामुळे मी अगदी भारावून गेले होते. माझ्या मनात त्यांच्याबद्दल आदर निर्माण झाला व मला अधिक जाणून घेण्याची जिज्ञासा वाटू लागली. एक दिवस आमच्या महाविद्यालयाचे इतिहास विभाग प्रमुख प्रा. डॉ. दशरथ आदे सर मार्गदर्शक म्हणून शिबिरात आले होते. त्यांच्या मार्गदर्शनानंतर त्यांच्यासोबत व कार्यक्रम अधिकारी डॉ. रविंद्र विखार सर आणि आम्ही काही शिबिरातील मैत्रिणी सोबत केशवभाऊंच्या ऑफिसमध्ये जाऊन त्यांची भेट घेतली. त्यांच्याशी मनमोकळेपणाने चर्चा केली. त्यांच्या संपूर्ण कार्याने मी अतिशय प्रभावीत झाली. त्यांच्या एकंदर प्रवासातून त्यांनी आदिवासी, ग्रामीण, दारिद्र्य पूर्ण जीवन जगणाऱ्या, मागासलेल्या समाजाला आणि तरुण वर्गाला एक प्रकारची नवी सृष्टी, नवा मार्ग आणि जगण्याची नवी उमेद दिल्याचे जाणवले.

केशवभाऊ गुरनुले यांनी गडचिरोली जिल्ह्यातील कुरखेडा पासून तीन किलोमीटर अंतरावरील येरंडी या एका लहानशा आदिवासी गावात SRISHTI : Society for rural Initiative in Sustainable and Holistic Themes in India या संस्थेची स्थापना केली. ही संस्था आज महाराष्ट्र आणि छत्तीसगडमधील आदिवासी भागात परिवर्तनाच्या दिशेने वाटचाल करणारी एक दीपस्तंभ ठरली आहे.

१९८५ मध्ये सुरू झालेली आणि २००२ मध्ये अधिकृतरित्या नोंदणी केलेली ही संस्था ग्रामीण व आदिवासी समुदायाच्या हक्कासाठी, सशक्तीकरणासाठी आणि पर्यावरण पूरक जीवनशैलीसाठी सतत काम करीत आहे. सृष्टात येरंडी या गाव खेड्यातून झाली असली तरी, आज तिचे कार्यक्षेत्र गडचिरोली, चंद्रपूर आणि छत्तीसगड मधील राजनांदगाव, मोहाला–मानपुर आणि आंबागड चौकी या भागापर्यंत पसरलेले आहे.

'ग्रामसभा हाच विकासाचा गाभा' या तत्त्वावर विश्वास ठेवून ग्रामीण विकासात स्थानिक सहभागावर भर देते. त्यांच्या प्रत्येक उपक्रमात ग्रामसभा आणि समुदायाचा सक्रिय सहभाग असतो. संस्थेचे काम शिक्षण, उपजीविका, महिला सक्षमीकरण, आरोग्य, पर्यावरण, वन कृषी आणि ग्रामीण विकास या सात प्रमुख क्षेत्रामध्ये विभागलेले आहे. मात्र या सगळ्यांच्या मुळाशी हक्क, सहभाग आणि सशक्तिकरण हे ध्येयतत्त्व आहे.

**वन हक्क संघर्ष आणि यश :** सृष्टी ही २००६ पासून सामूहिक वन हक्क कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीत महत्त्वाची भूमिका पार पाडत आहे. संस्थेच्या मदतीने ४५० पेक्षा अधिक ग्रामसभांनी सामूहिक वन हक्काचे दावे सादर केले असून जवळजवळ १.५ लाख हेक्टर वनजमिनीवर हक्क मिळविले आहे. हे यश म्हणजे फक्त कायदेशीर प्रक्रिया नाही तर समुदायाच्या सशक्तीकरणाचे मूळ यश ठरले. सृष्टीने नकाशे तयार करणे, पुरावे संकलित करणे, प्रशिक्षण आणि कायदेशीर सल्ला देणे अशा सर्व प्रकारची मदत केली आहे.

**ग्रामसभा संघ – महा ग्रामसभा – संसाधन व्यवस्थापनाचे लोकशाहीकरण :**

CFR मिळालेल्या गावांमध्ये सृष्टीने महाग्रामसभा या नवीन कल्पनेची मुहूर्तमेढ रोवली. विविध गावाच्या ग्रामसभा एकत्र येऊन वनोपज संकलन, प्रक्रिया, विक्री आणि बाजार व्यवस्थापनाचे नियोजन करत आहेत. बांबू, तेंदू, मध, गोंद, हिरडा, बेहडा यासारख्या वन उपजावर आधारित स्थानिक अर्थव्यवस्था उभी राहिली आहे. गावांनी जाहीर लिलाव सुरू करून स्वतः दर ठरवण्याचा निर्णय घेतात. यामुळे त्यांच्या उत्पन्नात मोठी वाढ झाली आहे. आणि त्यातून गावांचे आर्थिक स्वातंत्र्य अधिक बळकट झाले आहे.

**आरोग्य आणि पोषण :** जवळपास ३६ गावांमध्ये राबवलेल्या आरोग्य आणि पोषण प्रकल्पात बालकांचे १०० टक्के लसीकरण, गर्भवती महिलांचे काळजीपूर्वक आरोग्य व्यवस्थापन आणि कुपोषणाची संख्या घटवण्याची फार मोठी कामगिरी सृष्टीने करून दाखविली आहे. अंगणवाडी सेविका, आशा वर्कर आणि आरोग्य विभागांशी समन्वय साधून आरोग्य विषयक जनजागृती केल्या जाते. आरोग्य ही फक्त सरकारची जबाबदारी नसून ती सामूहिक प्रयत्नातून सुधारता येते. याचे उत्तम उदाहरण म्हणजे सृष्टीने करून दाखवलेले या क्षेत्रातील काम होय. म्हणूनच त्यांच्या या कार्याचा ठसा गडचिरोलीच्या आरोग्य नकाशावर उमटलेला आहे.

**शिक्षणात नव्या शक्यतांचा शोध**

सृष्टीच्या ई-विद्या आणि SLO आधारित कार्यक्रमामुळे ग्रामीण विद्यार्थ्यांना डिजिटल साधनाच्या साह्याने इंग्रजी, गणित आणि विज्ञान यासारख्या विषयात नव्या पद्धतीने शिकण्याची संधी मिळाली. स्थानिक तरुणांना स्वयंसेवक म्हणून प्रशिक्षण देऊन त्यांना शिक्षक म्हणून तयार करण्यात आले. गोठणगाव, येंगलखेडा, शंकरपूर, चोप यासारख्या गावातील शाळांमध्ये ही चळवळ बरीच रुजली आहे. या उपक्रमामुळे शिक्षणाची जबाबदारी समाजाच्या हातात आली आहे.

**महिला सक्षमीकरण**

सृष्टी संस्थेच्या सततच्या प्रयत्नाद्वारे महिला स्वयंसहायता गटाची स्थापना करण्यात आली. या गटांना प्रशिक्षण देण्यात आले. तसेच बँकिंग सेवेसी सुद्धा जोडण्यात आले. सोनापूर गावातील मत्स्यपालन प्रकल्प, जाळी आणि बीज वाटपासह प्रशिक्षणही देण्यात आले. म्हणजे केवळ उत्पन्न वाढीचे साधन नसून महिलांना निर्णय प्रक्रियेत सहभागी करून घेण्याचे ते अतिशय प्रभावी माध्यम ठरले आहे. यामुळे आता अनेक गावांमध्ये स्त्रियांच्या नेतृत्वात ग्रामसभा सुरू झाल्या आहेत. समाजातील हे बदलाचे लक्षण या संस्थेने केलेल्या कामामुळे झालेले आहे.

**उपजीविकेसाठी विविध साधने आणि मूलभूत काम**

सृष्टी या संस्थेचे काम हे केवळ शब्दात सांगण्यापुरते नाही तर ते प्रत्यक्ष कायमस्वरूपी परिणाम देणारे आहे. जलसंधारण, शेळीपालन, मधमाशी उत्पादन, महुवा बँक, पळसबाग बियाणे, मत्स्यपालन यासारख्या अनेक उपक्रमाच्या माध्यमातून ग्रामीण व आदिवासी भागातील लोकांना उपजीविकेची नवसंजीवनी मिळालेली आहे. १८ हेक्टर जलस्त्रोत पुनर्जीवित करून ६८१ कुटुंबांना याचा सरळ सरळ फायदा मिळाला. त्यामुळेच संस्थेचे कार्यक्षेत्र हे १२० गावापर्यंत विस्तारित झाले असून जवळजवळ १०००० कुटुंबापर्यंत ही मदत प्रत्यक्षात पोहोचली आहे.

**संस्थेचा आत्मा मा. केशवभाऊ गुरुनुले**

सृष्टी संस्थेचे संस्थापक संचालक माननीय केशवभाऊ गुरनुले हे या ग्रामीण, आदिवासी व दुर्गम भागात चालविल्या जाणाऱ्या संपूर्ण चळवळीच्या केंद्रस्थानी आहेत. ते संस्थेचा आत्मा आहेत. १९६९ मध्ये जन्मलेले केशवभाऊ मागील ३० वर्षापासून आदिवासींचे हक्क, पर्यावरण, वनसंवर्धन आणि जैव विविधतेसाठी सतत कार्य करीत आहेत. त्यांनी या संस्थेच्या माध्यमातून आपल्या नेतृत्वात ४५० पेक्षा अधिक गावांना CFR मिळवून दिलेला आहे.

या संस्थेने अजीम प्रेमजी फॉऊंडेशन, D-SR-, SWISS-ID, FES (Foundation for Ecological Security) आणि इतर काही CSR भागीदारांसोबत भागीदारी केलेली आहे. या विविध फॉऊंडेशनच्या सहकार्यामुळे प्रयोगशील उपक्रम, संशोधन, प्रशिक्षण आणि नवीन संकल्पनांना प्रेरणा व गती मिळाली आहे. महा ग्रामसभा ही संकल्पना त्यांनी प्रत्यक्षात आणली. या त्यांच्या कार्यामुळेच त्यांना अनेक राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे.

शंकरपूर तालुका वडसा या गावाच्या पर्यावरण पूरक विकेंद्रीत शासनाची अंमलबजावणी बद्दल ऑक्टोबर २०१२ ला हैदराबाद येथे यु.एन.डी.पी. द्वारे एक लाख रुपयाचा

पुरस्कार देऊन गौरवण्यात आले. २००० मध्ये पर्यावरण संवर्धनाच्या कार्याबद्दल अविनाश बीजे – छाया बीजे पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तसेच नैसर्गिक मध संकलन व विपणन कार्याकरिता चिमणलाल गोविंददास मेमोरियल ट्रस्टचा चिमणलाल गोविंददास उद्यमगौरव पुरस्कार, शिवाय वनवासी कल्याण आश्रम महाराष्ट्र यांच्याद्वारे ऑक्टोबर २०२२ रोजी त्यांना सन्मानित करण्यात आले.

संस्थापक संचालक केशवभाऊ हे विविध समितीवरही सदस्य म्हणून कार्यरत आहेत. त्यात एम.आर.इ.जी.एस. जिल्हास्तरीय समिती सदस्य, जैवविविधता जिल्हास्तरीय समिती सदस्य, वन हक्क कायदा अंमलबजावणी जिल्हास्तरीय समिती सदस्य, जिल्हास्तरीय आपत्ती व्यवस्थापन समिती सदस्य इत्यादीचा समावेश आहे. भाऊ जिल्हा प्रशासन आणि गोंडवाना विद्यापीठाच्या सामुदायिक वन आणि वन उत्पादन स्वयं व्यवस्थापनासाठी ग्रामसभा प्रकल्पाचे मार्गदर्शकही आहेत. राष्ट्रीय स्तरावरील मकाम – महिला किसान अधिकार मंच व महाराष्ट्र पुनरुज्जीवन रेनफेड एग्रीकल्चर नेटवर्क या संस्थांशी त्यांची बांधिलकी आहे. तसेच ते सीएफआरएलए एनजीओचे नेटवर्क आणि एफआरएच्या प्रभावी अंमलबजावणीसाठीचे लाईन विभाग अधिकारी म्हणूनही कार्यरत आहेत.

सृष्टी ही संस्था आज एक सामाजिक चळवळ बनली आहे. जी निसर्गाशी सुसंगत आणि लोककेंद्रीत विकासाच्या मार्गावर कार्य करीत आहे. या संस्थेच्या लोकोपयोगी कामांमुळे हजारो कुटुंबांच्या जीवनात परिवर्तन घडून आले आहे. स्त्रियांचे नेतृत्व तयार होत आहेत. ग्रामसभा सक्षम झाल्या आहेत आणि गाव खेड्यांनी आपल्या हक्कासाठी एकसंघ होण्याची ताकद मिळविली आहे.

यापुढील काळात सृष्टी संस्थेकडून अधिक संशोधन, प्रशिक्षण आणि नवे प्रयोग राबविण्यात येतील. त्या माध्यमातून आदिवासींचा स्वाभिमान, त्यांचे हक्क आणि पर्यावरण पूरक जीवनशैली हे या संस्थेच्या कार्याचे मुख्य केंद्रबिंदू राहतील.

असा हा एका येरंडी या लहानशा गाव खेड्यातून सुरू झालेला सृष्टीचा प्रवाह आणि प्रकाश हा आजच्या निराशेच्या अंधकारात असणाऱ्या अनेकांसाठी नवी दृष्टी देणारा ठरला आहे. या प्रेरणादायी कार्यामुळेच एक आदर्श, सामूहिक आणि शाश्वत ग्रामीण विकासाचे उत्तम उदाहरण साकार होईल यात मुळीच शंका नाही. अशा या जगण्याची नवी उमेद आणि दृष्टी देणाऱ्या सृष्टीच्या आणि पर्यायाने केशवभाऊंच्या कार्यास माझे शतशः नमन आणि शुभेच्छा.

• • •






# सहकार क्षेत्रातील दीपस्तंभ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक गडचिरोली

**काजल कापगते**
बीए प्रथम वर्ष

**सहकार** क्षेत्रातील दीपस्तंभ म्हणजे आमच्या आदिवासी, नक्षलग्रस्त आणि दुर्गम अशा मागासलेल्या आणि महाराष्ट्राच्या एका टोकाला असलेल्या गडचिरोली जिल्ह्यातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक ही होय. ग्रामीण व दुर्गम भागातील नागरिकांची आर्थिक परिस्थिती हलाखीची असल्याने फारसे आर्थिक व्यवहार होत नाही. त्यामुळे राष्ट्रीयकृत बँका जिल्ह्यामध्ये शाखा सुरू करण्यास फारशा उत्सुक नाही. त्यामुळे आजही जिल्ह्यातील राष्ट्रीयकृत बँकांची संख्या इतर जिल्ह्यांच्या तुलनेत अगदी नगण्य आहे. तर खाजगी बँका केवळ जिल्हा व तालुका स्तरावर थांबले आहेत. अशा परिस्थितीत गडचिरोली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने दुर्गम व ग्रामीण भागात आपल्या विविध शाखा स्थापन करून तेथील नागरिकांना उत्तम सेवा उपलब्ध करून दिली आहे.

आपल्या वैशिष्ट्यपूर्ण कार्याने फक्त गडचिरोली जिल्ह्यातच नाही तर संपूर्ण महाराष्ट्रात एक उत्कृष्ट सहकारी बँक म्हणून 'दि गडचिरोली जिल्हा मध्मवर्ती सहकारी बँके'ने नावलौकिक मिळवला आहे.

१९८२ ला चंद्रपूर जिल्ह्यातून स्वतंत्र गडचिरोली जिल्ह्याची निर्मिती झाली. यानंतर ८ नोव्हेंबर १९८५ ला सहकार महर्षी अरविंद सावकार पोरेड्डीवार यांच्या पुढाकाराने या सहकारी बँकेची स्थापना करण्यात आली.

अतिशय अल्प भांडवलावर सुरू झालेल्या या सहकारी बँकेने २००१ पर्यंत सत्तावीस शाखा जिल्हाभरात उभ्या केल्या तसेच जिल्ह्यातील आदिवासी सेवा सहकारी संस्थांचे रूपांतर आदिवासी विकास कार्यकारी संस्थांमध्ये केले. याबरोबरच महाराष्ट्रात सहकार क्षेत्रात सर्वांत पहिल्यांदा स्वयंसहायता बचत गटांचे खाते उघडून त्यांना कर्ज पुरवठा करणे सुरू केले. आतापर्यंत ८००० च्या वर बचत गट या बँकेला जोडलेले आहेत. १९९७ मध्ये माननीय प्रकाश सावकार पोरेड्डीवार यांनी अध्यक्ष म्हणून बँकेचे नेतृत्व केले तर २००७ पासून महाराष्ट्रातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे सर्वांत तरुण अध्यक्ष म्हणून माननीय प्रंचित सावकार अरविंद पोरेड्डीवार हे या बँकेची धुरा सांभाळत आहेत.

आज संपूर्ण गडचिरोली जिल्ह्यात बँकेच्या ५७ शाखा आणि पाच विस्तार कक्ष यांच्याद्वारे ग्राहकांना संगणकाद्वारे बँकेच्या सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. महत्त्वाचे म्हणजे त्यातील बऱ्याच शाखा दुर्गम आदिवासी भागात सुरू केलेल्या आहेत. ४ लाख ३० हजार इतके या बँकेचे खातेदार असून ३१ मार्च २०२५ अखेरीस ३८८१ कोटींच्या व्यवसायाचा टप्पा पार केलेला आहे.

या बँकेने बदलत्या काळानुसार व धोरणानुसार आपल्या व्यवहारात अधिक गतिमानता आणली आहे. बँकेने आपल्या ग्राहकांच्या सोयीकरता एटीएम कार्डची सुविधा उपलब्ध करून दिलेली आहे. त्याद्वारे रक्कम काढणे इतर बिलांचे पेमेंट करणे व इतरही व्यवहार करणे सोपे झाले आहे. सोबतच एसएमएस आणि मिस कॉल सुविधाही सुरू केलेली आहे. ग्राहकांने बँकेच्या दिलेल्या नंबर वर मिस कॉल केल्यावर त्यांच्या खात्यातील शिल्लक रकमेची माहिती उपलब्ध होते. सोबतच आधार बेस पेमेंट प्रणाली, आरटीजीएस व एनईएफटी सेवा, मोबाईल बँकिंग, यु.पी.आय.ची सुविधा, शेतकऱ्यांना के.सी.सी. कार्डच्या द्वारे खते व बी-बियाणे खरेदीसाठी रोख रक्कम बाळगण्याची गरज नाही. हे कार्ड एटीएम प्रमाणेच कार्य करते. तसेच शेतकऱ्यांसाठी पीक कर्ज वाटपाचे महत्त्वपूर्ण काम करते. जिल्ह्यातील जवळपास ५०% पीक कर्ज या सहकारी बँकेद्वारे केल्या जाते. एवढेच नाही तर ज्या कर्मचाऱ्यांचे वेतन या बँकेतून होते त्या कर्मचाऱ्यांकरिता राष्ट्रीयकृत बँकांप्रमाणे सॅलरी पॅकेज लागू केले आहे. यामध्ये अनेक सुविधा उपलब्ध केल्या गेल्या आहेत. विशेष म्हणजे जिल्हा परिषदेच्या कर्मचाऱ्यांचे आणि प्राथमिक शिक्षकांचे पगार याच बँकेतून होत असतात. अशा सॅलरी धारक खातेदारांना ३० लाख रुपयाचा अपघाती विमा लागू केला आहे.

ग्राहकांचे हित लक्षात घेऊन विविध ठेवीवर आकर्षक व्याज दिले जाते आणि ठेवीदारांच्या बँकेतील प्रत्येक खात्यावरील एक लाख रुपये पर्यंतच्या ठेवीला विमा योजने अंतर्गत संरक्षण देण्यात आले आहे. यामुळे ग्राहकांचा या बँकेवरील विश्वास दिवसेंदिवस वाढत आहे आणि त्यातून बँकेची अधिकाधिक प्रगती होत आहे.

या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला आतापर्यंत अनेक मोठे मोठे प्रतिष्ठेचे पुरस्कार मिळाले आहेत. यावर्षी २०२३ – २४ चा 'राज्यस्तरीय कै. वैकुंठभाई मेहता उत्कृष्ट जिल्हा बँक' पुरस्कार मिळालेला आहे. या बँकेला हा पुरस्कार आतापर्यंत सलग १३ वेळा मिळालेला आहे. तसेच ०८ वेळा राष्ट्रीय दर्जाचा 'बँको ब्लू रिबन' हाही पुरस्कार मिळालेला आहे. महाराष्ट्र शासनाने 'सहकार निष्ठ' हा राज्यस्तरीय पुरस्कार आणि नाबार्डने सुद्धा 'राज्यस्तरीय पुरस्कार' देऊन गौरविले आहे.

यावरून या गडचिरोली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची प्रगती आणि आपल्या ग्राहकांचा कमविलेला विश्वास लक्षात येते. म्हणूनच ही सहकारी बँक म्हणजे सहकार क्षेत्रातील एक महत्त्वपूर्ण दीपस्तंभ आहे.





# ग्रामीण भागातील बचत गट व स्वयंरोजगार गट

**हरिश नन्नावरे**, एम.ए. प्रथम (समाजशास्त्र)

**भारतीय** ग्रामीण समाज हा आपल्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. शेती हा मुख्य व्यवसाय असला तरी वाढत्या गरजा आणि रोजगाराच्या संधींच्या अभावामुळे ग्रामीण भागातील लोकांसाठी पूरक उत्पन्नाचे स्रोत शोधणे गरजेचे बनले आहे. यामध्ये महिलांचा सहभाग वाढविणे, त्यांना सक्षम बनविणे, आणि त्यांच्या कुटुंबाला आर्थिक आधार मिळवून देणे अत्यंत महत्त्वाचे ठरते. यासाठीच बचत गट (Self-Help Groups - SHGs) व स्वयंरोजगार गट (Self-Employment Groups) हे प्रभावी माध्यम ठरले आहेत.

बचत गट म्हणजे एक छोटा संघ ज्यामध्ये मुख्यतः ग्रामीण महिलांचा समावेश असतो. या गटातील सदस्य दर महिन्याला ठराविक रक्कम जमा करतात व त्या पैशांमधून गरजूंना कर्ज दिले जाते. या गटांचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे बचत आणि आर्थिक साक्षरता वाढवणे. या माध्यमातून महिला आर्थिकदृष्ट्या सक्षम होतात, आणि त्यांच्या आत्मविश्वासात भर पडते.

ग्रामीण भागातील बचत गट हे आर्थिक सक्षमीकरणाचे प्रभावी साधन ठरले आहे. विशेषतः महिलांसाठी हे गट एक सामाजिक, आर्थिक आणि वैयक्तिक सशक्तीकरणाचे व्यासपीठ बनले आहे. हे गट स्वयंसहायता बचत गट (Self Help Groups - SHGs) या संकल्पनेवर आधारित असतात. काही महिलांनी मिळून दर महिन्याला ठराविक रक्कम एकत्र करून ती रक्कम गटाच्या गरजेनुसार फिरवली जाते. या गटांचे प्रमुख उद्दिष्ट म्हणजे सदस्यांना लघुवित्त सेवा, अल्पदराने कर्ज, आणि छोट्या उद्योगांसाठी भांडवल उपलब्ध करून देणे होय.

बचत गटांमुळे महिलांमध्ये आत्मविश्वास वाढतो, निर्णय घेण्याची क्षमता विकसित होते आणि त्यांनी सुरू केलेल्या छोट्या व्यवसायांमुळे त्यांचे आर्थिक उत्पन्न वाढते. यामुळे कुटुंबाचे आर्थिक स्वास्थ्य सुधारते. या गटांमधून अनेक महिला पापड तयार करणे, शिवणकाम, कुकिंग क्लासेस, शेतीपूरक व्यवसाय इ. उपक्रम सुरू करतात.

सरकारतर्फेही अशा गटांना विविध योजना, प्रशिक्षण आणि कर्ज सुविधा दिल्या जातात. 'राष्ट्रीय ग्रामीण आजीविका अभिमान' (NRLM²) सारख्या योजनांमुळे या गटांना अधिक बळकटी मिळाली आहे. बचत गट हे ग्रामीण भागातील आर्थिक परिवर्तनाचे एक शक्तिशाली माध्यम झाले आहे.

एकंदरीत, ग्रामीण भागातील बचत गट हे केवळ आर्थिक व्यवहारापुरते मर्यादित न राहता, महिलांचे सामाजिक स्थान मजबूत करणारे आणि त्यांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवणारे एक प्रभावी साधन ठरले आहे.

स्वयंरोजगार गट हे असे गट असतात जे एकत्र येऊन लघुउद्योग, हस्तकला, शेतीपूरक व्यवसाय, पशुपालन, अन्न प्रक्रिया, इ. उद्योग सुरू करतात. सरकार अशा गटांना प्रशिक्षण, आर्थिक मदत आणि कर्ज सुलभतेच्या माध्यमातून प्रोत्साहन देते. 'राष्ट्रीय ग्रामीण आजीविका अभिमान' (NRLM²) हा अशा गटांसाठी महत्त्वाचा कार्यक्रम आहे.

स्वयंरोजगार गट म्हणजे अशा व्यक्तींचा समूह जो एकत्र येऊन कुठला तरी लघुउद्योग, शेतीपूरक व्यवसाय, हस्तकला, अन्न प्रक्रिया, पशुपालन, विणकाम, शिवणकाम, इत्यादी स्वरोजगाराच्या उपक्रमांमध्ये सहभागी होतो. या गटांना शासन विविध योजना, कर्ज व प्रशिक्षण यांच्याद्वारे सहाय्य करते. 'राष्ट्रीम ग्रामीण आजीविका अभिमान' (NRLM²), 'महिला बचत गट योजना', 'प्रधानमंत्री मुद्रा योजना' अशा विविध योजनांचा लाभ घेत हे गट आर्थिक विकासाचे साधन ठरतात. स्वयंरोजगार गटांतून सदस्य मिळून एकत्र व्यवसाय सुरू करतात. हे व्यवसाय लहान प्रमाणात सुरुवातीला असले तरी हळूहळू यशस्वी होऊन स्थिर उत्पन्न देऊ लागतात. अशा गटांमधून महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होता येते. त्यांचा आत्मविश्वास वाढतो, सामाजिक स्थान उंचावते आणि त्यांना कौटुंबिक व सामाजिक निर्णयांमध्ये भूमिका घेता येते. यामुळे गावातील कुटुंबांचे उत्पन्न वाढते व समाजात सकारात्मक परिवर्तन घडते.

महाराष्ट्रातील गोंदिया, यवतमाळ, सातारा जिल्ह्यांतील अनेक महिला गटांनी शेतीपूरक व्यवसाय करून आपले जीवनमान उंचावले आहे. काही गटांनी शेळीपालन, मशरूम उत्पादन, हँडीक्राफ्ट वस्तू तयार करणे, तसेच अन्नप्रक्रिया उद्योग यामध्ये मोठे यश मिळवले आहे. यामुळे त्यांना गावातच रोजगार मिळाला आणि शहरात स्थलांतराची गरज उरली नाही.

स्वयंरोजगार गटांना सुरुवातीला भांडवली गुंतवणूक, व्यवसायाचे ज्ञान, बाजारपेठेची उपलब्धता, विपणन तंत्र यामध्ये अडचणी येतात. पण जर शासन, स्वयंसेवी संस्था आणि स्थानिक यंत्रणा यांच्या मदतीने प्रशिक्षण, कर्ज सुविधा आणि मार्केटिंगची साधने उपलब्ध करून दिली गेली, तर या गटांना अधिक सक्षम बनवता येईल.

ग्रामीण भागातील स्वयंरोजगार गट हे केवळ रोजगाराचे माध्यम नसून ते सामाजिक सशक्तीकरणाचे, आर्थिक स्वावलंबनाचे व आत्मनिर्भर भारताच्या दिशेने टाकलेले पाऊल आहे. अशा गटांना योग्य प्रशिक्षण, आर्थिक सहाय्य आणि मार्गदर्शन दिल्यास ग्रामीण भागाचा आर्थिक चेहरामोहरा बदलू शकतो. हे गट म्हणजे खऱ्या अर्थाने विकासाची बीजे आहेत.

ग्रामीण भागातील बचत गट व स्वयंरोजगार गट हे केवळ आर्थिक स्थैर्याचे नव्हे, तर सामाजिक परिवर्तनाचेही माध्यम आहेत. यामुळे महिलांचे सशक्तीकरण घडते, ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत होते, आणि आत्मनिर्भर भारताचे स्वप्न साकारते. अशा उपक्रमांना अधिकाधिक प्रोत्साहन देणे ही काळाची गरज आहे.

• • •





# सहकार क्षेत्रापुढील आव्हाने व उपाय

**भूमिका वट्टी**, बी.ए. प्रथम

**भारतातील** सहकार क्षेत्र हे ग्रामीण आणि कृषी विकासाचा मुख्य कणा मानले जाते. सहकार चळवळीने शेती, दुग्धव्यवसाय, बँकिंग, मार्केटिंग अशा अनेक क्षेत्रांत ग्रामीण लोकांना आर्थिकदृष्ट्या सक्षम केले आहे.

आपल्या देशातसुद्धा जुलै, १९९१ मध्ये तत्कालीन अर्थमंत्री डॉ. मनमोहन सिंग यांनी नवीन आर्थिक धोरणांचा अंगीकार करण्याचे जाहीर केले. त्यानुसार उदारीकरण, खाजगीकरण व जागतिकीकरण या प्रक्रियांचा अवलंब करण्यात आला. सरकारचा अर्थव्यवस्थेमधील हस्तक्षेप कमी करणे, खाजगी व्यक्ती व संस्थांचा सहभाग वाढविणे, दुसऱ्या देशातील वस्तू, सेवा, भांडवल, तंत्रज्ञान व श्रम यांच्यासाठी आपली अर्थव्यवस्था मुक्त करण्याच्या प्रक्रियेतून सुरू झाली. यामधून स्पर्धेची परिस्थिती निर्माण झाली. या स्पर्धेचा उत्पादक, ग्राहक, कामगार, गुंतवणूकदार या सर्वांना फायदा झाला. परंतु ही स्पर्धा दोन असमान प्रतिस्पर्ध्यामध्ये निर्माण झाली. विकसित देश व प्रगत व्यक्ती यांना या स्पर्धेचा फायदा झाला. अप्रगत व अकार्यक्षम व्यक्ती आणि संस्था यांच्यावर अशा स्पर्धेचे प्रतिकूल परिणाम होतात. महाराष्ट्रासारख्या राज्यात सहकार क्षेत्राने मोठी भरारी घेतली असून, ग्रामीण भागाचा विकास, रोजगारनिर्मिती आणि सामाजिक समता साधण्यात या क्षेत्राचा मोलाचा वाटा राहिला आहे. मात्र सध्या हे क्षेत्र अनेक गंभीर आव्हानांशी झुंज देत आहे.

**राजकारणाचे वाढते हस्तक्षेप :** सहकारी संस्थांवर राजकीय हस्तक्षेप खूप वाढला आहे. अनेक वेळा सहकारी बँका, साखर कारखाने वा अन्य संस्थांमध्ये राजकीय नेत्यांचे वर्चस्व राहते, ज्यामुळे पारदर्शकता आणि कार्यक्षमता यांना बाधा येते. काही ठिकाणी सहकारी संस्थांचा वापर मतपेढीच्या राजकारणासाठी होतो, जे या संस्थांच्या मूळ उद्दिष्टांना धक्का पोहोचवते.

**अपारदर्शक व भ्रष्ट व्यवस्थापन :** बऱ्याचशा सहकारी संस्थांमध्ये व्यवस्थापन हे अपारदर्शक व भ्रष्ट असल्याचे आढळते. आर्थिक व्यवहारांमध्ये गोंधळ, जमाखर्चाच्या खात्यांत अपूर्णता, आणि निधीचा गैरवापर या बाबी सामान्य झाल्या आहेत. त्यामुळे जनतेचा या संस्थांवरील विश्वास डळमळीत झाला आहे.

**तांत्रिक प्रगतीपासून दुरावलेपण :** सहकारी संस्था अद्यापही पारंपरिक पद्धतींवर अवलंबून आहेत. माहिती तंत्रज्ञानाचा वापर, डिजिटल बँकिंग, डेटा विश्लेषण इत्यादी बाबींत सहकारी संस्था मागे आहेत. त्यामुळे त्यांची स्पर्धात्मकता कमी झाली आहे.

**आर्थिक अपयश व कर्जवसुलीचे संकट :** बऱ्याच सहकारी संस्थांना आर्थिक नुकसान सहन करावे लागत आहे. शेती कर्जांची वसुली न होणे, अनुत्पादक गुंतवणूक, व बिनधास्त कर्जवाटपामुळे संस्था तोट्यात जात आहेत. परिणामी, संस्थांचा निधी आटत चालला आहे व त्यातून पुन्हा कर्जवाटप करता येत नाही.

**कमी व बंद होत असलेले शासकीय अनुदान व मदत :** सुरुवातीला सहकार चळवळीच्या विकासासाठी सरकारकडून वेगवेगळ्या प्रकारे मदत केली जात असे. सहकारी संस्थांचे भाग खरेदी करणे, त्यांच्या कर्जरोख्यांची हमी घेणे, सहकारी संस्थांना कर भरण्यामध्ये सवलत देणे, अनुदान देणे इत्यादी. परंतु जागतिकीकरणाच्या प्रक्रियेनंतर सरकारकडून केल्या जाणाऱ्या मदतीमध्ये कपात करण्यात आली तर काही सवलती व अनुदाने बंद करण्यात आली. त्यामुळे सहकारी संस्थांना सरकारच्या मदतीवर अवलंबून रहावे लागते. सरकारी सहाय्याशिवाय विकास साधण्याची कुवत सहकारी क्षेत्राला निर्माण करावी लागेल.

**सदस्यांचा सहभाग व जनजागृतीचा अभाव :** सहकारी संस्थांचे यश हे त्यांच्या सदस्यांवर अवलंबून असते. पण हल्ली सदस्यांचा सक्रिय सहभाग कमी झाला आहे. बहुतांश सदस्यांना संस्थेच्या कामकाजाची माहिती नसते, सभांना उपस्थिती कमी असते आणि निर्णयप्रक्रियेत लोकांचा सहभाग फारच अपुरा असतो.

**शासन धोरणांतील विसंगती :** शासनाच्या धोरणांमध्ये अनेकदा सहकारी क्षेत्राची उपेक्षा होते. बऱ्याच वेळा सहकारी बँकांवर नियमांचे कठोर बंधन असते, जे राष्ट्रीयीकृत बँकांपेक्षा अधिक असते. यामुळे सहकारी बँकांना समान संधी मिळत नाही.

देशातील आर्थिक संकटाचे निवारण करण्यासाठी जुलै १९९१ मध्ये नवीन आर्थिक धोरणांचा अवलंब करण्यात आला. त्यामुळे भारतीय अर्थव्यवस्था जागतिक अर्थव्यवस्थेचा जणू एक घटक बनली. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेने वेग घेतल्यानंतर देशातील नागरिकांचे राहणीमान, जीवनमान व गरजा यामध्ये बदल झाले. सहकारी संस्थांनी स्वतःचे भांडवल आपली आर्थिक कुवत वाढवून आपल्या कार्यात विविधता आणली पाहीजे. सहकार क्षेत्रासमोर जी आव्हाने निर्माण झाली त्या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी खालील उपाय सांगता येतील.

**उपाय :**

**कार्यक्षमता व विश्वासार्हता वाढविणे :** अकार्यक्षमता व गैरव्यवहार यामुळे सहकारी संस्थांच्या व्यवसायाची पत कमी होत आहे. त्यामुळे भांडवल उभारणीवर मर्यादा आल्या आहेत. भागधारकांमध्ये व समाजामध्ये सहकार क्षेत्राची विश्वासार्हता वाढविणे आवश्यक आहे. ज्यामुळे सभासद संख्या वाढविणे शक्य होऊन मोठ्या प्रमाणावर भांडवल उभारणी करणे शक्य होईल. भागधारक, समाज व गुंतवणूकदारांच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी कार्यक्षमता वाढविणे आवश्यक आहे. त्यासाठी पात्र व कुशल मनुष्यबळाची नेमणूक करणे गरजेचे आहे. प्रत्येक व्यवहार व्यावसायिक निकषांच्या आधारे घेण्यात यावेत. विश्वासार्हता वाढवण्यासाठी संस्थेच्या व्यवहारांमध्ये पारदर्शकता असली पाहीजे.

**आधुनिक तंत्राचा वापर :** सहकारी संस्था आपल्या व्यवसाय, उद्योग किंवा व्यापारांमध्ये परंपरागत व श्रमप्रधान तंत्राचा वापर करतात. त्यामुळे उत्पादन खर्च वाढतो आणि वस्तूंचा दर्जा सुद्धा दुय्यम प्रतीचा असतो. आजच्या स्पर्धेच्या युगात टिकून राहण्यासाठी आधुनिक तंत्राचा वापर करणे गरजेचे आहे. नवनवीन तंत्रज्ञान आत्मसात करून आधुनिक उत्पादन साधनांचा वापर आपल्या उत्पादन प्रक्रियेमध्ये केला पाहिजे.

**प्रभावी जाहिरातीचा अवलंब :** स्थानिक बाजारपेठ टिकवून ठेवणे, त्याच बरोबर आपल्या उत्पादन व सेवेची बाजारपेठ यांचा विस्तार करण्यासाठी वेगवेगळ्या जाहिरात माध्यमांचा वापर करणे, वेगवेगळ्या भाषांमधून ग्राहकांशी संपर्क साधून ग्राहक संख्या वाढविणे हा सुद्धा एक महत्त्वाचा उपाय आहे. ज्याद्वारे सहकारी संस्थांना बाजारपेठेचा विस्तार करणे शक्य होईल.

**आर्थिक स्वावलंबनावर भर :** जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमध्ये सहकार क्षेत्राला सरकारकडून दिल्या जाणाऱ्या सवलती, मदत, अनुदाने यांचे प्रमाण कमी केले जाते. सहकारी संस्थांना कर भरण्यामध्ये दिल्या जाणाऱ्या सवलती कमी केल्या जातात. त्यामुळे सरकारी मदतीवर अवलंबून न राहता आर्थिक स्वावलंबन प्राप्त केले पाहिजे. त्यासाठी उत्पन्न व खर्चाचे योग्य नियोजन, ताळमेळ असणे आवश्यक आहे. सहकारी संस्थांनी स्वभांडवल वाढवण्याचे वेगवेगळे मार्ग शोधून त्यांचा अवलंब केला पाहिजे. सहकार तत्त्वांच्या मर्यादेत राहून उत्पन्नाचे वेगवेगळे मार्ग सहकारी संस्थांनी शोधले पाहिजेत.

**कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देणे :** सहकार चळवळीचा गुणात्मक विकास होण्यासाठी सहकारी संस्थामधील सभासद कर्मचारी यांना प्रशिक्षण देऊन, सहकाराचे शिक्षणाबरोबर व्यावसायिक प्रशिक्षण द्यावे लागेल. त्यामुळे प्रत्यक्ष व्यवहारात सहकारी तत्त्वांचा अवलंब करून सहकारी संस्थांनी गुणात्मक विकास साध्य करण्याचा प्रयत्न करावा.

**उच्चशिक्षित, तज्ज्ञ, अनुभवी व्यवस्थापकांची नेमणूक :** सध्याच्या जागतिक अर्थव्यवस्थेमध्ये स्पर्धात्मक बाजारपेठेतील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी तज्ज्ञ, कुशल व प्रशिक्षित कर्मचाऱ्यांची नेमणूक करणे अत्यंत गरजेचे आहे. तसेच सहकारी संस्थेने आधुनिक व्यवस्थापन पद्धतीचा स्वीकार करावा.

**संघटनात्मक बदल :** सहकारी संस्था आर्थिकदृष्ट्या कमकुवत आहेत. त्यांच्या उत्पादनाचे प्रमाणही अल्प आहे.

परंतु बहुराष्ट्रीय कंपन्या आर्थिकदृष्ट्या बळकट आहेत. तसेच त्यांच्या उत्पादनाचे प्रमाणही प्रचंड आहे. त्यामुळे कोणतीही एक सहकारी संस्था प्रचंड आकाराच्या बहुराष्ट्रीय कंपन्यांशी स्पर्धा करू शकत नाही. त्यासाठी सहकारी संस्थांनी राज्य व राष्ट्रीय पातळीवर एकत्रित येऊन आपला संघ निर्माण केला पाहिजे व आपली आर्थिक क्षमता वाढवली पाहिजे. जे प्रश्न एक सहकारी संस्था आपल्या पातळीवर सोडवू शकत नाहीत ते प्रश्न सहकारी संघ व महासंघ यांच्या माध्यमातून सोडवण्याचा प्रयत्न करण्यात यावा.

**ग्राहकांच्या समाधानासाठी प्रयत्न :** स्पर्धात्मक बाजारपेठेत ग्राहकांचे समाधान होणे आवश्यक असते. ग्राहक हा बाजारपेठेचा राजा असतो. ग्राहकांच्या बदलत्या गरजा लक्षात घेऊन त्यांच्या समाधानासाठी कमीत कमी किंमतीत चांगल्या दर्जाच्या वस्तू व सेवा पुरवल्या पाहिजेत. यासाठी सहकारी संस्थांनी आपल्या कार्यक्षमतेत वाढ घडवून आणणे आवश्यक आहे. ग्राहकांच्या हितासाठी विविध योजना सुरू केल्या पाहिजेत, म्हणून सहकारी संस्थांना बाजारपेठांचे संशोधन करावे लागणार आहे व ग्राहकांना वस्तू पुरविण्याच्या पद्धतीत बदल करावा लागेल. ज्यामुळे ग्राहक व समाज सहकार क्षेत्राकडे आकर्षित होईल.

**ग्रामीण विकासासाठी प्रयत्न :** सहकार चळवळ ही ग्रामीण भागाच्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक विकासात महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आली आहे. मुक्त अर्थव्यवस्थेमुळे सहकार चळवळीचे अस्तित्वच धोक्यात आले आहे. परंतु सहकार चळवळीने स्वत:ला स्पर्धेसाठी सक्षम बनवून ग्रामीण भागातील गरजा एक सामाईक आर्थिक प्रश्न याचा विचार करून व्यवसाय उद्योग उभारला पाहिजे आणि त्यातून ग्रामीण भागाच्या विकासासाठी आपले योगदान वाढविणे आवश्यक आहे. ग्रामीण भागाच्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक विकासासाठी विविध उपक्रमांच्या माध्यमातून प्रयत्न केले पाहिजेत. उदा. वृक्षारोपण, रक्तदान शिबीर, पर्यावरण संरक्षणावर संवाद, कला व क्रीडा स्पर्धांचे आयोजन, व्याख्यानांचे आयोजन इत्यादी.

**आधुनिक बँकिंग सुविधा :** सहकारी पतपुरवठा संस्था व सहकारी बँकांनी सुद्धा राष्ट्रीयकृत व व्यापारी बँका प्रमाणे आधुनिक बँकिंग तंत्राचा वापर करावा. त्यासाठी कोअर बँकिंग, ए.टी.एम., क्रेडिट कार्ड इत्यादी आधुनिक बँकिंग सुविधा वाढविणे आवश्यक आहे. यासाठी बँकांना भांडवल क्षमता व कार्यक्षमता वाढवून पतपुरवठा क्षेत्रातील आपले स्थान टिकवून ठेवण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे.

**कर्ज वसुलीवर भर :** सहकारी पतसंस्था व सहकारी बँकांनी व्यापारी बँकाप्रमाणे पात्र व्यक्ती व संस्थांना कर्ज वाटप केले पाहिजे. दिलेल्या कर्जाच्या वसुलीसाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना केल्या पाहिजे. वाटप केलेल्या कर्जाचा विनियोग योग्य कारणासाठी होतो किंवा नाही यावर नियंत्रण ठेवणे तसेच कोणताही भेदभाव न करता कर्जवसुलीसाठी, नि:पक्षपातीपणे व कठोर कारवाई करणे आवश्यक आहे. जेणेकरून सहकारी संस्थेची थकबाकी मोठ्या प्रमाणावर वाढणार नाही.

•••



## सहकार कविता



### गाथा सहकाराची

एकटे काही शक्य नाही,
एकत्र चालतं सारं काही ।
हातात हात, मनात विश्वास,
सहकार हा प्रगतीचा श्वास ।

शेती, उद्योग, की सहविकास,
सर्वांच्या हितासाठीच असतो प्रयास ।
नफा नसतो फक्त एकट्याचा,
वाटतो तो प्रत्येक जणाचा ।

गाव उभं राहिलं सहकाराने,
नवा सूर्य उगवला शेतकऱ्याने ।
साखर कारखाने, दूध संकलन,
हेच तर देशाचं बळकटीकरण ।

लोकशाहीचा खरा अर्थ जाणवतो,
जेव्हा सर्वांचा निर्णय मान्य होतो ।
नेतृत्व इथं सर्वांचं असतं,
प्रत्येक व्यक्तीचं योगदान असतं ।

चल पुढं, घडवूया नवा विचार,
सहकारातच आहे उज्वल उद्या-कार ।
शिकवूया पुढच्या पिढीला ही शपथ,
सहकार्य हेच जीवनाचं सत्य !

**दुर्गेश्वरी सांडील**
बी.ए. - द्वितीय

### सहकाराचे मंत्र

घेऊन सहकाराचे मंत्र मनी,
चाललो आम्ही नवा उजळूनि धनी ।
संपत्ती नाही तरी मन श्रीमंत,
एकजुटीचा मंत्र, आम्हा अनंत ।।

गावकुसाबाहेर स्वप्नं उभी,
मेहनतीची घामात भिजलेली नाभी ।
शेती, दुध, साखर, बँका आपुल्या,
घडवितो भाग्य आमुच्या हाताळल्या ।।

स्वार्थाचा नाही इथे गंध कुठे,
सर्वांचे सुखच खरे आमुचे नाते ।
नेहमीच पुढे, सहकाराचे पंथ,
माणुसकीच्या गाभ्याचे हेच संत ।।

आमची सभा, आमचा निर्णय,
हक्काने चालतो आमचा व्यवसाय ।
श्रमाची पूजा, विकासाचे देणे,
मिळून राहणे हेच आमुचे घेणे ।।

घेऊन सहकाराचे मंत्र मनी,
उगवा नवा तेजाचा किरण पुन्हा ।
भारताचे बळ, ग्रामजनांचे स्वप्न,
सहकारातून घडो नवभारत।।

**राकेश उईके**
बी.ए. - द्वितीय



## सहकार दीप जळू दे...

सहकाराचा ज्वाला पेटी, जनतेच्या आशा जागती,
महाराष्ट्राच्या मातीला, द्रष्ट्यांची ही गाथा गाती!

वसंतरावांचे धोरण गाढ,
साखर कारखाने घडले वाढ,
शेतकऱ्यांच्या स्वप्नांनं भरली
सहकाराला दिशा मिळाली!

शरद पवारांचा ठाम इशारा,
बारामतीचा झाला उजियारा,
दूध-दाण्याला दिली गती,
बँकिंगमध्ये नवी भरती!

यशवंतरावांचे तेज रुजले,
गावागावात सहकार फुलले,
पायाभूत रचनेचा पाया,
रचला त्यांनी विकासमाया!

दादासाहेबांचा न्यायासाठी,
दलितांच्या सहकाराची बातमी,
समतेची बीजे त्यांनी पेरली,
वंचितांना आशा दिली!

गुलाबरावांनी उभारले संघ,
दूध साखरेच्या घेतले रंग,
किसानांचं बळ वाढवताना,
स्वावलंबनाचं पाणी वाहना!

विक्रमराजेंची दूरदृष्टी,
कोल्हापुरात बँकांची नवी सृष्टी,
राजारामबापूंचा बोल भारी,
सहकार हा समाजाचा आधार भारी!

भाऊसाहेब हिरेमठांची वाट,
शिक्षणात दिली सहकार गाठ,
संस्थांचे पाय मजबूत केले,
विद्यार्थ्यांमध्ये ज्ञानाचे बीज पेरले!



कर्मवीर भाऊरावांचा मंत्र,
शिका, शिकवा तोच पंथ,
श्रमिक विद्यार्थ्यांची शिक्षणगाथा,
सहकारातून नवी दिशा साकारता!

डी.सी. देशमुखांचे पहिले पाऊल,
सहकार चळवळीचा खरा मजकूर,
मूलगामी विचारांचे झरे वाहिले,
ग्रामीण जीवनात नवतेचे झरे राहिले!

वंदन या थोर यज्ञकर्त्यांना,
सहकाराच्या दीपज्वालांना,
मातीत रुजली त्यांची कीर्ती,
सहकाराचीच ही विजययात्रा नित्य!

• • •

**कु. साक्षी कोडापे**, बी.ए. तृतीय



## स्वतःसाठी नाही, सगळ्यांसाठी

स्वतःसाठी नाही, सगळ्यांसाठी,
हा मंत्र आहे सहकारासाठी।
हातात हात घालूनी सारे,
घडवू स्वप्नांचे नवे उजाळे।

शेतातलं सोनं उगम घेई,
जेव्हा शेतकरी एकत्र येई
साखर कारखाने, दूध संघ बांधती,
गावची प्रगती गावच घडवी।

ना धनाचा लोभ, ना पदाचा आग्रह,
सहकार शिकवतो एकतेचा पाठ।
नफा वाटू सारे, हक्काने नाही,
तर कष्टावर चाललेली ही साखळी आहे काही।

स्त्रियांचा गट, बचतीची शाळा,
स्वाभिमान घेई हाती नवा उजाळा।
शिकते स्वतः, शिकवते इतरांना,
स्वावलंबन मिळते सर्वांना।

अमूलचं दूध, विखेंचं स्वप्न,
कुरियनांचं विज्ञान, लोकांचं तपस्वत्त्व।
सहकार म्हणजे लोकांचा आवाज,
लोकशाहीतून उभा राहिलेला समाज।

म्हणुनी घे हा विचार मनाशी,
प्रत्येक काम कर 'आपल्या' भावनेशी।
स्वतःसाठी नाही, सगळ्यांसाठी,
हीच ओळख भारताच्या सहकारासाठी।

• • •

(साभार : समाजमाध्यम)

**सावी कुमरे**, एम.ए. द्वितीय (समाजशास्त्र)

## हातात हात, बचतीची बात

गावकुसातल्या मातीमध्ये, एक नवा उजेड दिसतो,
साऱ्या बहिणींनी एकत्र येऊन, आत्मविश्वासाचा दीवा पेटतो।
बचतीच्या छोट्या हिशेबातून, उभं राहतं स्वप्न मोठं,
सहकाराच्या आधारावर चालतं हे घरटं गोडगोड ठसठशीत।

गाठीभर पैसा नाही, पण हृदयात होती आशा,
त्या आशेनेच सुरू झाला बचत गटांचा प्रवास खासा।
कोणी बनवते पापड, कोणी उभी करते भाजीची गाडी,
स्वतःच्या पायावर उभी राहते प्रत्येक बाई, निसंकोच, सरळ, साधी।

सिलाई मशीन असो वा मेणबत्त्यांची कला,
या गटांतून निर्माण होतो जगण्याला नवा झळाळा।
सहकार्य, मदत, आणि सामूहिक यशाचा मंत्र,
यांनी बदललाय गावोगावचा महिलांचा आत्मविकासाचा केंद्र।

कधी बँक जिंकली, कधी उद्योग केला,
या गटांनी पुरुषप्रधान संकल्पनाच हलवून टाकल्या।
'आम्ही करू शकतो' हा विश्वास त्यांनी साजरा केला,
स्वावलंबन, सन्मान आणि स्वप्नांचा मेळ साधला।

• • •

(साभार : समाजमाध्यम)

**सोनाली बन्सोड**, बी.ए. द्वितीय



## गोड स्वप्नांची गोड वाट
## सहकारी साखर कारखाने

गावकुसापलीकडचं स्वप्न एक गोड,
उसाच्या रांगेतून उगम पावला रोड।
शेतकऱ्याच्या घामात होती जी आस,
सहकार तत्त्वानं दिला त्यास श्वास।

एका हातात फावडे, दुसऱ्या हातात मत,
घडवू लागला कारखाना गावचा नवमत।
ना भांडवल मोठं, ना सत्ता कुणाची,
सामूहिक बळानं लढली एक लढाई खरी।

विठ्ठलराव विखे पाटलांनी घेतला पहिला दीवा,
''प्रत्येकाचा सहभाग, हीच खरा दावा!''
प्रत्येक उसाला मिळाला न्याय,
शेतकरी झाला मोठा मालामाल।

गावागावात उभे राहिले उंच चिमण्या,
साखरेच्या थेंबात दडल्या, शेतकऱ्यांच्या
स्वप्नजालाच्या कहाण्या।
नोकऱ्या मिळाल्या, रस्ते बांधले,
गावांनी गावांशी हात मिळवले।

साखरेसोबत शिक्षण, आरोग्य, संधी,
सहकाराच्या मुळाशी होती माणुसकीची नांदी।
लोकशाही कारभार, सभासदांचा हक्क,
एकजुटीच्या पावलांवर प्रगतीचा नेक।

अर्थकारणात योगदान, समाजकारणात भाग,
सहकारी साखर कारखान्यांनी उभारला
स्वाभिमानाचा धागा अगदी जाग।
गोडी फक्त साखरेची नव्हे, या वाटचालीचीही आहे,
ही कविता त्या सहकाराच्या प्रेरणास्रोतांना वाहते।

• • •

**पायल मचिरके**, बी.ए. अंतिम

## बचत गटाची शान
## (ग्रामीण खेड्यांची जान)

खेड्यातल्या मातीमध्ये, स्वप्नं उगवतात रोज,
सूर्याच्या कवडशांतून, उमटते आशेची ओज।
जिथे पाण्याचीच धावपळ, तिथे उगमला विश्वास,
बचत गटाने उभारला, स्वावलंबनाचा कास।

आई-बहिनींचा निर्धार, हातात हात घेती,
थोडं थोडं जमा करून, मोठं भविष्य सेती।
मातीच्या घरातून निघते, बळकट उद्योगाची वाट,
स्वप्नांना देतात पंख, उडती आभाळात।

शेतीपूरक व्यवसाय, छोटे मोठे उद्योग,
बचत गटाच्या जोरावर, लखलखते जीवनरंग।
नव्या युगाची पाऊले, चालती अभिमानाने,
गावागावातल्या स्त्रिया, चमकती कर्तृत्वाने।

संघशक्तीचा विजय गीत, प्रत्येक जणी गाते,
बचत गटाच्या गोष्टी, नव्या आशा पेरते।
खेड्यातील ह्या चळवळीला, सलाम करू या सारे,
बचतीतून संपन्नतेकडे, पाऊल टाकले न्यारे।

• • •

**रीतेश नाकाडे**, बी.ए. अंतिम

# मराठी विभाग



# तबल्याचा बादशाह झाकीर हुसेन

**अस्पाक शेख**, बी.ए. द्वितीय

**उस्ताद** अल्ला रखा कुरेशी या दिग्गज तबलावादकाच्या घरी झाकीर हुसैन यांनी जन्म घेतल्यामुळे लहानपणापासूनच तबल्याचे ताल त्यांच्या कानावर पडले होते. असं सांगितलं जातं की, त्यांचा जन्म झाल्यावर वडिलांनी त्यांना हातात घेतल्यावर त्यांच्या कानात कुराणच्या आयत वाचल्या नाहीत, तर तबल्याचे बोल ऐकवले होते. झाकीर हुसैन यांना तबला वादन इतकं आवडत होतं की त्यांच्या हाती एखादं भांडं आलं तरीही त्यातून ते एखादा सूर काढून दाखवत होते. वयाच्या तिसऱ्या वर्षी त्यांनी पहिल्यांदा तबला वादन केलं आणि १२व्या वर्षापासून ते वडिलांसह कार्यक्रमांमध्ये तबला वादन करत होते. जेव्हा ते १२ वर्षांचे होते त्यावेळी पंडित रविशंकर, उस्ताद अली अकबर खान, उस्ताद बिस्मिल्लाह खान, पंडित शांता प्रसाद आणि पंडित किशन महाराज यांना भेटले. आई बीवी बेगम यांना मात्र त्यांचं हे तबलावादन आवडत नव्हतं. पण नंतर त्यांच्या आईंनी सर्व गोष्टी स्वीकारल्या.

हिंदुस्तानी शास्त्रीय संगीताच्या अनेक दिग्गजांची साथ लाभल्यामुळे कमी वयातच झाकीर हुसैन तबल्याचे मास्टर झाले. १९७३ साली त्यांनी पहिल्यांदाच 'लिविंग इन द मटेरियल वर्ल्ड' या जॉर्ज Harrison च्या अल्बमसाठी काम केलं, ज्याला भरपूर प्रसिद्धी मिळाली आणि भारतीय संगीतविश्वात जाकीर हुसैन हे नवीन नाव जोडलं गेलं. यानंतर हार्ड वर्क, Into The Music, Powerlight अशा International अल्बम्ससाठी काम केलं. यासोबतच भारतातही त्यांनी विविध ठिकाणी संगीत समारोह सुरू केले. त्यांची एक विशेषता म्हणजे तबल्यासोबत इतर वाद्यांची किंवा गायकांची जुगलबंदी! अमेरिकन Jazz आणि भारतीय तबल्याचं एकत्र करण्याचं श्रेय त्यांना जातं आणि या प्रयोगामुळेच त्यांना जगभरात प्रसिद्धी मिळाली. १९७५ दरम्यान त्यांनी शक्ती या Brand सोबत संगीतातले आणखी प्रयोग करायला सुरुवात केली होती. संगीत क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल १९८८ साली त्यांना सरकारकडून पद्मश्री पुरस्कार देण्यात आला. त्यावेळी ते सर्वांत तरुण पद्म पुरस्कार विजेते होते. यावेळी त्यांचे वडील इतके खुश झाले होते की, आपल्या हातांनी जाकीर हुसैन यांना हार घातला होता. त्याच वेळी पंडित रविशंकर यांनी जाकीर हुसैन यांना पहिल्यांदा उस्ताद म्हणून संबोधलं आणि ही उपाधी आयुष्यभरासाठी त्यांना १९९२ साली मिकी हार्टसोबत Planet Drum हा अल्बम तयार केला होता. त्याला वर्ल्ड Best म्युझिक अल्बमचा खिताब मिळाला होता. त्यांच्या या अल्बमचे ८ लाख रेकॉर्ड्स विकले गेले होते. संगीत क्षेत्र वगळता जाकीर हुसैन यांनी कित्येक चित्रपटांमध्ये काम केले. यामध्ये 'हीट अँड डस्ट' या ब्रिटिश चित्रपटाचा समावेश आहे. याशिवाय 'साज' या बॉलिवूड चित्रपटात त्यांनी शबाना आजमीसोबत काम केलं होतं. काही मलयालम चित्रपटांनाही त्यांनी संगीत दिले. त्यांचा चित्रपटांशी निगडीत अजून एक किस्सा म्हणजे 'मुघल-ए-आझम' या चित्रपटात सलीमच्या धाकट्या भावाच्या भूमिकेची ऑफर झाकीर हुसेन यांना देण्यात आली होती. पण, त्यावेळी त्यांच्या वडिलांनी ते मान्य केलं नाही. आपल्या मुलाने फक्त संगीतावर लक्ष केंद्रित करावं, असं ते

म्हणाले. संगीत, चित्रपट आणि बरच काही जाकीर हुसैन भारतीय म्युझिक इंडस्ट्रीत एक नाव झाले. २००२ साली त्यांना पद्मभूषण पुरस्काराने गौरवलं गेले.

जाकीर हुसैन यांची 'वाह ताज'ची जाहिरात आणि त्यामधलं तबलावादन तर नव्वदीच्या लोकांसाठी एक अविस्मरणीय आठवण! अजून एक खास गोष्ट म्हणजे, ऑल-स्टार ग्लोबल संगीत समारोहामध्ये सहभागी होण्यासाठी झाकीर हुसेन यांना बराक ओबामा यांनी व्हाईट हाऊसमध्ये आमंत्रित केलं होतं. व्हाईट हाऊसच्या समारोहात आमंत्रित केलेले ते पहिले भारतीय म्युझिशियन आहेत. आपल्या संपूर्ण कारकिर्दीत त्यांना ७ वेळा Grammy नॉमिनेशन मिळाले होते, ज्यामध्ये ४ वेळा त्यांनी हा खिताब जिंकला. २०२३ साली आपल्या शक्ती या Brand सोबत ते पुन्हा चर्चेत आले. त्यांनी तयार केलेल्या This Moment या अल्बमला ४ Grammy Award मिळाले. आणि एकसाथ तीन Grammy -ward जिंकणारे ते एकमेव भारतीय ठरले. याच वर्षी त्यांचा आणखी एका पद्मपुरस्काराने सन्मान झाला आणि ते पद्मविभूषण उस्ताद जाकीर हुसैन झाले. गेल्या काही महिन्यांपासून ते फुफुसांच्या आजाराने त्रस्त होते. असा हा कलावंत १६ डिसेंबर २०२४ ला काळाच्या पडद्याआड गेला.

• • •





# भारतातील महाकुंभ

**लोचन झोडे**, बी.एस्सी. अंतिम

**भारत** हा विविध संस्कृती, परंपरा आणि आध्यात्मिक चैतन्याने नटलेला देश आहे. इथल्या अनेक धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरांमध्ये महाकुंभमेळा ही एक अद्वितीय आणि भव्य परंपरा आहे. हजारो वर्षांपासून चालत आलेला हा सोहळा केवळ धार्मिक महत्त्वाचा नाही तर तो भारतीय संस्कृतीच्या महान परंपरेचे द्योतक आहे.

महाकुंभमेळ्याचा उल्लेख पुराणांमध्ये तसेच महाभारत व रामायण यांसारख्या महाकाव्यांमध्ये आढळतो. असे मानले जाते की, समुद्र मंथनाच्या वेळी अमृत कलशासाठी देव आणि दानवांमध्ये संघर्ष झाला. या संघर्षात अमृताचे काही थेंब पृथ्वीवरील चार ठिकाणी पडले – हरिद्वार, प्रयागराज (अलाहाबाद), उज्जैन आणि नाशिक त्यामुळे या ठिकाणीच महाकुंभमेळ्याचे आयोजन केले जाते.

महाकुंभमेळा प्रत्येक १२ वर्षांनी चार ठिकाणी भरतो – १. हरिद्वार – गंगा नदीच्या काठावर, २. प्रयागराज (अलाहाबाद) – गंगा, यमुना आणि अदृश्य सरस्वती नद्यांच्या संगमावर, ३. उज्जैन – क्षिप्रा नदीच्या काठावर, ४. नाशिक – गोदावरी नदीच्या काठावर हा मेळा भरतो, तर अर्धकुंभमेळा प्रत्येक ६ वर्षांनी आयोजित केला जातो. प्रयागराज येथे दर १४४ वर्षांनी एक 'महामहाकुंभ' आयोजित केला जातो, ज्याला विशेष महत्त्व आहे. महाकुंभमेळा हा केवळ धार्मिक सोहळा नसून तो भारताच्या संस्कृतीचा एक महत्त्वाचा भाग आहे.

**आध्मात्मिक महत्त्व –** हिंदू धर्मात कुंभमेळ्याला मोक्षप्राप्तीचा एक मार्ग मानला जातो. असे मानले जाते की, या काळात पवित्र नद्यांमध्ये स्नान केल्याने पापांपासून मुक्ती मिळते.

**संतांची महासभा –** देशभरातील साधू, संत, महंत, आणि योगी यांची येथे मोठी परिषद भरते. अनेक आखाडे आणि संप्रदाय आपली परंपरा या ठिकाणी प्रदर्शित करतात.

**सामाजिक एकात्मता –** या मेळ्यात देशभरातून आणि परदेशातून लाखो भाविक एकत्र येतात. यात सामाजिक समरसता आणि बंधुत्वाचा संदेश दिला जातो.

**आर्थिक परिणाम –** महाकुंभमेळ्यामुळे त्या भागात मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्माण होतो. पर्यटन, व्यापार, धार्मिक साहित्य, तसेच वाहतूक व निवास व्यवस्थेचा मोठा व्यवसाय होतो.

महाकुंभमेळ्याच्या मुख्य आकर्षणांपैकी एक म्हणजे शाही स्नान. हे स्नान साधू-संतांच्या नेतृत्वाखाली ठरलेल्या मुहूर्तावर केले जाते. या व्यतिरिक्त प्रवचने, धार्मिक विधी, यज्ञ आणि भजन-कीर्तन आयोजित केले जाते. अनेक धार्मिक आणि सामाजिक संघटना या मेळ्यात सहभाग घेतात. महाकुंभमेळ्यात कोट्यवधी लोक सहभागी होतात, त्यामुळे त्याच्या व्यवस्थापनाला मोठे महत्त्व असते. राज्य सरकार आणि केंद्र सरकार यांच्या सहकार्याने विस्तृत योजना आखल्या जातात. पोलिस सुरक्षा, वाहतूक, आरोग्य सेवा, अन्न व निवास व्यवस्था यांची काटेकोर योजना केली जाते.

तंत्रज्ञानाच्या वाढत्या वापरामुळे आता महाकुंभमेळ्याच्या व्यवस्थापनात सुधारणा झाल्या आहेत. डिजिटलीकरण, ऑनलाइन नोंदणी तसेच वाहतूक आणि स्वच्छतेसाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जात आहे. यामुळे भाविकांचा अनुभव अधिक सुखकर होत आहे. महाकुंभमेळा हा केवळ एक धार्मिक सोहळा नसून तो भारतीय संस्कृती, श्रद्धा आणि सामाजिक एकात्मतेचे प्रतीक आहे. हा मेळा भारताच्या गौरवशाली परंपरेचे दर्शन घडवतो आणि संपूर्ण जगाला एकतेचा संदेश देतो. लाखो भाविकांचा सहभाग आणि धार्मिक उर्जा यामुळे महाकुंभ हा एक अद्वितीय आणि भव्य सोहळा ठरतो.

• • •




# महिलांचे रक्षण करणारा पोस्को कायदा

**कु. योगिता नाकाडे,** बी.ए. अंतिम

**भारतात** महिलांवरील अत्याचार आणि लैंगिक शोषणाच्या घटनांमध्ये वाढ होत आहे. अशा गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी आणि महिलांना तसेच बालकांना सुरक्षित वातावरण प्रदान करण्यासाठी विविध कायदे अस्तित्वात आले आहेत. त्यापैकी एक महत्त्वाचा कायदा म्हणजे लैंगिक अपराधांपासून बालकांचे संरक्षण अधिनियम, २०१२ (Protection of Children from Sexual Offences Act, 2012) किंवा पोस्को कायदा. याचा उद्देश अल्पवयीन मुले आणि महिलांचे लैंगिक शोषणापासून संरक्षण करणे आहे.

**पोस्को कायद्याची गरज आणि उद्दीष्टे :** भारतात बालक आणि महिलांवरील लैंगिक शोषणाच्या घटना गंभीर सामाजिक समस्या बनल्या आहेत. यावर प्रभावीपणे कारवाई करण्यासाठी कठोर कायद्यांची आवश्यकता होती. या पार्श्वभूमीवर २०१२ मध्ये पोस्को कायदा लागू करण्यात आला. या कायद्याची प्रमुख उद्दीष्टे खालीलप्रमाणे आहेत :

१. लैंगिक शोषणाच्या घटना रोखणे – बालक आणि महिलांच्या सुरक्षेसाठी कठोर नियमावली तयार करणे.
२. दोषींना कठोर शिक्षा – लैंगिक अत्याचार करणाऱ्यांना कठोर शिक्षेची तरतूद करणे.
३. जलद न्यायदान प्रक्रिया – पीडितांना त्वरित न्याय मिळावा यासाठी विशेष न्यायालयांची स्थापना.
४. पीडितांच्या गोपनीयतेचे संरक्षण – पीडिताच्या नावाची आणि माहितीची गोपनीयता राखण्याची तरतूद.
५. संवेदनशील चौकशी प्रक्रिया – पीडित बालक आणि महिलांसोबत चौकशी करताना त्यांच्या मानसिक आणि शारीरिक स्थितीची काळजी घेणे.

**पोस्को कायद्याच्या प्रमुख तरतुदी :**

**१. लैंगिक अत्याचाराचे विविध प्रकार**

- शरीरसंबंध जबरदस्तीने ठेवणे किंवा त्याचा प्रयत्न करणे.
- अश्लील कृत्ये, गैरवर्तन किंवा छळ करणे.
- मुलांचे लैंगिक शोषण करणारी सामग्री तयार करणे किंवा प्रसारित करणे.

**२. शिक्षेच्या तरतुदी**

- लैंगिक अत्याचाराच्या गुन्ह्यासाठी कमीत कमी १० वर्षे शिक्षा, तर गंभीर प्रकरणात जन्मठेपेची तरतूद.
- लैंगिक गैरवर्तन केल्यास ३ वर्षांपासून ५ वर्षांपर्यंतची शिक्षा.
- बालकांचे अश्लील चित्रण किंवा पॉर्नोग्राफी निर्मिती केल्यास कठोर शिक्षा.




३. **जलदगती न्याय आणि विशेष न्यायालये**

- या कायद्यांतर्गत प्रकरणे १ वर्षाच्या आत निकाली काढण्याची तरतूद आहे.
- पीडित बालकांसाठी विशेष कोर्ट आणि महिला अधिकाऱ्यांची नेमणूक केली जाते.

४. **बालकांसाठी सहाय्य आणि पुनर्वसन**

- शारीरिक आणि मानसिक पुनर्वसनासाठी सल्लागार आणि संरक्षण गृह उपलब्ध करून दिले जातात.
- शासकीय यंत्रणांद्वारे विशेष पुनर्वसन योजना लागू केल्या जातात.

**महिलांच्या सुरक्षेसाठी पोस्को कायद्याचे महत्त्व :**

१. **लैंगिक शोषणाला आळा बसतो –** कठोर शिक्षेमुळे गुन्हेगारांना जरब बसते आणि महिलांची सुरक्षा वाढते.

२. **गोपनीयता आणि सन्मान –** पीडित महिलांना कोणत्याही सामाजिक कलंकाशिवाय न्याय मिळतो.

३. **बालक आणि महिलांचे सशक्तीकरण –** कायद्यामुळे महिलांना त्यांच्या हक्कांची जाणीव होते आणि ते आत्मनिर्भर होतात.

४. **जलद न्यायदान प्रणाली –** पीडितांना लवकर न्याय मिळावा यासाठी विशेष न्यायालयांची स्थापना केली गेली आहे.

**पोस्को कायद्याची अंमलबजावणी आणि आव्हाने :** जरी पोस्को कायदा प्रभावी असला तरी त्याच्या अंमलबजावणीस काही अडचणी येतात :

- **तपास प्रक्रियेत विलंब –** पोलिस तपास आणि न्यायालयीन प्रक्रिया अनेकदा लांबणीवर पडते.
- **सामाजिक दबाव आणि पीडितांचे संरक्षण –** अनेक वेळा पीडितांवर समाज आणि कुटुंबीयांकडून दबाव टाकला जातो.
- **जागृतीचा अभाव –** ग्रामीण भागात या कायद्याविषयी जागरूकतेचा अभाव आहे.
- **फसव्या तक्रारींमध्ये वाढ –** काही प्रकरणांमध्ये खोटी तक्रार करून कायद्याचा गैरवापर केला जातो.

पोस्को कायदा हा महिलांचे आणि बालकांचे संरक्षण करण्यासाठी महत्त्वपूर्ण पाऊल आहे. कठोर शिक्षेच्या तरतुदींमुळे गुन्हेगारी प्रवृत्तीला आळा बसतो आणि पीडितांना न्याय मिळण्यास मदत होते. मात्र, या कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सरकार, पोलीस, न्यायव्यवस्था आणि समाजाने एकत्र येऊन कार्य करण्याची आवश्यकता आहे. योग्य प्रशिक्षण, लोकसहभाग आणि कठोर अंमल-बजावणीद्वारेच हा कायदा अधिक प्रभावी ठरू शकतो. त्यामुळे महिलांचे संरक्षण आणि सशक्तीकरण हे पोस्को कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीवर अवलंबून आहे. एकंदरित महिलांचे रक्षण करणारा हा कायदा आहे.

• • •




# भौतिकशास्त्र : विश्वाचे रहस्य उलगडणारा

**रोनाल्ड शेंडे**, बी.एस्सी. द्वितीय

**माणूस** हा जिज्ञासू प्राणी आहे. त्याला जीवन जगताना अनेक प्रश्न पडतात. जगाच्या उत्पत्तीपासून ते आजच्या विज्ञानयुगापर्यंत माणसाची एकच जिज्ञासा राहिली आहे – हे विश्व कसे कार्य करते? याच प्रश्नाच्या उत्तरांचा शोध म्हणजे भौतिकशास्त्र. ही केवळ शास्त्रीय शाखा नसून, निसर्गाच्या मूलभूत नियमांची उकल करणारे महान विज्ञान आहे. हेच भौतिकशास्त्र आपल्या सभोवतालच्या प्रत्येक गोष्टीमागचं विज्ञान समजावून सांगतं. मग ती गुरुत्वाकर्षणाची शक्ती असो, प्रकाशाचं वर्तन असो की अणूंचे गूढ व्यवहार असोत.

भौतिकशास्त्र म्हणजे पदार्थ, ऊर्जा, गती, बल, आणि त्यांच्यातील परस्परसंवाद यांचा अभ्यास. हे विज्ञान निसर्गातील नियमांना शोधून काढण्याचा प्रयत्न करतं. भौतिकशास्त्र अनेक शाखांमध्ये विभागलेलं आहे :

**गतिकी (Mechanics) :** वस्तूंची गती आणि बलांबाबतचं ज्ञान.

**विद्युत आणि चुंबकत्व (Electricity and Magnetism) :** विद्युतप्रवाह, चुंबकीय क्षेत्रे व त्यांचं परस्परसंवेदन.

**उष्णताशास्त्र (Thermodynamics) :** ऊर्जेचा संचार व तापमानाचे परिणाम.

**क्वांटम भौतिकशास्त्र (Quantum Physics) :** अणूच्या आतल्या कणांचे विचित्र पण अद्भुत वर्तन.

**सापेक्षता (Relativity) :** वेळ, गती आणि गुरुत्वाकर्षण यांच्यावरील आइन्स्टाईनचे सिद्धांत.

या सर्व शाखा मिळून भौतिकशास्त्राचं ज्ञान अधिक सखोल आणि व्यापक बनवतात.

भौतिकशास्त्रामुळे माणसाने पृथ्वीच्या सीमा ओलांडून अंतराळ गाठलं, उपग्रह पाठवले, दूरदूरच्या ग्रहांचा अभ्यास केला. याच शास्त्रामुळेच आपल्याला वीज, वाहने, मोबाइल, संगणक, इंटरनेट, रेडिओ, टेलिव्हिजन, एक्स–रे, MRI अशा सुविधा मिळाल्या आहेत. भौतिकशास्त्राचा उपयोग औषधनिर्मितीपासून उद्योगधंद्यांपर्यंत विविध ठिकाणी होतो. पाण्याची उर्जा, वायूचा दाब, प्रकाशाचं अपवर्तन, आवाजाच्या तरंगा – ही सगळी भौतिकशास्त्राच्या अभ्यासाची फळं आहेत. एकूणच, भौतिकशास्त्राने माणसाच्या जीवनशैलीत क्रांती घडवली आहे.

भौतिकशास्त्र हेच एकमेव विज्ञान आहे जे सृष्टीच्या उत्पत्तीपासून ते अंतापर्यंत विचार करतं. 'बिग बँग सिद्धांत' पासून सुरुवात करून आकाशगंगेच्या रचनेपर्यंत, 'ब्लॅक होल्स', 'डार्क मॅटर' आणि 'डार्क एनर्जी' यांसारख्या रहस्यमय गोष्टींचा मागोवा घेणारं हे शास्त्र आहे.

क्वांटम यांत्रिकीने सिद्ध केलं की, कणं एकाच वेळी अनेक स्थितीत राहू शकतात तर सापेक्षतावादाने सिद्ध केलं की वेळसुद्धा गुरुत्वाकर्षणाने वाकू शकते. हे सगळं ऐकताना जरी गूढ वाटत असलं, तरी हे वास्तव आहे आणि त्यामागे भौतिकशास्त्राचा आधार आहे.

भविष्यात भौतिकशास्त्राचा वापर ऊर्जेच्या नवीन स्रोतांमध्ये, कृत्रिम बुद्धिमत्ता (AI), अंतराळ पर्यटन, नॅनो–तंत्रज्ञान, आणि रोगनिवारणात होणार आहे. शुद्ध, सुरक्षित व पुनर्वापरयोग्य उर्जा तयार करण्यासाठी न्यूक्लिअर फ्यूजन हे एक महत्त्वाचं क्षेत्र आहे. अशा संशोधनांमुळे मानवजात नवीन शतकात अधिक सुरक्षित आणि प्रगत जीवन जगू शकते आणि ही शक्यता केवळ भौतिकशास्त्रच देऊ शकतं.

भौतिकशास्त्र म्हणजे फक्त सिद्धांतांचा अभ्यास नाही तर विश्वाच्या प्रत्येक हालचालीचा, कणाचा, उर्जेचा अर्थ लावण्याचा प्रयत्न आहे. यामुळेच हे शास्त्र विश्वाचे रहस्य उलगडणारा ठरतो. ही केवळ ज्ञानाची गुरुकिल्ली नसून, ती भविष्यातील दारे उघडणारी चावी आहे. म्हणूनच, आपण सर्वांनी भौतिकशास्त्राकडे केवळ एक विषय म्हणून न पाहता, एका अद्भुत जगाचा शोध घेणारे साधन म्हणून बघणं आवश्यक आहे.

• • •

# जिद्दी

## अरुणिमा सिन्हा

**पंकज निखाडे**
एम.एस्सी. सूक्ष्मजीवशास्त्र द्वितीय




**अरुणिमा** सिन्हा! उत्तर प्रदेशमधल्या आंबेडकर नगर जिल्ह्यातली २३ वर्षीय तरुणी! तिचे वडील भारतीय सैन्यदलात होते, पण ती जेमतेम सहा-सात वर्षांची असतानाच त्यांचे निधन झाले. वडिलांच्या जागी आईला नोकरीत सामावून घेतले गेले, पण तरीही आर्थिक परिस्थिती साधारणच होती. अरुणिमाला एक मोठी बहीण आणि एक धाकटा भाऊ आहे. अरुणिमा शालेय जीवनात उत्तम फुटबॉल आणि व्हॉलीबॉलपटू म्हणून नाव कमावून होती. पुढे कायद्याची पदवी घेत असताना तिने राष्ट्रीय स्पर्धांमध्येही आपली चुणूक दाखवली. एलएल.बी.च्या शेवटच्या वर्षाला असतानाच तिने सेन्ट्रल इंडस्ट्रियल सिक्युरिटी फोर्समध्ये नोकरीसाठी अर्ज केला होता आणि त्यासाठीच्या पूर्वपरीक्षेसाठी ती दिल्लीला निघाली. तो दिवस होता ११ एप्रिल २०११. अरुणिमाच्या आईने तिच्यासाठी एक सोनसाखळी तयार केली होती. ती सोनसाखळी एरुणिमा सतत गळ्यात घालत असे. दिल्लीच्या रेल्वेच्या प्रवासात ती सोनसाखळी काढून ठेवायला ती विसरली. तिच्या बोगीत असलेल्या काही भामट्यांची नजर त्या साखळीवर पडली आणि त्यातल्या एकाने ती हिसकावून घेण्याचा प्रयत्न केला. ती खेळाडू वृत्तीची आहे. सहजासहजी हार मानणे तिच्या रक्तात नाही. तिने प्रतिकार सुरू केला. असेल नसेल त्या शक्तिनिशी तिने त्यांना ठोसे, लाथा-बुक्क्यांचा चोप देऊ लागली. एक मुलगी आपल्याला आव्हान देते आहे हे त्यांच्या पुरुषी, पाशवी वृत्तीला मानवले नाही. त्यांनीही तिला तेवढ्याच क्रूरपणे मारहाण सुरू केली. अत्यंत दुर्दैवाची पण सत्य गोष्ट अशी की, बोगीतील इतर प्रवासी या सर्व प्रकारांकडे नुसतेच भेकडासारखे बघत राहिले.

एकही जण तिच्या मदतीसाठी पुढे आला नाही. ती ऐकत नाही आणि साखळी सहजासहजी सोडत नाही हे बघून म्हणा किंवा त्यांचा पुरुषी अहंकार दुखावला गेला म्हणून असेल, ते सारेच अतिशय संतापले. त्यांनी तिला खेचत खेचत दरवाज्यापाशी आणले आणि ट्रेनमधून निर्दयपणे खाली फेकून दिले. ती दाणकन दोन रेल्वे ट्रॅकच्या मध्ये जोराने आदळले. तिच्या पायातून आणि कंबरेतून प्राणांतिक कळा निघत होत्या. दुरून एक ट्रेन तिला वेगाने येताना दिसली. तिचा एक पाय नेमका त्याच ट्रॅकवर पडला होता. ती जिवाच्या आकांताने पाय बाजूला घेण्याचा, तिथून उठण्याचा प्रयत्न करीत होती. पाय बाजूला सरकवणे तर दूरच पण तिची कंबर जराही उचलली गेली नाही. वेदनेचे आणखी एक मोहोळ उठले आणि त्यांच्या डंखांनी झुंझत असतानाच ती ट्रेन धडधडत तिच्या पायावरून निघून गेली.

रात्र असल्यामुळे अरुणिमा तशा अवस्थेत सात तास रेल्वे ट्रॅकवर पडून राहिली. आपल्या अर्धवट तुटलेल्या पायाचे लचके मोठमोठाल्या घुशी तोडत आहेत आणि ते असहाय्यपणे बघत राहावं लागलं.

क्षीण आवाजात ती मदतीसाठी याचना करत राहिली आणि रात्री केव्हातरी ती शुद्धावर आली. सकाळी तिच्याकडे लोकांचे लक्ष गेले. तिला रुग्णालयात दाखल करण्यात आले.

सात तासांच्या जीवघेण्या वेदनेनंतरही अरुणिमा जिवंत होती. भारतीय सैनिकाची पोर होती ती इतक्या लवकर हार मानणार तरी कशी? तिच्या घरच्यांना कळवण्यात आले. तिचा पाय अर्धवट तुटला होता. तो अजून काही काळ तसाच राहता तर तिचे वाचणे अशक्य होते. तो कापायला हवा, पण ऑपरेशनसाठी रक्त हवे होते. रक्त मिळवण्यासाठी घरच्या मंडळींचा आटापिटा आणि नंतर पदरी पडलेली आत्यंतिक निराशा. अरुणिमा सांगते, ''माझ्या घरातील मंडळींनी आमच्या नातेवाईकांना फोन केले. पण वाईट म्हणजे

नातेवाईकांनी आपले फोन बंद करून ठेवले. रक्त द्यायला कोणीही आले नाही. हॉस्पिटलमधल्या डॉक्टरांनीच शेवटी मला रक्त दिले आणि माझे ऑपरेशन पार पडले.''

शेवटी १८ एप्रिल २०११ ला अरुणिमाला दिल्लीच्या 'एम्स'मध्ये दाखल केले गेले आणि नंतर तिच्या संपूर्ण उपचारांची काळजी तत्कालीन केंद्र सरकारने घेतली. दिल्लीस्थित एका कंपनीने अरुणिमाला कृत्रिम पायासाठी अर्थसाहाय्य केले. माध्यमाच्या सततच्या भडिमारामुळेच मला ही मदत मिळाली, असं अरुणिमा प्रामाणिकपणे सांगते.

पण त्याच वेळी अरुणिमाची तक्रार हाताळताना उ. प्र. पोलिसांनी संवेदनहीनतेचा कळस गाठला. तिच्याजवळ तिकीट नसल्याने तिने ट्रेनमधून उडी मारली, तिने आत्महत्या करण्याच्या उद्देशाने उडी मारली असे अनेक आरोप तिच्यावर लावण्यात आले. पुराव्यानिशी तसे कुठेही सिद्ध झाले नाही आणि न्यायालयाने रेल्वे प्रशासनालाच दंड ठोठावत सहा लाख रुपये तिला ताबडतोब द्यावेत, असा आदेश दिला. कोर्टकचेऱ्या, पोलिसांच्या उलट तपासण्या हे सर्व अरुणिमाच्या 'एम्स'मधील चार महिन्यांच्या उपचारांदरम्यान घडत होते.

अरुणिमा म्हणते की, ''खोल निराशेचा आणि सततच्या वेदनांचा तो काळ होता. पोलिसांच्या प्रश्नांनी तर तळपायाची आग मस्तकात जात असे. मी मध्यमवर्गीय होते, एक मुलगी होते आणि आता तर अपंगत्वही आलेले. मला खोटे ठरवणे फार सोपे होते. पण त्या निराशेच्या खोल डोहातूनच माझ्या मनात ज्यांनी मला जगणे नाकारले, खोटे ठरवले त्यांना मी कोण आहे आणि काय करू शकते हे दाखवून देण्याची उत्कट ऊर्मी उसळून वर येत राही.'' पण अरुणिमाची जीवनकहाणी संपत नाही, ती खऱ्या अर्थाने सुरू होते.

''एक कृत्रिम पाय, दुसऱ्या पायात रॉड, कंबरेची हाडे पुरेशी जुळलेली नाहीत अशा अवस्थेत 'एम्स'मधले उपचार पूर्ण करून मी घरी आले. ईश्वराने मी काही तरी इतिहास रचावा म्हणून मला जिवंत ठेवले आहे, असे मला वाटत राही. त्या चार महिन्यांत मी जेवढी शरीराने विकलांग होत होते तेवढेच माझे मन स्वप्नांच्या भराऱ्या मारण्यात व्यग्र होते. हो, माझ्या मनात एव्हरेस्ट हे सर्वोच्च शिखर चढून जाण्याची आस लागून राहिली. माझी एकूण शारीरिक अवस्था पाहता हा निव्वळ वेडेपणा होता. माझी आई, भाऊ, बहीण आणि भाऊजी यांनी सदैव माझ्या इच्छा-आकांक्षांना उचित आदर दिला आहे. त्यांच्या प्रोत्साहनानेच मी माऊंटेनिअरिंगच्या प्रशिक्षणासाठी नाव नोंदवलं.'' अरुणिमाच्या दुर्दम्य महत्त्वाकांक्षेच्या पूर्तीसाठी ती पहिली भारतीय महिला एव्हरेस्टवीर बचेंद्री पाल यांची. त्या तिच्या गुरुस्थानी आहेत. कर्करोगावर मात केलेल्या क्रिकेटपटू युवराजने देखील




अरुणिमाला प्रोत्साहन दिले. २०१२ मध्ये 'टाटा स्टील ॲडव्हेन्चर फाऊंडेशन'च्या उत्तरकाशी कॅम्पमध्ये अरुणिमा प्रशिक्षणासाठी रुजू झाली.

''जेव्हा माझ्यासोबत सराव करणारी मंडळी आठ-आठ किलोमीटर पुढे निघून जात तेव्हा मी जेमतेम एखाद्या किलोमीटपर्यंत पोहोचलेली असे. पण बचेंद्री पाल यांनी मला सतत जाणीव करून दिली की, ज्या क्षणी एव्हरेस्ट चढून जाण्याची आकांक्षा माझ्यात उत्पन्न झाली त्या क्षणीच मी ते सर केले आहे. आता फक्त जगाला दाखवायचे होते!'' माझ्या पायातून रक्तस्राव होत असे, कंबरही दुखून येई; परंतु बचेंद्री पालसारखी गुरू असल्यावर काय? त्या म्हणत, ''अरुणिमा, तू अपंग आहेस हे विसरून जा तरच ही मोहीम फत्ते होऊ शकते.''

२०१२ मध्ये एव्हरेस्टची पूर्वतयारी मानली जाते ते 'आयलँड पीक' (६१८९ मीटर्स उंचीवर) आणि एप्रिल २०१३ मध्ये चाम्सेर कांग्री (६६२० मीटर्स उंचीवर) अरुणिमाने पादाक्रांत केले. एव्हरेस्ट मोहीम सर करण्याची सुरुवात झाली होती.

'टाटा ग्रुप इको एव्हरेस्ट एक्सपेडिशन'अंतर्गत १ एप्रिल २०१३ ला सुरू केलेली तिची एव्हरेस्ट मोहीम पुढे ५२ दिवस खडतर मार्ग, प्रतिकूल हवामान, प्राणवायूचे सतत कमी कमी

होत जाणे, बर्फाच्छादित पर्वत आणि त्यावरून घसरत जाणारा कृत्रिम पाय अशा अनेक अडचणींवर मात करत पुढे जात होती.

एक एक पाय जिद्दीने ती पुढे टाकायची, तो रोवायचा प्रयत्न करायची पण दुसरा कृत्रिम पाय बर्फावरून घरंगळत खाली यायचा नि त्या परिस्थितीत स्वत:चा तोल सावरणं कठीण जायचं. तशाच अवस्थेत तिने कसे-बसे पुढचे अंतर कापले. तिला शिखर दिसू लागलं होतं, पण त्या दरम्यान तिच्या जवळचा ऑक्सिजन साठा जवळजवळ संपत आला होता. तिच्याबरोबरचा वाटाड्या थापा तिला सतत वापस खाली चालण्याचा आग्रह करत होता, पण अरुणिमा हरली नाही.

अखेरीस अरुणिमाने तिच्या सोबत असलेल्या वाटाड्या थापासमवेत २१ मे २०१३ ला सकाळी १०.५५ ला एव्हरेस्ट शिखरावर भारताचा झेंडा फडकवला.

खाली उतरताना आपल्याला श्वास घ्यायला त्रास होतो आहे म्हणजेच आपला ऑक्सिजन संपले आहे हे अरुणिमाच्या लक्षात आले. ती तिथेच थांबून कसा-बसा श्वास घेण्याचा प्रयत्न करू लागली. तेवढ्यात थापाला दुसऱ्या एका गिर्यारोहकाने टाकून दिलेले एक ऑक्सिजन सिलेंडर दिसले आणि त्याने लगबगीने ते अरुणिमाला लावले.

अरुणिमा म्हणते की,''आम्ही थोडे खाली आलो तो अचानक माझा कृत्रिम पाय निखळून पडला. तो लावत बसायला वेळ लागला असता. ऑक्सिजन असेपर्यंत खाली पोहोचणे आवश्यक होते. मग काय एका हाताने मी तो पाय ओढून धरून ठेवला आणि अक्षरश: जीव मुठीत धरून आम्ही खाली आलो. मी जगावे आणि आपली कथा जगाला सांगावी हेच त्या ईश्वराच्या च्या मनात होते.''

अरुणिमाची एव्हरेस्ट मोहीम अशा तऱ्हेने फत्ते झाली. एव्हरेस्ट शिखर सर करणारी पहिली अपंग स्त्री म्हणून आता राज्य आणि केंद्र सरकारला तिची दखल घेतली. जिद्द आणि धाडसाच्या जोरावर अरुणिमा एव्हरेस्ट चढली. अरुणिमाच्या या कर्तृत्वाची दखल भारत सरकारने घेऊन तिला पद्मश्री बहाल केले. अशा या अरुणिमाच्या धैर्याला, तपस्येला व शौर्याला पाहून आम्हा विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळते.

• • •





# तरुणाई व व्यसनाधीनता

**नागेश मोहुर्ले,** बी. ए. प्रथम

**व्यसनाधीनता** ही फार मोठी समस्या भेडसावत आहे. तरुणांमध्ये व्यसनाचे प्रमाण झपाट्याने वाढत आहे. तरुणाई व व्यसनाधीनता ही जणू काही समीकरणच झालेले दिसते. तरुणांमधले वाढते व्यसनाचे प्रमाण हे आई वडिलांच्या आणि समाजाच्या चिंतेचा विषय बनत चालला आहे. अगदी पाचवीपासूनची मुलंसुद्धा काही ठिकाणी सिगारेट, दारू व तत्सम बाबींचे व्यसन करताना दिसत आहे. तरुणांसाठी व्यसन हा एन्जॉय चा विषय झाला आहे.

व्यसनाच्या आहारी गेलेल्या तरुणांचे करियर बरबाद होत आहे. त्यांच्या डोळ्यासमोर कोणतीही ध्येय दिसत नाही. व्यसनामुळे तरुणांच्या भांडणात वाढ होत आहे, आपापसातले वाद वाढत आहेत, तरुण रागीट बनत चालले आहेत, व्यसनाच्या आहारी गेलेल्या तरुणांना आई-वडिलांचेसुद्धा भान राहिलेले नाही. व्यसन करण्यासाठी पैसे दिले नाही म्हणून आई-वडिलांसोबत भांडणं करणारे प्रसंगी त्यांना जीवनातून उठवणारे तरुण पाहायला मिळत आहेत. वर्तमानपत्रात नित्याने त्यांच्या बातम्या आपण सर्वजण वाचतो.

व्यसनाच्या आहारी गेलेले विवाहित तरुण बायको मुलांनासुद्धा विचारायला तयार नाहीत. व्यसनासाठी घरातील वस्तू विकणे, शेती विकणे, सोनं गहाण ठेवणे प्रसंगी विकणे अशा प्रकारचे उपद्व्याप करताना ही मंडळी पाहायला मिळत आहेत.

खरेतर हा संस्काराचाच भाग आहे. मुलांवर लहानपणापासूनच संस्कार करणे गरजेचे आहे. मुलांना परिस्थितीची जाणीव करून देणे गरजेचे आहे, व्यसनाचे होणारे घातक परिणाम समजावून सांगणे गरजेचे आहे. मुलांना वाचन-संस्कृती कडे घेऊन जाणे, त्यांच्यामध्ये प्रेम, आपुलकी, बंधुता, आदर इत्यादी मूल्यांची पेरणी करणे गरजेचे आहे.

व्यसनामुळे सामाजिक, कौटुंबिक, आर्थिक जीवन कसं उद्ध्वस्त होतं याबद्दल त्यांना मार्गदर्शन करणे गरजेचे आहे. मुलांचे नाहक हट्ट पुरवणे, एक वस्तू मागितली असता दोन वस्तू देणे, सर्व गोष्टी लगेच उपलब्ध करून दिल्याने मुलांना संयम बाळगण्याची सवय राहत नाही, एखादी गोष्ट वेळेवर मिळाली नाही की लगेच ते चिडचिड करायला लागतात, खूपच हट्टी आणि रागीट असतील तर आत्महत्या करण्या इतपतसुद्धा पाऊल उचलतात. म्हणून मुलांना परिस्थितीची जाणीव करून देणे, त्यांच्यामध्ये संयमीपणा निर्माण करणे खूप गरजेचे आहे. मुलांच्या आई वडिलांनी दोन पैसे कमी कमावले तरी चालतील परंतु मुलांच्या संस्काराकडे लक्ष देणे गरजेचे आहे. आई-वडिलांनी पैसा, संपत्ती कमवण्याच्या नादात मुलांकडे लक्ष दिले नाही तर तेच मुलं आई-वडिलांनी कमावलेली संपत्ती काही दिवसातच संपवून टाकतील म्हणून पालकांनी केवळ भौतिक सुखाच्या मागे न पळता मुलांना चांगले संस्कार दिले पाहिजेत किंवा चांगले मूल्य शिकवणाऱ्यांच्या सहवासात पाठवले पाहिजे. तरच उद्याची पिढी आदर्श आणि मानवतावादी निर्माण होईल व व्यसनांपासून दूर राहिल.

• • •



# सकारात्मक व नकारात्मक विचार

**साहील पेंदराम,** बी. एस्सी. द्वितीय

**मानवी** समाजात अनेक वृत्ती आणि प्रवृत्तीची मानसिकता असलेले लोक राहतात. काही सकारात्मक विचार करणारे असतात तर काही नकारात्मक विचार करणारे असतात. नकारात्मक विचार करणाऱ्यांची संख्या जास्त असल्यास त्या मानवी समाजाचे समाजस्वास्थ्य नेहमीच बिघडलेले असते. अशा समाजात वकिली व्यवसाय, वैद्यकीय व्यवसाय खूप भरभराटीला आलेला असतो. कारण नकारात्मक विचारसरणीमुळे शाब्दिक वाद विकोपाला जाऊन कोर्ट-कचेऱ्या सुरू होतात. तसेच नकारात्मक मानसिकतेचा आरोग्यावरसुद्धा खूप विपरित परिणाम होतो. त्यामुळे अशा समाजात वैद्यकीय व्यवसाय भरभराटीला येतो.

आदर्श जीवन कसे असावे या बाबतीत मार्गदर्शन करताना वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आपल्या ग्रामगीतेत लिहितात-

''नको वैद्य अथवा डॉक्टर । आपणचि राहे आरोग्य तत्पर ।
नको वकिल न्यायाधीश दंडधर । न्याय व्यवहार सहजचि ।।''

नकारात्मक, विकृत मानसिकतेच्या लोकांना इतरांची प्रगती, इतरांचा विकास डोळ्यात खूपतो. इतरांची झालेली प्रगती ते सहन करू शकत नाही. अशा विकृत मानसिकतेच्या लोकांना वाटते की फक्त त्यांनीच प्रगती करावी, त्यांचाच विकास व्हावा. अशा विकृत मानसिकतेलाच ब्राह्मण्य म्हणतात. या विचारसरणीचे लोक विषमतावादी असतात. या ब्राह्मण्य वृत्तीमुळे भारतीय मानव समाजात किती भयानक, विदारक परिस्थिती निर्माण झाली आहे हे आपण नित्य बघतो आहोत.

याउलट सकारात्मक विचारसरणीच्या लोकांची संख्या समाजात जास्त असल्यास अशा मानव समाजाचे समाजस्वास्थ्य नेहमीच उत्तम दर्जाचे असते. सकारात्मक विचार करणारे लोक नेहमीच स्वातंत्र्य, समता, बंधुता या मानवी मूल्यांप्रती उच्च निष्ठा बाळगून असतात किंबहुना या मानवी मूल्यांचे पुरस्कर्ते असतात. अशा लोकांना सर्वांची प्रगती व्हावी, सर्वांचे कल्याण व्हावे, सर्वांनी गुण्यागोविंदाने नांदावे तात्पर्य 'जगा आणि जगू द्या' या उदात्त हेतूने सर्वांनी प्रेरित व्हावे असे वाटते.

नकारात्मक विचार करणारे कायम अशांत, अतृप्त असतात. असे लोक जिवंतपणी असमाधानी असल्यामुळे मेल्यानंतर त्यांचे आत्मे ब्रह्मराक्षस, वेताळ बनून प्रेत योनीत भटकंती करतात.

याउलट सकारात्मक विचारसरणीचे लोक कायम समाधानात, आनंदात असतात. अशा लोकांची लौकिक आणि पारलौकिक उन्नती खूप वेगाने होते. सकारात्मक विचारसरणीचे लोक मानवी जीवन कृतार्थपणे जगून मानवी जीवनाचे ईप्सित साध्य करतात त्यामुळे त्यांना निर्वाण म्हणजे मोक्ष प्राप्त करण्यासाठी वेगळे प्रयत्न करण्याची आवश्यकता राहत नाही.

*''किसी की मुस्कुराहटोपे हो निसार...*
*किसी का दर्द मिल सके तो ले उधार...*
*किसी के वासते हो तेरे दिल में प्यार...*
*जीना इसिका नाम है...''*

यापुढे ज्याचे त्यांनीच ठरवायचे आहे की, आपण नकारात्मक विचार करून मानवी जीवनाचा नाश करायचे की सकारात्मक विचार करून सर्वगुणसंपन्न मानव समाज निर्माण करण्यात खारीचा वाटा उचलून मानवी जीवन कृतार्थ झाल्याचे आत्मिक समाधान मिळवायचे.

दैनंदिन जीवनातील कार्य करीत असताना आपल्या अंतरात्म्याला साक्षी ठेवले तर कोणत्याही मानवाच्या हातून कसल्याही प्रकारचे अनुचित कार्य होणार नाही आणि प्रत्येकांनी अंतरात्म्याच्या साक्षीने कार्य केले तर सर्वगुणसंपन्न मानव समाज निर्माण होण्यास जास्त वेळ लागणार नाही. याबद्दल मार्गदर्शन करताना वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आपल्या ग्रामगीतेत लिहितात -

''नको धाक तलवारीचा । चुकिस्तव तळमळे आत्मा साचा ।
साक्ष देतो अंकुश देवाचा । अंतरामाजी ।।''

''सर्वांना सुख लाभावे,अशी आरोग्य संपदा...।
व्हावे कल्याण सर्वांचे,कोणी दु:खी असू नये...।।''

•••

# मराठी कविता




## आठवणी त्या रक्ताच्या (आतंकवादाच्या छायेत)

पाहिलं पहाटे शांततेचं स्वप्न,
आणि अचानक गडद धूर
पाहिलं भारताचं हसतं गाव,
आणि ऐकू आली बंदुकीची सूर।

पुन्हा एकदा फाटली माती,
पुन्हा एकदा वहायला लागली नाती।
हे कोण, का आले,
धर्माच्या नावावर का रक्त सांडले?

पहलगामच्या शांत डोंगरात,
गोळ्या घातल्या निर्दोष जीवांवर,
नाही होती शस्त्रं त्यांच्या हातात,
फक्त नशीब त्यांच्या कवट्यात।

त्या आधी पठाणकोट, त्या आधी पुलवामा,
त्याच्या आधी २६/११ चं मुंबई नाटक,
होटेलमधल्या चहा-कॉफीचे कप अजून थरथरतात,
अन् छत्रपती स्टेशनवर त्या क्षणाचे ठसे आजही दिसतात।।

दिल्लीच्या बाजारात फुटले बॉम्ब,
समोरच्या चेहऱ्याचं नाव विसरलो पण रक्त ओळखतो अजून।
समजत नाही हे कोणते युद्ध आहे,
जिथे शत्रू दिसतच नाही, फक्त सावलीचं भय आहे।

आणि म्हणे हे 'जिहाद',
कशासाठी? कुणासाठी?
मृत्यूचं महात्म्य सांगणाऱ्यांनो,
जरा जगण्याचं अर्थ कधी जाणून पाहिलं का तुम्ही?

मांजरीचं अंगणातलं पिल्लू सुद्धा थरकापून गेलं,
जेव्हा लहान मुलाच्या शाळेवर गोळ्या पडल्या।
हा कुठला धर्म आहे,
जिथे ईश्वराचं नाव घेऊन नरक साकारता तुम्ही?

भारत सोसतो, पण विसरत नाही,
कारण प्रत्येक वीर झुलतो तिरंग्यात,
आणि प्रत्येक थेंब म्हणतो –
मी मरतो, पण मातीसाठी जिवंत राहतो।

आम्ही दिवे आहोत – विझवले तरी पुन्हा पेटू,
आम्ही सैनिक आहोत – झुकलो तरी झेप घेऊ,
आम्ही भारताचे पुत्र – प्रत्येक अश्रूतही असतो जागा,
आणि जर गरज पडलीच तर रक्ताने लिहू 'जय हिंद'ची गाथा।

• • •

**दर्शना मडावी**
बी.ए. द्वितीय

## कृत्रिम बुद्धिमत्ता : नवयुगाचा प्रकाश

मानवाने कल्पिले होते, एक युग नवे,
जिथे संगणक बोलतील, मने वाचतील खरे.
विचारांना नवे पंख देती, ही जाणीव खास,
कृत्रिम बुद्धिमत्ता, नवयुगाचा प्रकाश!

गणिती सूत्रांनी भरले मन,
अल्गोरिदमचा नवा निर्धार.
शिकते, वाढते, समजून घेते,
कधी सहायक, कधी विचारसार!

रोबोट झाले आता हुशार,
भावना समजून करतात वार्तालाप.
शब्दांमधले अर्थ शोधून,
बनतात आपले नवे सहचार!

चिकित्सा, गणित, शोध अनंत,
कला, विज्ञान, संधी नव्याच.
चैतन्य देई या यंत्रामध्ये,
जणू स्वप्नांचे घेतले रूप खास!

पण सावध राहू या या शास्त्रापाशी,
तंत्रज्ञानाचे भान ठेऊ हृदयी.
माणुसकीस नेहमी पुढे ठेऊन,
बुद्धिमत्तेला वापरू योग्य रितीने!

असा हा बदलत्या जगाचा खेळ,
स्मार्ट मशीन, नव्या कल्पनांचे मेल.
मानव-बुद्धी आणि कृत्रिम ज्ञान,
एकत्र मिळून घडवू नवे जहान!

• • •

**चंद्रकांत राऊत**, बी.एस्सी. द्वितीय






## ग़ज़लसम्राट पंकज उधास

स्वरात मखमली जादू जी गुंफली,
त्या सूरांमध्ये जिणं मी सापडली.

ग़ज़लेंचं जेंव्हा ते गाणं लागते,
आसवांची मैफील खुली होत जाते.

चिट्ठी आयी है ऐकून मन हेलावतं,
भूतकाळ दारात पुन्हा येऊन उभं राहतं.

अभी ना जाओ छोड़ कर म्हणणाऱ्या सुरांत,
वाटते जणू काळ थांबून उभा राहतो.

घुंघरू टूट गए ऐकता, मन गुंततं,
त्या सुरांमध्ये वेगळंच जग दिसतं.

नैना हमारी बातों में अश्रू बोलतात,
त्याच्या गाण्यात जीवनीचे अर्थ उमटतात.

आहिस्ता आहिस्ता प्रेम रंगतं,
त्या स्वरांत मोहक क्षण गुंफत जातात.

तो गातो तेंव्हा मन चिंब भिजतं,
दूर कुठेतरी आठवणींनी रडतं.

ग़ज़लसम्राट तू अमर आहेस,
स्वरांमध्ये, भावनांमध्ये भर आहेस!

• • •

**निखिल सिडाम**, बी.एस्सी. द्वितीय



## तंबाखू खाऊ नको

तंबाखू खाऊ नको, आरोग्याची जपणूक कर,
बालपणातून शिक, आयुष्याचा हा गोड बहार.
धूम्रपानाचे वळण, घेऊ नकोच कधी,
ते ही अंधाऱ्या मार्गात, नेईल तुला चिरंजीव.

धुंद प्रकाशात सापडतील, तास अनेक काळ,
परंतु प्रत्येक धुव्यात, लपलेले आहे जाळ.
फुप्फुसांचा नाश होईल, हृदयाची गती कमी,
सजग राहा, तंबाखू मित्र, हेच आहे महत्त्वाची यमी.

श्वासातील गडबड, स्वप्नांचे खरे राज्य,
जन्मभराची चूक, करणार हातात संताप.
तांबड्या तंबाखूच्या रंगात, चुकला जो एकदा,
उन्हाचे झळ झेलताना, तळमळतो तो गोड मनाचा.

सुखाचा क्षण काळजात, कशाला तो टाकावा,
तंबाखूच्या या मोहात, आयुष्याचे वाऱ्यावर जाऊ द्या.
एका गोड मिठीत, बारीक धुनी,
आरोग्याचे गाणे ओठांवर, तंबाखूला सोडू दे अर्थहीन.

जाती-धर्माचा न भेद, एकत्र येऊ या,
तंबाखूच्या विरोधात, नवीन जीवन घडवू या.
निसर्गाची गूढता, शुद्ध हवा मिळवू,
तंबाखू खाऊ नको, आरोग्याला पूर्वीच जपू.

• • •

**वैशू मेश्राम**, बी.ए. तृतीय

## ती हसते पण काहीच म्हणत नाही!

कॉरिडॉरमध्ये येते हळूच,
नजरेत एक चपळ शरमलेला स्पर्श,
माझ्याकडे बघते,
आणि मग एक हलकंसं हास्य उमटतं!

न सांगता काही, न बोलता शब्द,
त्या हास्यात लपलेले असतात हजार अर्थ,
मी विचार करतो –
ती माझ्याशी बोलणार का कधी खरंखुरं?

कधी पुस्तकांच्या मागे,
कधी ग्रंथालयातल्या शांत कोपऱ्यात,
ती दिसते, नजरानजरा होते,
मग पुन्हा तेच तेच हसू – पण मौनातले!

कधी वाटतं – ही एक खेळ आहे,
की नकळत तिच्या भावना काही सांगताहेत?
माझ्या मनात विचारांची गर्दी होते,
पण ओठांवर प्रश्नच राहतो – ती का नाही बोलत?

कदाचित तिलाही वाटत असेल,
हवंय काही बोलावं, पण धाडस नाही मिळालं,
आणि मीही फक्त पाहत राहतो,
त्या हसण्याच्या मागचं 'गुपित' शोधत राहतो

ती हसते – रोज, हलकसं
पण त्या हास्याआड दडलेलं एक अखखं गूढ
आणि मी – शब्दांच्या शोधात, तिच्या एका 'हाय'साठी
वाट पाहणारा!

• • •

**राहूल गायकवाड**, बी.ए. तृतीय



## पण लक्षात कोण ठेवतं?

मनापासून केलेली मदत,
कधी दिलेला हात,
आपण आठवत राहतो,
पण लक्षात कोण ठेवतं?

दुखऱ्या क्षणी जो सोबत होता,
हसवून गेला जो गहिवरलेला,
तो विसरला क्षणात पुढे,
पण लक्षात कोण ठेवतं?

स्वप्नं कुणासाठी विणली होती,
स्वतःचीच झोप हरवली होती,
ते सुखी झाले, पुढे गेले,
पण लक्षात कोण ठेवतं?

जगणं असंच असतं बहुतेक,
स्वार्थी रेशीमगाठी गुंतत राहतात,
आपणच आठवत बसतो जुने दिवस,
पण लक्षात कोण ठेवतं?

• • •

**वैष्णवी बागेडेरीया**, बी.एस्सी. प्रथम






## भौतिकशास्त्र : शास्त्रज्ञांचा अनोखा प्रकाश

निसर्गाच्या या विस्तीर्ण गूढात, लपले आहेत रहस्य महान,
भौतिकशास्त्राच्या जादूमधूनी, मिळतो त्यांचा साक्षात ज्ञान!

**आर्किमिडीज** म्हणाले, ''उत्प्लवनाचा आहे नियम खास,
पाण्यात टाका वस्तू कुठली, तर होईल उचलण्याचा अभ्यास!''

**गॅलिलिओ** ने पाहिले आकाश, दूरदर्शकाने शोधले ग्रह,
गतीचे नियम दिले स्पष्ट, विज्ञानाला जोडले नवे कहाणीचे रहस्य!

**न्यूटन** म्हणाले, ''गुरुत्वाकर्षण, वस्तूंना ओढते खाली,
याच शक्तीने फिरतात ग्रह, पृथ्वीवरील सारी निसर्गरिती जाळी!''

**फॅराडे** म्हणाले, ''विद्युत अन् चुंबक हे जुळलेले,
प्रवाह बदलता निर्माण होतो, इंडक्शनचे नियम तयांनी दिले!''

**मॅक्सवेल** म्हणाले, ''प्रकाश हा तर लहरींचा खेळ,
विद्युत-चुंबकीय क्षेत्र मिळुनी, बनतात रंगांचे नवे झेल!''

**आइन्स्टाईन** चे सापेक्षतावाद, वेळ अन् अवकाश गूढ रचना,
ऊर्जा-वस्तुमान रूपांतर, $E=mc^2$ हीच तयांची योजना!

**हीझेनबर्ग** म्हणाले, ''संदिग्धता, ठरवू शकत नाही सारे,
कणाची जागा अन् वेग, एका वेळी समजू ना रे!''

**बोहर** ने सांगितले अणूचे, कक्षा जिथे फिरतो कण,
ऊर्जास्तर बदलत जाई, प्रकाश होई त्या क्षण!

**हॉकिंग** म्हणाले, ''कृष्णविवर, गुपित त्यांचे गहिऱ्या छायेत,
तेथूनही ऊर्जा निघते, विकिरणाच्या अद्भुत सायेत!''

शास्त्रज्ञांनी प्रकाश दिला, गूढ विश्व उलगडले,
भौतिकशास्त्राच्या प्रवासामधुनी, नवे युगे घडवले!

• • •

**रोहिणी पाटणकर**, बी.एस्सी. द्वितीय

## माझ्या घरातील आरसा

माझ्या घरातील आरसा,
माझं खरंखुरं प्रतिबिंब दाखवतो,
मुखवटे झटकून टाकले तरी,
तो नजरेला खोटं कधीच बोलत नाही.

सकाळच्या धावपळीतही
क्षणभर थांबून विचारतो –
आज तू खरंच हसतोस का?
आणि मी गप्प, त्या नजरेला चुकवतो.

त्याला माहिती असतं,
कोणते दुःख लपवलेत,
कुठल्या स्वप्नांना घाबरलोय,
किती वेळा स्वतःशी हरलोय.

कधी माझ्या अश्रूंना,
तो शांतपणे सामावून घेतो,
आणि कधी मनातल्या गर्जनेला
नजरेतूनच उत्तर देतो.

तो फक्त आरसा नाही,
तो माझा सखा आहे,
माझं मूक आत्मभान,
माझा स्वतःशी असलेला संवाद आहे.

• • •

**नेहा बारसागडे**, .एम.ए. द्वितीय (समाजशास्त्र)





## रसायनशास्त्र : घटकांचे जादूई खेळ

अणू-रेणूंचा संग जिथे, तयार होतात नवे स्वरूप,
रसायनशास्त्र शिकवते आपल्याला, निसर्गाचे गूढ अन् अनोखे रूप!

हायड्रोजन, ऑक्सिजन मिळुनी, बनते पाणी जीवनदायी,
कार्बनचे अद्भुत जग, सृष्टी घडवते सजीवांसाठी!

अल्कली अन् आम्लांचे जुळते नाते, क्षार त्यातून जन्मतो,
तापमानाच्या खेळांमध्ये, पदार्थ नवे रूप घेतो!

धातू, अधातू, संयुगे, सारे निसर्गाचे खेळ,
प्रतिक्रिया उमटतात क्षणात, कधी सौम्य, कधी प्रचंड तेज!

ऊर्जेचा प्रवाह येथे, एखाद्या लहरीसारखा वाहतो,
थर्मोडायनॅमिक्स शिकवते, उष्णता कशी वागते अन् राहतो!

औषधांचे जग, रंगांचे विज्ञान, सारे येथे रुजले,
कधी विष, कधी अमृत, माणसाने हाती उचलले!

अणूंच्या खेळातूनच, ऊर्जेची तंत्रे घडली,
संशोधनाच्या वाटेवरून, नवी युगे उजळली!

ज्ञानाचे हे ज्वालामुखी, शोध घेऊ नवे,
रसायनशास्त्राच्या दुनियेत, अजूनही किती रहस्य दडले!

• • •

**प्रणाली प्रधान**, .एम.एस्सी. प्रथम(रसायनशास्त्र)



## शिवरायांचा इतिहास

सह्याद्रीचा वाघ हुंकारला, स्वराज्याचे स्वप्न पाहिले,
मातृभूमीच्या मुक्तीसाठी, राणांत रणशिंग फुंकले!

जिजाऊंच्या संस्काराने, सिंहाचा जन्म जाहला,
धर्म, न्याय, स्वाभिमानासाठी, शिवबांचा उदय झाला!

तोरणा गड जिंकून त्यांनी, स्वराज्याचा पाया रचला,
मावळ्यांच्या पराक्रमी साथीनं, हिंदवी सिंहासन मांडला!

अफजल, शाहिस्ता, औरंगजेब-सारेच हतबल झाले,
गनिमीकाव्याने शिवबांनी, सुलतानी नडवले!

राजधानीस रायगड झाला, सुवर्ण सिंहासन मांडले,
प्रजेसाठी राजा बनुनी, न्यायाचे राज्य चालवले!

स्वराज्याचा हा इतिहास, प्रेरणादायी अमर राहील,
शिवरायांचे कार्य अजरामर, जग हे नतमस्तक होईल!

• • •

**संकेत देशमुख,** एम.ए. प्रथम (समाजशास्त्र)



## सुनीता यांच्या मोहिमेतून या पाच बाबी शिकाव्या...

- कठोर परिश्रम आणि चिकाटी - अंतराळवीर होण्यासाठी आणि मोहिमा यशस्वी करण्यासाठी मेहनत, धैर्य हवे.
- आव्हाने स्वीकारा जिंकण्यासाठी लढा - मर्यादित संसाधने, मानसिक ताण अशा आव्हानांवर त्यांनी यशस्वी मात केली.
- संघभावना आणि सहकार्य - अंतराळात टीमवर्क हा अत्यंत महत्त्वाचा घटक.
- महिलाही स्वप्ने पूर्ण करू शकतात - कोणतेही क्षेत्र असो, मोठी स्वप्ने पाहावीत, त्यासाठी धडपड करावी.
- निसर्गाचे महत्त्व - अंतराळातून पृथ्वी पाहिल्यावर तिचे खरे सौंदर्य आणि पर्यावरण जपण्याची गरज लक्षात येते.

• • •

**पायल मुंगणकर,** एम.एस्सी. द्वितीय (सूक्ष्मजीवशास्त्र)



## जगायचंय

जगायचंय अजून, श्वासांवर हक्क ठेवा,
दुखांतही हसू दडवून, मजा घेत जा
हिशोब नकोत फार आयुष्याच्या वाटेवर,
फुलांत रमायचं, काट्यांशी भांडू नका

जगायचंय तर थोडं, वेडं होऊन जगा,
सप्तरंगांचे पायघोळ, स्वप्नं उराशी सजा
शहाणपणाच्या चौकटीत अडकून काय मिळे?
खोल समुद्रात उडी घ्या, किनाऱ्यावर बसू नका

कवितांनाच कधी तर, जीवन बनवून बघा,
भावनांचे किनारे कधीतरी, ओलांडून बघा
सावलींच्या मागे धावायचं थांबवा आता,
सूर्याशी डोळा भिडवा, झळा झेलून बघा

तुमचं मन म्हणेल तिकडे वळा कधीतरी,
जगाचं गणित विसरून, मोकळपणाने हसून बघा
शब्दांचं ओझं नको, फक्त स्पर्श जपा,
कागदावर नको फक्त, जिवंतपणे जगा

**कु. अंजली बोगा**
एम.ए. द्वितीय (मराठी)

## स्वाभिमानाचा आवाज

कधी कधी असतं,
मनात नसताना राग उचंबळून येतो,
आपलेच जण, आपलेसे वाटणारे,
हळुवार मनाला नकळत बोच देतात

त्यांच्या एका शब्दाने
जणू आत्मा हलतो,
स्वाभिमानाला येते ठेच,
आणि डोळ्यांत पाणी साचतं शांततेच्या काठावर

मी जपलं तुला आपलं समजून,
तुझ्या प्रत्येक दुखण्यात मी होते सोबत,
मग माझ्या वेदनांवर का ओल नाही तुझी?
माझ्या मनालाही शब्दांची किंमत असते

मी केलं ते मनापासून होतं,
तुला नाही आवडलं, चालेल,
पण एकदा थांबून समजून घ्यावंसं वाटलं असतं,
की माझंही हृदय आहे, ते फक्त मजा नाही

स्वाभिमान म्हणजे अहंकार नाही,
तो तर आत्म्याचा नाजूक किनारा,
कोणाला ओरडून नाही सांगता येत,
पण स्वतःला हरवू न देता तो जपावाच लागतो

म्हणूनच आज मी शब्दांमधून उत्तर देते,
मनातल्या दुखऱ्या प्रत्येक खुणांवर फुंकर घालते,
राग नाही – पण समजूत हवी,
आपलेपणात थोडीशी जागरूकता हवी

**कु. निकीता मोहुर्ले**
एम.ए. द्वितीय (मराठी)





## आजच्या विठोबाची वारी

आषाढीचा दिवस उजाडला पुन्हा,
दिंडीत निघालो, पण हातात मोबाईल घेऊन
ना टाळ, ना मृदंग, ना अभंग गातो,
स्टोरीत विठ्ठल, रील्समध्ये पांडुरंग नाचतो

भक्ती जरी हृदयात, पण वेळ नाही ओसरा,
'नेट' नसल्याशिवाय आज काळीज धडधडतं जरा
विठोबासमोर हात जोडतो पण मन आहे मेसेजमध्ये,
जय हरी विठ्ठल! पाठवतो फॉरवर्ड्सच्या साखळीत मजेने

पूर्वी चालत जातो वारीला, आता स्क्रोल करत वंदना,
ऑनलाइन प्रसाद, व्हर्चुअल भक्तीची नवी भावना
विठोबा थांबून बघतो, मोबाईलच्या पडद्यावरून,
तोच प्रेमाचा देव, फक्त रूप झालंय आधुनिक

ना त्याला चांदीचं सिंहासन, ना लाइक्सची गरज,
हवाय पवित्र मन, थोडी शांती नि सजगता सहज
त्या उंबरठ्यावर अजूनही उभा आहे तो देव,
फक्त आपण हरवून बसलो,
टेक्नॉलॉजीच्या मेळाव्याच्या वेगात नेहमीच

तर या आषाढीला, चलं मन, थोडं थांब
डोळे मिटून अनुभव तो मुकं हासणारा भाव
तोच विठोबा, आपल्यातलाच, पण विसरलेला,
आजच्या काळातही जिवंत,
काळाच्या साक्षीने उभा राहिलेला
जय हरी विठ्ठल, जय पांडुरंग!

**नितीन फटींग**
बी.ए. तृतीय

## कॉलेजची वाट आणि NSS ची साथ

कॉलेजच्या पायऱ्या चढताना,
प्रत्येक क्षणी काहीतरी नवे शिकलो,
कधी पुस्तकांत हरवलो आपण,
तर कधी मंचांवर आत्मविश्वास गवसला

घंटानादासोबतच उंचावले स्वप्न,
आणि मैत्रिच्या गोड गप्पांनी,
हा प्रवास झाला खास,
जणू जीवनाला मिळाला खास श्वास।

श्री गोविंदराव मुनघाटे
महाविद्यालयाच्या पवित्र शिक्षणभूमीत,
पुस्तकी ज्ञानाबरोबरच लाभली,
सेवेचीही खरी प्रेरणा।

जेव्हा NSS गणवेश अंगावर आला,
तेव्हा एक वेगळीच ओळख निर्माण झाली,
सेवा, समर्पण आणि त्यागाची,
खरी उमज आणि उंच भरारी मिळाली।

कधी गावांमध्ये जाऊन काम केलं,
कधी रक्तदान शिबिरं भरवली,
कधी स्वच्छतेची ज्योत पेटवून,
जागृतीची चळवळ उभी केली।

NSS ने शिकवले आम्हाला,
Not Me, But You हे तत्त्वज्ञान,
स्वतःच्या सुखापेक्षा इतरांचा विचार,
हीच मानवतेची खरी शान।

कॉलेजने दिले पुस्तकांचे बळ,
NSS ने दिला जीवनाचा अर्थ,
एकाने घडवले भविष्य आपले,
तर दुसऱ्याने दाखवला सेवेचा मार्ग।

आज मागे वळून पाहताना,
गर्वाने भरते हृदय आपले,
कॉलेज आणि NSS च्या आठवणी,
नेहमीच राहतील अंत:करणात आपले।

**विशाल देशमुख**, एम.ए. प्रथम (समाजशास्त्र)

# हिंदी विभाग



# अंतरराष्ट्रीय ग्लेशियर संरक्षण वर्ष २०२५

**कु. शुभांगी वैरागडे**, एम.एससी द्वितीय (रसायनशास्त्र)

**ग्लेशियर** हमारे ग्रह के पारिस्थितिकी तंत्र का एक महत्त्वपूर्ण हिस्सा हैं। वे पृथ्वी के जल संसाधनों का एक बड़ा भाग संग्रहीत करते हैं और कई नदियों के लिए जल स्रोत का कार्य करते हैं। हालाँकि, जलवायु परिवर्तन और बढ़ते वैश्विक तापमान के कारण ग्लेशियरों का तेजी से पिघलना एक गंभीर समस्या बन गई है। इसी कारण, संयुक्त राष्ट्र ने २०२५ को 'अंतर्राष्ट्रीय ग्लेशियर संरक्षण वर्ष' घोषित किया है ताकि ग्लेशियरों की रक्षा और उनके संरक्षण के लिए वैश्विक स्तर पर जागरूकता फैलाई जा सके।

**ग्लेशियरों का महत्त्व :** ग्लेशियर केवल बर्फ के विशाल भंडार नहीं हैं; पारिस्थितिक संतुलन बनाए रखने में एक अहम भूमिका निभाते हैं।

- **जल स्रोत :** ग्लेशियर कई नदियों का मूल स्रोत हैं, जो पीने के पानी, सिंचाई और जल विद्युत उत्पादन के लिए आवश्यक हैं।
- **जलवायु संतुलन :** ग्लेशियर पृथ्वी के तापमान को नियंत्रित करने में मदद करते हैं और मौसम प्रणाली को संतुलित रखते हैं।
- **जैव विविधता संरक्षण :** कई वन्यजीव और पारिस्थितिक तंत्र ग्लेशियरों से मिलने वाले पानी पर निर्भर होते हैं।
- **सांस्कृतिक और आर्थिक महत्त्व :** पर्वतीय क्षेत्रों में पर्यटन और स्थानीय अर्थव्यवस्था ग्लेशियरों से जुड़ी होती है।

**हाल के दशकों में ग्लेशियरों को कई गंभीर चुनौतियों का सामना करना पड़ रहा है :**

- **ग्लोबल वार्मिंग :** बढ़ते तापमान के कारण ग्लेशियर तेजी से पिघल रहे हैं, जिससे समुद्र स्तर बढ़ रहा है।
- **मानव गतिविधियाँ :** वनों की कटाई, प्रदूषण और अनियंत्रित पर्यटन से ग्लेशियरों को नुकसान पहुँच रहा है।
- **जल संकट :** ग्लेशियरों का पिघलना नदियों के प्रवाह को अस्थिर कर सकता है, जिससे जल संकट उत्पन्न हो सकता है।
- **प्राकृतिक आपदाएँ :** ग्लेशियरों के तेजी से पिघलने के कारण बाढ़, भूस्खलन और अन्य आपदाओं का खतरा बढ़ जाता है।

**अंतर्राष्ट्रीय ग्लेशियर संरक्षण वर्ष २०२५ के उद्देश्य : इस वर्ष को मनाने के पीछे मुख्य उद्देश्य निम्नलिखित हैं :**

- ग्लेशियर संरक्षण के प्रति वैश्विक जागरूकता बढ़ाना।
- अनुसंधान और वैज्ञानिक अध्ययन को बढ़ावा देना।
- जलवायु परिवर्तन की गति को धीमा करने के लिए ठोस कदम उठाना।
- सरकारों, संगठनों और नागरिकों को ग्लेशियरों के संरक्षण के लिए प्रेरित करना।
- सतत विकास लक्ष्यों (SDGs) को प्राप्त करने में योगदान देना।

**ग्लेशियर संरक्षण में भारत की भूमिका :** भारत के हिमालयी क्षेत्र में अनेक महत्त्वपूर्ण ग्लेशियर स्थित हैं, जो गंगा, यमुना और ब्रह्मपुत्र जैसी प्रमुख नदियों को जल प्रदान करते हैं। भारत सरकार और वैज्ञानिक संस्थाएँ इस दिशा में महत्त्वपूर्ण कार्य कर रही हैं : राष्ट्रीय हिमनद मिशन (National Glacier Mission) के तहत हिमालयी ग्लेशियरों का अध्ययन किया जा रहा है। पर्यावरण संरक्षण कानूनों को सख्ती से लागू किया जा रहा है। सतत पर्यटन को बढ़ावा दिया जा रहा है ताकि ग्लेशियरों पर पर्यावरणीय प्रभाव कम किया जा सके। नवीकरणीय ऊर्जा के उपयोग को बढ़ावा देकर कार्बन उत्सर्जन को कम किया जा रहा है।

ग्लेशियरों का संरक्षण केवल एक क्षेत्रीय मुद्दा नहीं, बल्कि वैश्विक चुनौती है। अंतर्राष्ट्रीय ग्लेशियर संरक्षण वर्ष २०२५ हमें यह अवसर प्रदान करता है कि हम एकजुट होकर इन अनमोल प्राकृतिक धरोहरों को बचाने के लिए प्रयास करें। सरकारों, वैज्ञानिकों, संगठनों और आम नागरिकों को मिलकर सतत और प्रभावी समाधान अपनाने होंगे ताकि आने वाली पीढ़ियों के लिए जलवायु संतुलन और जल स्रोत सुरक्षित रह सकें।

• • •



# क्वांटम विज्ञान और प्रौद्योगिकीअंतरराष्ट्रीय वर्ष २०२५

**अमित उराडे**, बी.एससी द्वितीय

**विज्ञान** और प्रौद्योगिकी की दुनिया में क्वांटम विज्ञान एक महत्त्वपूर्ण क्षेत्र बन चुका है। यह वह शाखा है जो अत्यंत सूक्ष्म स्तर पर कणों के व्यवहार और उनके गुणों का अध्ययन करती है। २०२५ को 'क्वांटम विज्ञान और प्रौद्योगिकी का अंतर्राष्ट्रीय वर्ष' घोषित किया गया है, जिससे इस क्षेत्र में जागरूकता बढ़ेगी और वैश्विक स्तर पर अनुसंधान और विकास को बढ़ावा मिलेगा।

क्वांटम विज्ञान भौतिकी की वह शाखा है जो परमाणु और उप-परमाणु कणों की विशेषताओं को समझने का प्रयास करती है। यह विज्ञान पारंपरिक भौतिकी से भिन्न है क्योंकि इसमें कण एक साथ कई अवस्थाओं में रह सकते हैं, जिसे सुपरपोज़िशन कहा जाता है, और वे आपस में जुड़े रह सकते हैं, जिसे क्वांटम इनटैंगलमेंट कहा जाता है। यह अवधारणाएं वर्तमान में कंप्यूटिंग, संचार, क्रिप्टोग्राफी और संवेदन जैसे क्षेत्रों में क्रांतिकारी बदलाव ला रही हैं।

**क्वांटम प्रौद्योगिकी के अनुप्रयोग :** क्वांटम विज्ञान के आधार पर विकसित होने वाली प्रौद्योगिकियां कई क्षेत्रों में उपयोगी सिद्ध हो रही हैं :

**१. क्वांटम कंप्यूटर :** पारंपरिक कंप्यूटरों की तुलना में कई गुना तेज गति से समस्याओं को हल करने में सक्षम हैं।

**२. क्वांटम संचार :** सुरक्षित संचार के लिए क्वांटम एन्क्रिप्शन तकनीक का उपयोग किया जा रहा है।

**३. क्वांटम संवेदन :** अत्यधिक संवेदनशील उपकरणों के माध्यम से चिकित्सा और भू-वैज्ञानिक अनुसंधान में नई संभावनाएं खुल रही हैं।

**अंतर्राष्ट्रीय वर्ष २०२५ का उद्देश्य :** संयुक्त राष्ट्र और विभिन्न वैज्ञानिक संस्थानों द्वारा २०२५ को 'क्वांटम विज्ञान और प्रौद्योगिकी का अंतर्राष्ट्रीय वर्ष' घोषित करने का मुख्य उद्देश्य इस क्षेत्र में वैश्विक स्तर पर सहयोग और अनुसंधान को बढ़ावा देना है। इसके माध्यम से : छात्रों और शोधकर्ताओं को प्रोत्साहित किया जाएगा। क्वांटम प्रौद्योगिकी के व्यावसायिक उपयोग को बढ़ावा मिलेगा। इस विषय पर वैश्विक स्तर पर सम्मेलन, संगोष्ठियां और कार्यशालाएं आयोजित की जाएंगी। नीतिगत ढांचे को मजबूत किया जाएगा ताकि देशों के बीच सहयोग बढ़े।

भारत भी क्वांटम अनुसंधान में अग्रणी बनने की दिशा में तेजी से बढ़ रहा है। हाल के वर्षों में सरकार ने राष्ट्रीय क्वांटम मिशन की शुरुआत की है, जिसका उद्देश्य इस क्षेत्र में शोध और विकास को प्रोत्साहित करना है। भारतीय वैज्ञानिक संस्थान जैसे कि IISc, IITs और अन्य शोध केंद्र इस दिशा में महत्त्वपूर्ण कार्य कर रहे हैं।

क्वांटम विज्ञान और प्रौद्योगिकी २१वीं सदी की सबसे महत्त्वपूर्ण वैज्ञानिक खोजों में से एक है। २०२५ को इस क्षेत्र का अंतर्राष्ट्रीय वर्ष घोषित किया जाना वैश्विक वैज्ञानिक समुदाय के लिए एक ऐतिहासिक कदम है। इससे न केवल विज्ञान में नवाचार को बढ़ावा मिलेगा, बल्कि विभिन्न देशों के बीच सहयोग भी मजबूत होगा। इस वर्ष का आयोजन निश्चित रूप से विज्ञान और प्रौद्योगिकी के भविष्य को एक नई दिशा देने में सहायक सिद्ध होगा।

•••



# नशा

**निखिल बोरकर**, बी.ए. प्रथम

**नशा** एक अभिशाप है, यह ऐसे मादक और उत्तेजक पदार्थ हैं, जिसका प्रयोग करने से व्यक्ति अपनी स्मृति और संवेदनशीलता अस्थाई रूप से खो देता है। वैसे तो नशे का चलन समाज में आदि काल से रहा है। भारत में मादक द्रव्यों के उपयोग का पहला सन्दर्भ ऋग्वेद में मिलता है। लगभग २००० ईसा पूर्व व्यक्ति विभिन्न उत्सवों पर सोमरस का पान करते थे जोकि एक प्रकार का मधुरत्त (नशा) था। आधुनिक समाज में आपदाओं का सामना करने के कई कारण है उनमें से नशा सेवन एक प्रमुख कारण है। कुछ साधारण लोग देसी शराब पीते हैं, जबकि कुछ अमीर लोग विदेशी शराब पीते हैं। लेकिन आधुनिक युग में पाश्चात्य संस्कृति से नशे को नए रूप मिले हैं। इसमें विशेष रूप से चरस, गांजा, भांग, अफीम, स्मैक, हेरोइन जैसी ड्रग उल्लेखनीय है। शराब भी इसी प्रकार का एक नशा है। अपने देश का दुर्भाग्य है कि लोग पाश्चात्य संस्कृति से इस नए रूप को ग्रहण तो कर रहे हैं, पर उनका अनमोल जीवन समय से पहले ही मौत का शिकार हो जाता है। आज अकेले भारत में बड़ी संख्या में लोग नशीले पदार्थों के सेवन से जान गंवा रहे हैं। बेहद अफसोस की बात तो यह है कि समाज में बढ़ते नशे के इस नए रूप से पीड़ित आज का अधिकांश मासूम किशोर व युवा पीढ़ी है। आज नशे ने बहुत से किशोरों को अपने चंगुल में कर लिया है। किशोरों में नशे के बढ़ते चलन के पीछे बदलती जीवन शैली, परिवार का दवाब, परिवार के झगड़े, इन्टरनेट का अत्यधिक उपयोग, एकाकी जीवन, परिवार के झगड़े, इन्टरनेट का अत्यधिक उपयोग, एकाकी जीवन, परिवार से दूर रहना, पारिवारिक कलह जैसे अनेक कारण है। आज का युवा पढ़ा-लिखा है लेकिन वह यह नहीं सोचता कि नशे से हमारा जीवन कैसा हो रहा है। आज का युवा धुआँ उड़ाता है, सरेआम वह नशे का इतना बादी हो गया है कि अपने बड़े-छोटे और बच्चों के सामने नशा करने में शर्म भी नहीं आती। आज का युवा तनाव ग्रस्त होकर नशा करता है और वह इसी नशे को अपनी जिन्दगी मान लेता है और उन्हें नशे की इतनी लत हो जाती है कि अगर न मिले तो वो अपनी जान देने में भी संकोच नहीं करते। नशीले द्रव्यों के उपयोग किशोरों तथा युवाओं के विकास और चरित्र में भी बाधा उत्पन्न करता है। आज नशे का प्रचलन न केवल शहर के लोगों में बल्कि ग्रामीण क्षेत्रों में भी देखने को मिलता है। भारत को स्वतंत्रता मिलने से पहले भी नशा मुक्ति के प्रयास चल रहे थे। इसमें गांधी जी की भूमिका बहुत ही ज्यादा महत्त्वपूर्ण थी। स्वतंत्र भारत के पहले प्रधानमंत्री स्वर्गीय पंडित जवाहरलाल नेहरू ने नशा मुक्ति के लिए कदम उठाए थे। सरकारी उपाय के रूप में इसके लिए आवश्यक कानून बनाया जा रहा है। सरकार नशीले पदार्थों की बिक्री से बहुत अधिक राजस्व एकत्र कर रही है। अगर उसकी बिक्री घटती है तो यह राजस्व पर दवाब डालेगा। इसके लिए वैकल्पिक व्यवस्था करने की आवश्यकता है, अधिक कर प्राप्त करने की आशा में सामाजिक जीवन का त्याग नहीं किया जा सकता है। नशीली दवाओं के उपयोग को बढ़ाने और अवैध व्यापार को रोकने के लिए तत्काल कार्यवाही की जानी चाहिए। हमारा काम स्वस्थ समाज का निर्माण करना है। अतः में बस इतना ही कहना चाहूंगी –

अनाचार बढ़ता है कर, सदाचार चुप रहता जब!!

•••



# महिला सशक्तिकरण

**कु. प्रणाली प्रधान**
एम.एससी द्वितीय (रसायनशास्त्र)

**प्राचीन** काल से भारतीय समाज में नारी का विशेष स्थान रहा है। हमारे आदि ग्रन्थों में नारी के महत्त्व को स्पष्ट करते हुए कहा गया है 'यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवताः' अर्थात् जहाँ नारी की पूजा होती है, वहाँ देवता निवास करते हैं। जिस समाज में नारी का स्थान सम्मानजनक होता है, वह उतना ही प्रगतिशील होता है। इसी प्रगतिशीलता की अवधारणा ने वर्तमान सन्दर्भ में महिला सशक्तिकरण को एक अभिमान का रूप देकर नारी की प्रांसगिकता को चित्रित किया है। परिवार और समाज के निर्माण में नारी का स्थान सदैव ही महत्त्वपूर्ण रहा है। जब समाज सशक्त और विकसित होता है तब राष्ट्र मजबूत होता है और एक सशक्त राष्ट्र निर्माण में नारी केंद्रीय भूमिका निभाती है। पं. जवाहर लाल नेहरू ने कहा है कि, 'लोगों को जगाने के लिए, महिलाओं का जागृत होना जरूरी है।' भारतीय समाज में वैदिक काल से ही नारी का स्थान बहुत ही सम्मानजनक था और हमारा अखंड भारत विदूषी नारियों के लिए जाना जाता है। किंतु कालांतर में नारी का पारिवारिक दायित्वों का निर्वहन करते हुए स्वयं को शिक्षा के अधिकार से वंचित रखना व हिंसा का प्रतिकार न करते हुए परम्पराओं एवं रुढ़ियों में जकड़े रहना नारी के सामाजिक विघटन को चित्रित करता है। मध्यकाल में यह स्थिति अपनी चरम सीमा पर पहुंच गई जिसकी अंतिम परिणिति आज महिला सशक्तिकरण की आवश्यकता के रूप में दिखाई देती है। वर्तमान सन्दर्भ में महिला सशक्तिकरण का अर्थ महिलाओं के सामाजिक और आर्थिक स्थिति में सुधार लाना है, ताकि उन्हें रोजगार, शिक्षा, आर्थिक विकास में बराबरी के अक्सर मिल सकें। जिससे वह सामाजिक स्वतंत्रता तथा तरक्की प्राप्त कर सके। महिला सशक्तिकरण की आवश्यकता के कारणों में लैंगिक असमानता, पुरुष प्रधान समाज के साथ-साथ प्राचीन परम्पराएं यथा-बाल विवाह, दहेज प्रथा, मौन हिंसा आदि आज भी समाज में किसी न किसी रूप में पैर पसारे हुए है। वर्तमान समय में महिला सशक्तिकरण के लिए राष्ट्रीय व प्रादेशिक स्तर पर बहुत से कानून, कार्यक्रम, संगठन मौजूद हैं जो महिलाओं को जागरूक करने के साथ उन्हें इस काबिल बना रहे है कि वह अपने, अपने परिवार, समाज और देश से जुड़े निर्णय ले सकें। अपने और अपने ऊपर हो रहीं हिंसा पर रोक लगा सके। भारत सरकार व राज्य सरकारें अपने स्तर पर महिला सशक्तिकरण को बल देने के लिए कई योजनाएं चला रही है अबला, जननी सुरक्षा योजना, सुकन्या समृद्धि योजना, लाडली, बेटी बचाओ बेटी पढ़ाओ, अपराजिता और तेजस्विनी जैसी कई योजनाओं का सफल संचालन किया जा रहा है। नारी सशक्तिकरण को बढ़ावा देने हेतु प्रतिवर्ष ८ मार्च को विश्व भर महिला दिवस के रूप में मनाता है। नारी को सशक्त बनाए बगैर हम मानवता को सशक्त नहीं बना सकते। संवेदना, करुणा, वात्सल्य, ममता, प्रेम, विनम्रता, सहनशीलता आदि नारी के वह गुण है, जिससे वह मानवता को निखार व संवारकर उसे मजबूत रूप दे सशक्त बना सकती है। महिला सशक्तिकरण आज के समय की जरूरत है क्योंकि इसी सशक्तिकरण की वजह से महिलाओं में आत्मनिर्भरता के साथ-साथ सामाजिक समस्याओं के प्रति सोचने व उसमें सुधार लाने की प्रतिबद्धता सुदृढ़ होगी। अंत में हम कह सकते है कि ''कोई भी देश सफलता के शिखर पर तब तक नहीं पहुंच सकता जब तक उसकी महिलाएं कंधे से कंधा मिला कर न चलें।'' इसके लिए आवश्यक है कि महिलाओं का सम्मान हो और प्रत्येक कार्य क्षेत्र में महिलाओं की समान भागीदारी सुनिश्चित की जाए।

• • •




# जीवन हर दिन एक नया खुला पन्ना है

**कु. पूनम डोंगरवार** बी.एस्सी. तृतीय

**जब** मनुष्य जन्म लेता है तो उसका कोई नाम नहीं होता केवल सांस होती है और जब वह मरता है तो उसके पास केवल नाम होता है लेकिन सांस नहीं होती नाम और सांस के बीच का अंतराल जीवन है। जीवन को कैसे जिया जाए यह हर किसी के हाथ में नहीं होता, कुछ को यह आसानी से मिल जाता है तो कुछ को इसे पाने के लिए काफी मुश्किलों का सामना करना पड़ता है। देखा जाए तो मनुष्य को अपनी पहली सांस से लेकर आखिरी सांस तक कई मुश्किल परिस्थितियों का सामना करना पड़ता है। हमें लगता है कि बचपन कितना खूबसूरत होता है, हर कोई कहता है कि बच्चे पर भगवान की कृपा होगी, लेकिन अगर हम देखने जाएं तो एक छोटे बच्चे का भी अपना संघर्ष होता है। फर्क सिर्फ इतना है कि हर किसी का संघर्ष अलग होता है।

जिंदगी बहुत खूबसूरत है, बस उसके प्रति हमारा नजरियां सकारात्मक होना चाहिए। लोगों के छोटे-छोटे दुख दुनिया के बड़े-बड़े दुखों में मिल जाते हैं, तब वे सुख का स्वाद चखते हैं।

सबके साथ घुलने-मिलने और मीठी बातें करने का आनंद। सभी को इसका अनुभव करना चाहिए। गलतफहमी और आपस में झगड़ना ही हमारे दिल को दुखाता है। क्योंकि यह जीवन बहुत सुंदर है, असली खुशी अपने तर्कों से बहस करने के बजाय एक दूसरे को समझने में एक साथ रहने में है। हमारे लोग और उनका प्यार जीवन का गहना है इसलिए अपनों को हमेशा खुश और संतुष्ट रखें और उनके साथ सुनहरे पल बिताएं। हमारे लोग बाजार में नहीं खरीदे जाते, उन्हें प्यार, आत्मीयता, सद्भाव और स्नेह से कमाना पड़ता है।

यह जीवन बहुत कठिन है चाहे हम कितना भी कहें यह हमारे लिए रुकता नहीं है और यह हमारे लिए नहीं बदलता है। हमें उसकी तरह बदलना होगा और उसके साथ चलना होगा, भले ही हमारे जीवन का सबसे महत्वपूर्ण और निकटतम व्यक्ति हमें हमेशा के लिए छोड़ कर चला गया हो, हम कुछ नहीं कर सकते।हम थक जाते हैं। जीवन में प्रतिकूल परिस्थितियों का सामना करना पड़ता है। आपके पास कोई अन्य विकल्प नहीं बचा है। हम कितना भी कह लें कि अगर ये शख्स हमें छोड़ गया तो हम जी नहीं पाएंगे, यह बहुत झूठ है क्योंकि जिंदगी ने हमारे लिए कुछ और ही लिखा होता।हमें इसका सामना करना होगा। एक बात जो मैंने अब तक सीखी है वह यह है कि आपके साथ कितने भी करीबी लोग हों जैसे माँ, पिताजी या रिश्तेदार, दोस्त। हालांकि जीवन में हर मुश्किल और बुरी स्थिति का सामना उस व्यक्ति को खुद करना चाहिए हमें अपनी लड़ाई खुद लड़नी है और एक बात सच है कि जिंदगी किसी के लिए नहीं रुकती सिर्फ इंसान ही रुकता है, इसलिए जब तक हम हैं तब तक जिएं, सबसे मीठी बातें करें और किसी का दिल ना दुखाएं क्योंकि अंत में वही नाम रहता है।

जब समय कठिन हो, तो अपने आप से कहना जारी रखें कि दौड़ अभी खत्म नहीं हुई है क्योंकि मैं अभी तक जीता नहीं हूं, जीवन वह है जहां आप बहुत सारे पैसे से मानवता नहीं कमा सकते हैं, पैसा आपको हर चीज से प्यार नहीं खरीद सकता है, आप चैन से नहीं सो सकते।

इसलिए जितना समय हमारे पास है उतना समय अपने आदमी के साथ बिताएं क्योंकि हमारा आदमी हमारे लिए है और अंत तक हमारे साथ है।

यही हमारी प्रार्थना और निवेदन है
मनुष्य को मनुष्य समझना।

• • •

हिंदी

# कविता



## भारतीय समाज और स्त्री

वो कभी सीता, कभी सावित्री कहलाती,
तो कभी चुपचाप आँसू पी जाती।
भारतीय समाज की वो गाथा है,
हर युग में जिसने कुछ नया देखा है।।

कभी पूजा गया देवी समझकर,
तो कभी जला दी गई दहेज में फंसकर।
कभी बाँधी गई मर्यादाओं की बेड़ी में,
तो कभी उड़ान भरी सपनों की घेरी में।।

घूंघट में छिपी एक लाज थी उसकी,
पर नज़रों में बसी एक आग थी उसकी।
संघर्षों से सींचा है जीवन का बीज,
हर आंधी से लड़ी, बनी अपनी ही चीज़।।

अब वो कलम भी है, तलवार भी,
शिक्षा की रौशनी, परिवार की दीवार भी।
वो डॉक्टर है, वैज्ञानिक है, नेता है,
वो माँ भी है, और क्रांति की रेखा है।।

समाज अब भी राह रोकता है कहीं,
पर उसकी जिद हर बंधन तोड़ती है वहीं।
वो अबला नहीं, सबला है आज,
बदल रही है धीरे-धीरे समाज की आवाज़।।

तो सलाम उस नारी को, जो सब सहती रही,
फिर भी हर सुबह नए सूरज-सी उगती रही।
भारतीय समाज की वो आत्मा है,
जो हर युग में नए रूप में संजाती है।।

• • •

**कु. प्रिया लांजेवार**, एम.एसस्सी द्वितीय (सूक्ष्मजीवशास्त्र)

## प्लास्टिक मुक्त करे ये भूमि

चलो संकल्प करें मिल जुलकर,
धरती को स्वच्छ बनाएं सुंदर।
हर कोने से हटाएं प्लास्टिक,
प्रकृति को दें उपहार अनोखा व स्तुत्य।।

पेड़ों की छाया फिर लहराए,
नदियाँ निर्मल गीत सुनाए।
ना हो जल में विष की बौछार,
ना हो धरा पर प्लास्टिक का भार।।

जो थैली हम लाते घर में रोज,
वही बनती है ज़हरीली खोज।
पशु-पक्षी त्रस्त हो जाते,
प्रकृति के स्वर मंद हो जाते।।

जिन हाथों ने बनाया प्लास्टिक,
अब वही बनें इसके वीर विरोधी।
कागज़, कपड़ा, बांस अपनाएं,
धरती को जीवनदान दिलाएं।।

एक कदम तुम बढ़ाओ आज,
कल बनेगा स्वच्छ समाज।
बच्चा-बूढ़ा सबको सिखाएं,
प्लास्टिक नहीं - ये मंत्र दोहराएं।।

धरती माँ का है ये निवेदन,
बचाओ मुझको, दूँ मैं जीवन।
तो चलो करें मे पावन कसम,
प्लास्टिक मुक्त करें हम हर एक धरम।

• • •

**कु. रजनी नाकाडे**, एम.एसस्सी प्रथम (रसायनशास्त्र)




मनोज थे वो कुमार हमारे,
देशभक्ति जिनकी थी प्यारी,
हर फिल्म में झलक दिखाई,
भारत माँ की सच्ची सवारी।

शहीद बने वो भगतसिंह जैसे,
क्रांति की ज्वाला ले चले,
पूरब और पश्चिम में दिखाया,
संस्कृति का मान कैसे पले।

उपकार से सिखाया सबको,
जय जवान और जय किसान,
रोटी कपड़ा और मकान में,
छू लिया हर दिल का मान।

क्रांति लाई फिर इक बार,
स्वतंत्रता की दीप जलाए,
हरियाली और रास्ता में भी,
प्रेम की राहें दिखलाए।

पैसा या प्यार का प्रश्न जब आया,
सच्चाई की राह ही चुनाया,
पत्थर के सनम में भी बन के,
इंसानियत का दीप जलाया।

है मंच या पर्दा कोई भी,
मनोज जी हर दिल में बसे,
देश, प्रेम, त्याग, बलिदान –
उनके अभिनय से शब्द बने।

भारत कुमार नाम पड़ा जब,
तो सम्मान ने सिर झुकाया,
सिनेमा के उस सच्चे सपूत को,
हर युग ने श्रद्धा से पाया।

• • •

**कु. अंजूम शेख,** बी.एससी तृतीय

## एक चीज

जितने के लिए कोई चीज है तो... **प्रेम**
पीने के लिए कोई चीज है तो... **क्रोध**
खाने के लिए कोई चीज है तो... **गम**
देने के लिए कोई चीज है तो... **दान**
दिखाने के लिए कोई चीज है तो... **दया**
लेने के लिए कोई चीज है तो... **ज्ञान**
कहने के लिए कोई चीज है तो... **सत्य**
रखने के लिए कोई चीज है तो... **इज्जत**
फेंकने के लिए कोई चीज है तो... **ईर्ष्या**
छोड़ने के लिए कोई चीज है तो... **मोह**
त्याग देने के लिए कोई चीज है तो... **गर्व**
छोटे-बड़ो को देने के लिए कोई चीज है तो... **मान**

• • •

**कु. ज्योती हलामी,** एम.एससी द्वितीय (रसायनशास्त्र)
(संकलन)

# English Section




# Human Rights Violation : A Global Challenge

**Pranay Malode**, M. Sc. 2nd (Chemistry)

**Human** rights are the fundamental liberties and entitlements given to every person in a society. It forms the bedrock of every society. However across the globe there is a persistent violation of the human rights which dawns a dark shadow on dignity, equality and freedom. The various dimensions of human rights violation and its major occurrence are given below.

1. **Political repression :**

One of the most prevalent forms of human rights violation is political repression. The governments have been restricting disagreements, curbing the freedom of speech and suppressing the political opposition. The activists, journalists and people who speak against the government often face violence, arbitrary detention and other forms of injustice.

2. **Social and economic injustice :**

Human rights violation not only encompasses the political sphere but also the social and economic spheres. Discrimination based on the individuals race, colour, gender, socio-economic status etc. deny their right to equality, Poverty often results in denial of basic human rights such as education, health care and food facilities.

3. **Migrant and refugee rights:**

The plight of migrant and refugees highlights another element of human rights violation. Discrimination and denial of basic human rights are often seen in the case of migrants and refugees.

4. **Cyber surveillance and privacy concerns :**

In the digital era, the violation of privacy is an often occurrence, Governments and private entities infringes the privacy of people as an excuse for mass surveillance.

In conclusion I would like to say that human rights violation is a dark stain on the conscience of the whole human race. Governments must prioritize the protection of human rights and protect their people against discrimination on all different basis. As we strive for a just and humane world, we should collectively. work towards the protection and promotion of human rights. Only when we follow these principles, our future generations. will enjoy a discrimination free society and they will enjoy the full spectrum of rights and freedom.

• • •



# Maruti Chitampalli

**Vaibhav Dakhane**, B.Sc. 2nd

**Maruti** Bhujangrao Chitampalli, revered as "Aranya Rishi" (The Forest Sage), has been honoured with the Padma Shri for his extraordinary contribution to literature, education, and wildlife conservation.

Although officially from Solapur, Vidarbha and Nagpur have been the true home of this 92-year-old forest officer, author, and conservationist, where he spent much of his life immersed in the region's forests and wildlife.

पहाटेला साडेपाच वाजता प्रार्थना, स्फूर्ती, प्राणायाम, योग्य घेण्यात आली. सकाळी आठ ते साडेअकराच्या दरम्यान श्रमदान व ग्राम स्वच्छता करण्यात आली. दुपारच्या बौद्धिक क्षेत्रामध्ये महात्मा गांधी आणि युवक यावर डॉ. दशरथ आदे यांनी मार्गदर्शन केले तर डॉ. नरेंद्र आरेकर यांनी अध्यक्षस्थान भूषवून 'गांधी मजबुरी का नहीं तर मजबूती का नाम है' असे प्रतिपादन केले. रात्री आठ ते दहाच्या दरम्यान समाज जागृती पर पथनाट्य सादरीकरण करण्यात आले.

**दिवस पाचवा : ३१ जानेवारी २०२५ रोजी शुक्रवार**

सकाळी साडेपाच वाजता दिवसाची सुरुवात होऊन प्रार्थना, सकाळी आठ ते साडे अकराच्या दरम्यान श्रमदान व ग्राम स्वच्छता करण्यात आली. दुपारी दोन ते चारच्या दरम्यान आरोग्यधाम संस्था कुरखेडाचे डॉक्टर रमेश कटरे व उपजिल्हा रुग्णालयाचे डॉ. बोरकर गावकऱ्यांचे आरोग्य शिबिर घेतले व सायंकाळी पाच ते सहाच्या दरम्यान भारतीय संविधान आणि महिला सक्षमीकरण यावर यशवंत कला महाविद्यालय शिरोलीचे डॉ. अमोल शेंडे यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान उप प्राचार्य पी.एस. खोपे हे होते.

**दिवस सहावा : ०१ फेब्रुवारी २०२५ रोजी शनिवार**

सकाळी प्रार्थना, स्पर्धेचे योग्य व्यायाम तसेच झुंबा डान्स यांनी केला. संविधान सन्मान प्रभात फेरी सकाळी आठ ते साडेसहाच्या दरम्यान काढण्यात आली व दुपारला दोन वाजता समारोपीय कार्यक्रम घेण्यात आला. या समारंभ कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. राजाभाऊ मुनघाटे हे होते तर आम्ही आमच्या आरोग्यासाठी संस्थेचे डॉ. सतीशभाऊ गोगुलवार व प्रा. प्रदीप चापले गोंडवाना विद्यापीठ गडचिरोलीचे जिल्हा समिती यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला संतोष हिचामी, राम लांजेवार, माजी उपसरपंच गुरुदेव हिचामी, अध्यक्ष वन व्यवस्थापन समिती एरंडी, चोकोबाची साखरे पोलीस पाटील एरंडी, माणिक हलामी उपसरपंच ग्रामपंचायत यांनी मार्गदर्शन केले. प्राध्यापक प्रदीप चापले यांनी राष्ट्रीय सेवा योजना शिबिरात तरुणांनी समाज उन्नतीसाठी केलेले कार्य यावर मार्गदर्शन केले. डॉ. सतीश भाऊ गोगुलवार साहेब यांनी मार्गदर्शन केले तसेच डॉक्टर राजाभाऊ मुनघाटे यांनी सदर शिबिर मध्ये शिकलेल्या गोष्टी आपण आपल्या जीवनात अंगीकारावे असे आवाहन केले.

**दिवस सातवा : ०२ फेब्रुवारी २०२५ रोजी रविवार**

शिबिरार्थ्यांचे प्रस्थान करण्यात आले.

कार्यक्रम अधिकारी
**डॉ संदीप निलावती निवृत्तीराव निवडंगे**
राष्ट्रीय सेवा योजना विभाग
श्री गोविंदराव मुनघाटे कला व विज्ञान महाविद्यालय, गडचिरोली

# शारीरिक शिक्षण विभाग



## कुरखेडाची 'लक्ष्मी' करणार गोंडवाना विद्यापीठाच्या मिनी गोल्फ चमूचे नेतृत्व

क्रीडा

कुरखेडा, (ता.प्र). स्थानिक श्री. गोविंदराव मुनघाटे कला व विज्ञान महाविद्यालयाची खेळाडू लक्ष्मी कोडापे या विद्यार्थिनीची अखिल भारतीय आंतर विद्यापीठ मिनी गोल्फ स्पर्धेकरिता गोंडवाना विद्यापीठ गडचिरोलीच्या संघात निवड करण्यात आली आहे. लक्ष्मी गोंडवानाच्या मिनी गोल्फ चमूचे नेतृत्व करणार आहे.

चुडेला झुंझुनू राजस्थान येथील श्री. जगदीशप्रसाद झाबरमल टिबरेवाला विद्यापीठात 24 ते 26 एप्रिल या कालावधीत आयोजित अखिल भारतीय आंतर विद्यापीठ मिनी गोल्फ स्पर्धेच्या स्ट्रोक इव्हेंटमध्ये गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली संघाचे ती प्रतिनिधित्व करणार आहे. यापूर्वीही या महाविद्यालयातील अनेक विद्यार्थ्यांनी राज्य व देशातील विविध विद्यापीठात गोंडवाना विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करीत यश संपादन केलेले आहे. प्राचार्य डॉ. राजाभाऊ मुनघाटे यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयाचा शारीरिक शिक्षण विभाग हा अतिशय उपक्रमशील असून, उल्लेखनीय कामगिरी करीत आहे. आदिवासी व नक्षलग्रस्त भागातील या महाविद्यालयाचे आतापर्यंत 160 पेक्षा अधिक विद्यार्थी विद्यापीठ संघाचे प्रतिनिधित्व करीत

आहेत. यामुळे या विद्यार्थ्यांना नोकरीच्या विविध संधी उपलब्ध झालेल्या आहेत. विविध क्षेत्रात हे कलर होल्डर विद्यार्थी कार्यरत आहेत. 2024 -25 या सत्रात महाविद्यालयातील एकूण 13 खेळाडूंची गोंडवाना विद्यापीठाच्या विविध संघात निवड झाली हे विशेष. ही महाविद्यालयासाठी गौरवाची बाब आहे. मिनी गोल्फ स्पर्धेकरिता निवड झाल्याबद्दल दंडकारण्य संस्थेचे अध्यक्ष तथा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजाभाऊ मुनघाटे, दंडकारण्य शिक्षण संस्थेचे संचालक मंडळ, महाविद्यालयाचे प्रभारी शारीरिक शिक्षण विभाग प्रमुख डॉ.



**आजच्या** स्पर्धेच्या युगात ग्रामीण तसेच अतिदुर्गम आदिवासी भागातून क्रीडा क्षेत्रात नैपूण्यवान खेळाडू निर्माण करण्याच्या दृष्टीने शारीरिक शिक्षण विभाग नेहमीच प्रयत्नरत असतो. यावर्षी सुद्धा गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली द्वारा घेण्यात येणाऱ्या आंतर महाविद्यालयीन स्पर्धेकरीता तसेच इतरत्र होणाऱ्या विविध स्पर्धेकरीता उत्कृष्ट खेळाडू घडविण्याचा प्रयत्न करण्यात आला. क्रीडा क्षेत्रातील ध्येय उराशी बाळगुन असलेल्या विद्यार्थी खेळाडूंना शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या सुदृढ बनविण्याचा प्रयत्न शारीरिक शिक्षण विभाग करित असतो. महाविद्यालयाच्या क्रीडा विभागाच्या विकासाच्या दृष्टीने व जास्तीत जास्त खेळाडू विद्यापीठ, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहचविण्याच्या उद्देशाने त्यांना विविध व आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून प्रशिक्षण देण्याचा प्रयत्न केला जातो.

महाविद्यालयात नवीन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या स्वागत सोहळयात शारीरिक शिक्षण विभागाच्या विविध उपक्रमात उत्स्फूर्तपणे सहभाग घेण्याचे आवाहन विद्यार्थ्यांना करण्यात आले. शारीरिक शिक्षण विभागाद्वारे खेळाचे महत्व व मिळणाऱ्या प्रोत्साहन गुणाबद्दल त्यांना विभागाद्वारे माहिती देण्यात आली व यापुर्वीचा शारीरिक शिक्षण विभागाच्या यशाचा आढावा विद्यार्थ्यांसमोर मांडण्यात आला.

गोंडवाना विद्यापीठ गडचिरोलीद्वारा आयोजित आतंरमहाविद्यालयीन स्पर्धेकरीता, विविध खेळामध्ये संघाचे प्रवेश निश्चित करण्यात आले. त्यानुसार शारीरिक शिक्षण विभागाद्वारे नियोजन करण्यात आले. महाविद्यालयाच्या संघात व वैयक्तिक खेळात सहभागी विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात आले. नियमित सराव करण्यावर भर देण्यात आला. विद्यापीठाद्वारे तयार करण्यात आलेल्या वेळापत्रकानुसार संघिक व वैयक्तिक स्पर्धेत भाग घेतलेल्या खेळाडूनां विविध झोनमध्ये पाठविण्यात आले.

### हॉकी स्पर्धा

दि. ३० सप्टें. २०२४ ला गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली द्वारा नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालय ब्रह्मपुरी येथे आंतरमहाविद्यालयीन हॉकी (पुरुष) स्पर्धेनंतर घेण्यात आलेल्या निवड चाचणीमध्ये महाविद्यालयाचा विद्यार्थी श्री. अमन तुलावी हा सहभागी झाला होता. त्याची अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेकरिता विद्यापीठाच्या हॉकी चमूत निवड झाली.

### कबड्डी स्पर्धा

दि. ०७-०८ ऑक्टो. २०२४ ला विद्यापीठाद्वारा आयोजित आंतरमहाविद्यालयीन कबड्डी (पुरुष) स्पर्धा शिवाजी महाविद्यालय गडचिरोली येथे घेण्यात आल्या. त्यात महाविद्यालयाच्या संघाने उत्कृष्ट प्रदर्शन करीत उपांत्य फेरीमध्ये मजल मारली.

दि. ०९-१० ऑक्टो. २०२४ ला विद्यापीठाद्वारा आयोजित आंतरमहाविद्यालयीन कबड्डी (मुली) स्पर्धा शिवाजी महाविद्यालय गडचिरोली येथे घेण्यात आल्या. यामध्ये महाविद्यालयाच्या कबड्डी (महिला) संघाने तृतीय क्रमांक पटकाविला.



## चित्रकलेत हातखंडा असलेली कल्याणी बॅडमिंटनमध्ये चमकली

क्रीडा

प्रदीप बोडणे
वैरागड

लहानपणापासून चित्रकलेची आवड. त्यात क्रीडा स्पर्धांतही रुची. असे विविध गुण असलेल्या कल्याणीची अखिल भारतीय आंतरविद्यापीठ बॉल बॅडमिंटन स्पर्धेसाठी निवड झाली. तामिळनाडू राज्यात झालेल्या आंतरविद्यापीठ स्पर्धेत तिने आपल्या कलागुणांचे प्रदर्शन केले.

कुरखेडा तालुक्याच्या चिनेगाव (फळसगाव) येथील कल्याणी विठ्ठल उईके हिचे सातवीपर्यंतचे शिक्षण जिल्हा परिषद शाळा चिनेगाव येथे झाले. प्राथमिक शिक्षण घेतल्यानंतर कढोली येथील श्री तुकाराम विद्यालय तथा कनिष्ठ महाविद्यालय कढोली येथे तिने बारावीपर्यंतचे शिक्षण घेतले. यादरम्यान चित्रकला, निबंध, क्रीडा तसेच अन्य स्पर्धेत भाग घेऊन ती अग्रगण्य राहिली. सध्या ती कुरखेडा येथील श्री गोविंदराव कला व विज्ञान महाविद्यालयात एम. ए. अंतिम वर्गाला आहे. कल्याणीची निवड यावर्षी अखिल भारतीय आंतरविद्यापीठ बॅडमिंटन स्पर्धेसाठी तामिळनाडू राज्यातील कराईकुडी येथे झाली, पण अंतिम फेरीत तिला अपयश आले. खेडेगावात शिक्षण घेऊन राज्यस्तरावर चमक दाखवणाऱ्या कल्याणीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

### लोकनाट्य, लोकनृत्य स्पर्धेतही कामगिरी

कल्याणी हिने यापूर्वी २०२२-२३ मध्ये गांधी विचार संस्कार परीक्षेत जिल्ह्यातून प्रथम क्रमांक पटकावला. चंद्रपूर येथे झालेल्या राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालय लोकनाट्य स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकाविला. देसाईगंज येथे २०२३ मध्ये झालेल्या राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालय लोकनृत्य स्पर्धेत द्वितीय क्रमांक तिने पटकावला होता.

### कबड्डीमध्ये क्रीडा कौशल्य, पेंटींगमध्येही दाखविले कसब

छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त आयोजित राज्यस्तरीय निबंध स्पर्धेत प्रथम क्रमांक, सांस्कृतिक कला महोत्सवातील रांगोळी स्पर्धेत प्रथम क्रमांक, आंतरमहाविद्यालयीन ... स्पर्धेत तृतीय क्रमांक ... कल्याणीने ... केली ...

### व्हॉलीबॉल स्पर्धा

दि. १५-१६ ऑक्टो. २०२४ ला विद्यापीठाद्वारा आंतरमहाविद्यालयीन व्हॉलीबॉल (पुरुष) स्पर्धा गुरुनानक महाविद्यालय बल्लारपूर येथे घेण्यात आल्या. त्यात महाविद्यालयाच्या संघाने उत्कृष्ट प्रदर्शन करीत तिसऱ्या फेरीपर्यंत मजल मारली.

### क्रॉस कंट्री स्पर्धा

दि. २९ नोव्हें. २०२४ ला विद्यापीठाद्वारा आनंद निकेतन महाविद्यालय वरोरा येथे आयोजित आंतरमहाविद्यालयीन क्रास कंट्री स्पर्धेत महाविद्यालयाच्या एका स्पर्धकाने सहभाग घेतला.

### बॉल बॅडमिंटन विद्यापीठाची चॅम्पियनशीप

दि. २२-२३ जाने. २०२५ ला विद्यापीठाद्वारा आंतरमहाविद्यालयीन बॉल बॅडमिंटन स्पर्धा चिंतामणी विज्ञान महाविद्यालय पोंभूर्णा जिल्हा - चंद्रपूर येथे घेण्यात आल्या. त्यात महाविद्यालयाच्या पुरुष संघाने आपल्या सर्वोत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करीत सलग दुसऱ्यांदा गोंडवाना विद्यापीठाची चॅम्पियनशीप पटकाविली.

याशिवाय बॉल बॅडमिंटनच्या महिला संघाने तृतीय क्रमांक पटकाविला.

### मिनी गोल्फ स्पर्धा

दिनांक २८ जाने. २०२५ ला शासकीय विज्ञान महाविद्यालय गडचिरोली येथे आयोजित मिनी गोल्फ (महिला) स्पर्धेनंतर घेण्यात आलेल्या निवड चाचणीमध्ये महाविद्यालयाची विद्यार्थीनी कु. लक्ष्मी कोडापे ही सहभागी झाली होती. तिची अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेकरीता विद्यापीठाच्या मिनी गोल्फ चमूत निवड झाली.

### सॉफ्टबॉल स्पर्धा

दि. २९-३० जाने. २०२५ ला विद्यापीठाद्वारा आयोजित आंतर महाविद्यालयीन सॉफ्टबॉल स्पर्धा शासकीय विज्ञान महाविद्यालय गडचिरोली येथे घेण्यात आल्या. त्यात महाविद्यालयाच्या पुरुष व महिला संघाने सहभाग नोंदविला व आपल्या उत्कृष्ट प्रदर्शनाच्या जोरावर पुरुष संघाने द्वितीय स्थान पटकाविले.

### गोंडवाना विद्यापीठ अमृत क्रीडा व कला महोत्सव शिक्षकेतर कर्मचारी संघ

### व्हॉलीबॉल स्पर्धेत विद्यापीठाची चॅम्पियनशीप

दि. ११-१२ जाने. २०२५ ला गोंडवाना विद्यापीठाद्वारे शिक्षकेतर कर्मचाऱ्यांकरिता आयोजित अमृत क्रीडा व कला महोत्सवात शारीरिक शिक्षण विभागाच्या मार्गदर्शनात महाविद्यालयाच्या शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या व्हॉलीबाल संघाने सर्वोत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करीत दुसऱ्यांदा गोंडवाना विद्यापीठाची चॅम्पियनशीप पटकाविली. या विजेत्या संघामध्ये महाविद्यालयाचे मुख्य लिपिक श्री मधुकरराव बोबाटे यांच्या नेतृत्वात श्री. रत्नाकर वासेकर, श्री. मंगेश मुनघाटे, श्री. सतिश मुनघाटे, श्री. कैलास जांभुळकर, श्री. आशीष बगमारे, श्री. राजेंद्र काचिनवार, श्री. सुभाष चिकराम यांनी सहभाग घेतला. व्हॉलीबॉल स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट खेळाडू म्हणून महाविद्यालयाचे वरीष्ठ लिपिक श्री. रत्नाकर वासेकर यांना गौरविण्यात आले.

**दौड स्पर्धा विजेते** - शिक्षकेतर कर्मचाऱ्यांकरिता आयोजित ५० वर्षांवरील वयोगटाच्या दौड स्पर्धेत श्री. रत्नाकर वासेकर यांनी प्रथम क्रमांक तर ४० वर्षे वयोगटात श्री. सतिश मुनघाटे यांनी तृतीय क्रमांक पटकाविला.

# विवि के स्पर्धा में मुनघाटे कॉलेज की सफलता

खेल जगत

## विभिन्न क्रीड़ा प्रतियोगिता हुई



■ कुरखेड़ा (त.सं.) दंडकारण्य शैक्षणिक व सांस्कृतिक विकास संशोधन संस्था गड़चिरोली द्वारा संचालित स्थानिक गोविंदराव मुनघाटे महाविद्यालय कुरखेड़ा के प्राध्यापकों ने गोंडवाना विश्वविद्यालय द्वारा आयोजित शिक्षक कला व क्रीड़ा महोत्सव अंतर्गत लिए गए विभिन्न स्पर्धा में सहभाग लेकर व्यापक सफलता अर्जित की. इस दौरान पुरुष दुहेरी बैडमिंटन स्पर्धा में डॉ. प्रमेश दाणी व डॉ. संजय महाजन ने सरदार पटेल महाविद्यालय चंद्रपुर को पराजित कर बैडमिंटन की चैम्पियनशिप प्राप्त की. वहीं बैडमिंटन में ही प्रा. डॉ. नरेंद्र आरेकर व प्रा. डॉ. गणेश सातपुते की जोडी ने गड़चिरोली जोन के उपविजेता रही. वहीं महाविद्यालय के वॉलीबाल टीम गड़चिरोली जोन में उपविजेता रहा. इसके अलावा व्यक्तिगत शतरंज स्पर्धा में महाविद्यालय के प्रा. धनराज लंजे ने भी उपविजेता बना. उक्त स्पर्धा में प्राचार्य डॉ. राजाभाऊ मुनघाटे के प्रेरणा व मार्गदर्शन, महाविद्यालय के प्रभारी शारीरिक शिक्षा विभाग प्रमुख डॉ. [illegible] आदे के [illegible] शतरंज आदि स्पर्धा में महाविद्यालय के प्राध्यापकों ने सहभाग लिया. महाविद्यालय के इस टीम में डॉ. दशरथ आदे, प्रा. डॉ. नरेंद्र आरेकर, डॉ. संजय महाजन, डॉ. प्रमेश दानी, प्रा. डॉ. गणेश सातपुते, प्रा. डॉ. दीपक बनसोड, प्रा. डॉ. निकेश लोखंडे, प्रा. डॉ. भास्कर कुमटे, प्रा. धनराज लंजे आदि ने सक्रिय सहभाग लेकर उत्कृष्ट खेल का प्रदर्शन करते हुए महाविद्यालय का नाम रोशन किया. इस सफलता के चलते दंडकारण्य शिक्षण संस्था के अध्यक्ष तथा महाविद्यालय के प्राचार्य डा. राजाभाऊ मुनघाटे [illegible]

### शिक्षक संघ

दि. २८–२९ जाने. २०२५ ला गोंडवान विद्यापीठाद्वारे प्राध्यापकांकरिता आयोजित अमृत क्रीडा व कला महोत्सवात शारीरिक शिक्षण विभागाच्या मार्गदर्शनात महाविद्यालयाच्या प्राध्यापक संघाने व्हॉलीबाल, बॅडमिंटन व बुद्धिबळ स्पर्धेत सहभाग घेतला.

व्हॉलीबाल स्पर्धेत उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करीत झोनच्या उपांत्य फेरी पर्यंत मजल मारली. महाविद्यालयाच्या व्हॉलीबाल संघात प्रा. डॉ. दशरथ आदे, प्रा. डॉ. नरेंद्र आरेकर, प्रा. डॉ. संजय महाजन, प्रा. डॉ. गणेश सातपुते, प्रा. डॉ. प्रमेश दाणी, प्रा. डॉ. दीपक बन्सोड, प्रा. किशोर खोपे व प्रा. धनराज लंजे यांनी सहभाग घेतला.

### बॅडमिंटन स्पर्धेत विद्यापीठाची चॅम्पियनशीप

बॅडमिंटन दुहेरी स्पर्धेत प्रा. डॉ. संजय महाजन व प्रा. डॉ. प्रमेश दाणी यांनी विद्यापीठाची चॅम्पियनशीप पटकाविली. तर डॉ. नरेंद्र आरेकर व डॉ. गणेश सातपुते यांनी उपविजेतेपद पटकाविले. याशिवाय बुद्धिबळ स्पर्धेत प्रा. धनराज लंजे यांनी उपविजेतेपद पटकाविले.

### वार्षिक क्रीडा महोत्सवाचे आयोजन

महाविद्यालयात दिनांक १३–१५ फेब्रुवारी २०२५ ला महाविद्यालयीन वार्षिक क्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. या अंतर्गत विद्यार्थ्यांच्या व्हॉलीबॉल, क्रिकेट, कॅरम, बुद्धीबळ आणि बॅडमिंटनच्या सांघिक व वैयक्तिक स्पर्धा घेण्यात आल्या. सोबतच महाविद्यालयाचे प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचारी यामध्ये व्हॉलीबॉलचा प्रदर्शनीय सामना खेळविण्यात आला. सर्व विजेत संघ आणि खेळाडूंना महाविद्यालयाच्या वार्षिक बक्षिस वितरण सोहळयांत पद्मश्री परशुरामजी खुणे यांचे हस्ते चषक आणि प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

## हेल्थ क्लब
### वेळापत्रक

| अ.क्र. | महाविद्यालयातील वर्ग (गट) | वेळ |
|---|---|---|
| १ | कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी (मुले) वर्ग ११ व १२ | सकाळी ०५:०० ते ०६:३० |
| २ | वरिष्ठ महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी (मुले) व महाविद्यालयातील कर्मचारी वृंद | सकाळी ०६:३० ते ०८:०० |
| ३ | महाविद्यालयातील विविध संघात सहभाग घेतलेले खेळाडू | सकाळी ०८:०० ते ०९:०० आणि संध्याकाळी ०६:३० ते ०७:०० |
| ४ | महाविद्यालयातील संपूर्ण मुली | संध्याकाळी ०४:०० ते ०५:३० |
| ५ | महाविद्यालयातील कर्मचारी वृंद | संध्याकाळी ०५:३० ते ०६:३० |

# ग्रंथालय विभाग

## कुरखेडातील विद्यार्थ्यांनी जाणले दिवाळी अंकांचे महत्त्व

### मुनघाटे महाविद्यालयाचा उपक्रम : वाचनामुळे ज्ञानात भर पडण्यास होते मदत

लोकमत न्यूज नेटवर्क

कुरखेडा : स्थानिक श्री गोविंदराव मुनघाटे कला व विज्ञान महाविद्यालयाच्या ज्ञान स्त्रोत केंद्राच्या वतीने दिवाळी अंक २०२४ प्रदर्शनीचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजाभाऊ मुनघाटे यांच्या हस्ते करण्यात आले.

प्रमुख अतिथी म्हणून महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. अभय साळुंके, प्रोफेसर नरेंद्र आरेकर, डॉ. दशरथ आदे, डॉ. गुणवंत वडपल्लीवार, डॉ. दीपक बनसोड, डॉ. निकेश लोखंडे, डॉ. अमित रामटेके, डॉ. संदीप निवडंगे, डॉ. हेमंत मेश्राम, डॉ. रवींद्र विखार इत्यादी उपस्थित होते. याप्रसंगी प्राचार्य डॉ. राजाभाऊ मुनघाटे यांनी



दिवाळी अंकांचे अवलोकन करताना मुनघाटे महाविद्यालयाच्या विद्यार्थिनी.

सदर दिवाळी अंक हे विद्यार्थ्यांसाठी ज्ञानाचे खाद्यान्न असल्याचे मत व्यक्त करीत महाराष्ट्रातील विविध प्रकाशकांनी उपलब्ध केलेल्या दिवाळी अंकाचे [illegible] महाविद्यालयात आयोजित केल्याबद्दल व विविध विषयाचे अंक प्रदर्शनी ठेवल्या[illegible] महाविद्या[illegible] केले. विद्यार्थ्यांनी हे अंक वाचन करून आपल्या ज्ञानात भर घालावी असे प्रतिपादन केले. आदिवासी भागातील विद्यार्थ्यांसाठी सदर अंक हे पर्वणीच आहे.

अशा प्रकारची दिवाळी अंक प्रदर्शनी दरवर्षी महाविद्यालयात आयोजित केल्या जाते. महाविद्यालयाचे विद्यार्थी ग्रंथ वाचून उत्तम लेखन करीत असल्याचे प्रतिबिंब महाविद्यालयाच्या दरवर्षी प्रकाशित होणाऱ्या मृद्गंध वार्षिक अंकात दिसत असल्याचे मत डॉ. राजाभाऊ मुनघाटे यांनी व्यक्त [illegible]

**ग्रंथालय** हा मानवी जीवनाचा अविभाज्य अंग आहे. मानवी ज्ञान विज्ञानाची परंपरा जोपासण्याचे कार्य ग्रंथालय करतात म्हणूनच ग्रंथालयांना ज्ञानाची सदावर्ते म्हटले जाते. शैक्षणिक संस्थेतील कोणत्याही शाळा महाविद्यालयातील ग्रंथालय म्हणजे मानवी शरीरातील हृदयासारखे असते.

महाविद्यालयाच्या स्थापना वर्षीच १९९० ला ग्रंथालयाची मुहूर्तमेढ रोवली गेली. ३५ वर्षात ग्रंथालयातील ग्रंथसंख्या **१९३६४** पर्यंत वाढली आपल्या महाविद्यालयीन ग्रंथालयात कला, विज्ञान, अभ्यासक्रमासाठी लागणारे संदर्भ ग्रंथ, मासिके, साप्ताहिके, मराठी, इंग्रजी, हिन्दी भाषेतील वर्तमानपत्रे उपलब्ध आहेत. या वर्षी खरेदी केलेले ग्रंथ संख्या खालीलप्रमाणे –

- २०२४–२५ ग्रंथसंख्या २०५ आहे त्याची किमंत रु. ४९,३४५/-
- मासिके ३४
- वर्तमानपत्रे १०

**ग्रंथालयाचा संदर्भ विभाग**

आपल्या महाविद्यालयीन ग्रंथालयाचा संदर्भ विभाग समृद्ध आहे. या संदर्भ विभागात Encyclopedia of Britanica विविध विषयाच्या शब्दकोश, कला शाखेतील इंग्रजी, मराठी साहित्य, इतिहास, राज्यशास्त्र, समाजशास्त्र, अर्थशास्त्र, भुगोल, गृह अर्थशास्त्र, या विषयाचे विश्वकोष ग्रंथालयात उपलब्ध आहेत त्याच प्रमाणे विज्ञान शाखेकरिता लागणारे विश्वकोषही सर्व खंडासहित उपलब्ध आहेत.

याशिवाय आमच्या ग्रंथालय विभागाने काही महत्त्वाच्या ग्रंथकाराचे वाङ्मय संग्रहीत करण्याचा परिश्रमपुर्वक प्रामणिक प्रयत्न केला आहे. विविध ज्ञान शाखेसोबत मराठी स्वारस्वातील प्राचीन अर्वाचीन अशी ग्रंथसंपदा आणि संदर्भ समीक्षा साधने वाचकासाठी उपलब्ध करून दिले आहे. महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक, पालक, गावातील नागरीक ग्रंथालयातील ग्रंथसंपदेचा नेहमीच वापर करतात.

**विशेष ग्रंथसंग्रह**

महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागात २०० वर्ष जुने वेदाज (हस्तलिखीत), १०५ वर्ष जुनी तुकाराम गाथा (प्रकाशित) संदर्भ ग्रंथ ग्रंथालयात उपलब्ध आहेत.

**डिजीटल ग्रंथालय :**

आपल्या महाविद्यालयीन ग्रंथालयात २०१२–१३ पासून विद्यापीठ अनुदान आयोग द्वारा प्रायोजीत डिजीटल ग्रंथालय सेवा; NLIST सुरू आहे, त्याच बरोबर २०१८ पासून भारत सरकार द्वारा प्रमाणीत डिजीटल ग्रंथालय सेवा (एन.डी.एल. आय.) सुरू करण्यात आली आहे. या सेवांचा




### मुनघाटे महाविद्यालयात वाचन कौशल्य कार्यशाळा

**पुण्य नगरी** / प्रतिनिधी

**कुरखेडा** : क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचे कार्य आजही प्रेरणादायी असून क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचे कार्य केवळ शिक्षण, समाजसुधारक पुरतेच मर्यादित नसून उत्तम साहित्यिकही होत्या. त्यांनी १८५४ साली काव्यफुले हा कवितासंग्रहात ४१ कविता प्रकाशित असून त्यांचे अनेक लेख वाचनीय व अनुकरणीय असल्याचे प्रतिपादन दंडकारण्य शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष तथा प्राचार्य डॉ. राजाभाऊ मुनघाटे यांनी केले.

स्थानिक श्री गोविंदराव मुनघाटे कला व विज्ञान महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभाग व महिला अध्ययन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त वाचन कौशल्य कार्यशाळा पार पडली. यावेळी ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून उपप्राचार्य डॉ. अभय साळुंखे, मार्गदर्शिका प्रा. हेमलता उराडे, ग्रंथालय विभाग प्रमुख डॉ. अनिल भोयर आदी उपस्थित होते.

याप्रसंगी प्राचार्य डॉ. राजाभाऊ मुनघाटे यांनी आजही समाजात मुलींना शिक्षणासाठी बाहेर ठिकाणी पाठवित नाही, ही खंत व्यक्त करीत जागतिकीकरणाच्या युगात मुलगी शिकली पाहिजे व स्वतःच्या पायावर उभे राहून तिने भविष्याची वाटचाल करावी. आपले उद्दिष्ट मोठे असले पाहिजे. आजच्या फेसबुक व मीडियाच्या युगात हार्ड कापीला महत्त्व असून जे प्रिंट मटेरियल असते ते वाचनीय असते. आपण दररोज वर्तमानपत्र वाचन करावे व महिन्यातून एक तरी पुस्तक वाचावे, असे आवाहन करीत स्व. गोविंदराव मुनघाटे यांनी गडचिरोली जिल्ह्यात पहिली वृत्तपत्राची एजन्सी घेतलेली होती. त्या माध्यमातून आम्हा भावंडांना वाचण्याची सवय लागली, याचाही उल्लेख करीत आपली आई कमी शिक्षण घेतले असतानाही वाचनाचा छंद जोपासला होता, याचाही उल्लेख त्यांनी याप्रसंगी केला. त्यांनी काय वाचावे? कसे वाचावे? कुठले पुस्तक वाचावे? यावरही त्यांनी प्रकाश टाकला. वाचनामुळे ज्ञानाच्या कक्षा रुंदावतात, सकारात्मक दृष्टी विकसित होते, विचाराची प्रगल्भताला वाढते, असेही प्राचार्य डॉ. राजाभाऊ मुनघाटे यांनी याप्रसंगी विचार व्यक्त केले.

यावेळी प्रा. हेमलता उराडे यांनीही सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक तृप्ता वाकडे यांनी केले. संचालन ... अनिल भोयर तर आभार प्रा. ... यांनी मानले. यशस्वी... सर्व स...

लाभ विद्यार्थी, प्राध्यापक, संशोधकांना होत आहे.

**स्पर्धा परीक्षेचे मार्गदर्शन केंद्र**

ग्रंथालयात स्पर्धा परिक्षेचे मार्गदर्शन केंद्र असून विद्यार्थ्यांना विविध क्षेत्रातील रोजगार विषयक माहिती पुरविण्यात येते. वरील केंद्रामार्फत स्पर्धा परिक्षा व परिक्षेला लागणारे ग्रंथासंबंधीची माहिती ग्रंथालयाद्वारा दिली जाते.

**ग्रंथालय विभागाला मान्यवरांच्या भेटी :**

श्री गोंविंदराव मुनघाटे कला व विज्ञान महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागाला नाट्य कलावंत पद्मश्री डॉ. परशुरामजी खुणे, केंद्र सरकारच्या भाषा विभागाचे सदस्य डॉ. सत्यवानजी मेश्राम, साहित्यिक डॉ. नंदकुमार मोरे, संस्थेचे सचिव डॉ. प्रमोद मुनघाटे सर यांनी महाविद्यालयाच्या ग्रंथालयाला भेट देऊन उपयोजीत उपक्रमाचे कौतूक केले.

**ग्रंथालयाचे उपक्रम**

या सत्रात वाचक उद्‌बोधन वर्ग, डॉ. एस.आर. रंगनाथन जयंती, दिवाळी अंकाचे ग्रंथप्रदर्शन, हिन्दी साहित्य समारोह, डॉ.ए.पी.जे. अब्दूल कलाम यांच्या जयंती निमीत्य वाचक दिवस कार्यक्रम आयोजीत करण्यात आले होते.

**NDLI Club**

भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयाद्वारे संचालीत NDLI नोंदणी २०१८ या शैक्षणिक वर्षात केली होती. ह्या डिजीटल ग्रंथालयात ६,००,००० ग्रंथ संख्या असून ती सर्वांना वाचनासाठी उपलब्ध आहेत. भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयाद्वारे NDLI क्लबची मान्यता महाविद्यालयीन ग्रंथालयाला २०२०-२१ या शैक्षणिक वर्षात मिळाली. शासनाद्वारे दिलेल्या दिशा निर्देशानूसार महाविद्यालयीन NDLI Club ने वर्षभरात ६ कार्यक्रमाचे आयोजन केले आहे.

**आभार**

महाविद्यालयीन ग्रंथालयाच्या यशस्वीतेची धुरा सांभाळणारे संस्थेचे अध्यक्ष तथा प्राचार्य डॉ. राजाभाऊ मुनघाटे, IQAC Cell चे समन्वयक प्रा. डॉ. अभय सोलुंके, क्लबचे पदाधिकारी, ग्रंथालय सल्लागार मंडळाचे पदाधिकारी, दंडकारण्य शैक्षणिक व सांस्कृतिक विकास संस्थेचे पदाधिकारी, महाविद्यालयाचे प्राध्यापक, वाचक, विद्यापीठाचे पदाधिकारी या सर्वांच्या मार्गदर्शनाखाली ग्रंथालयाची वाटचाल सुरू आहे.

**डॉ. अनिल भोयर**
ग्रंथपाल

# रोजगार मार्गदर्शन केंद्र

**महाविद्यालयातील** विद्यार्थी परिसरातील शेतकरी आणि तरुणांना रोजगार व व्यवसायाची संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने महाविद्यालयात रोजगार मार्गदर्शन केंद्राची स्थापना करण्यात आलेली आहे. या विभागाद्वारे दरवर्षी विविध रोजगार भिमुख उपक्रम महाविद्यालयात राबविले जातात. विद्यार्थ्यांचा, परिसरातील बेरोजगार तरुणांचा विकास व्हावा याकरिता महाविद्यालय सदैव प्रयत्नशील असतो. त्यासोबतच परिसरातील ग्रामविकास व्हावा, शेतकऱ्यांनी तांत्रिक शेती कशी करावी त्याचे नवनवीन उपक्रम आणि शासकीय योजना त्यांच्यापर्यंत पोहोचविण्याचा महाविद्यालयातील रोजगार मार्गदर्शन केंद्राचा एक महत्त्वाचा उद्देश आहे. हे उद्देश पूर्ण करण्याकरिता महाविद्यालयाने पाच खेडेगाव सुद्धा दत्तक ग्राम म्हणून घेतलेली आहे. शेतकऱ्यांना, विद्यार्थ्यांना बाहेरील तरुणांना आत्मनिर्भर होण्यासाठी व सरकारच्या अनेक योजना त्यांच्यापर्यंत पोहोचविणे आणि त्यांना विविध स्तरावरून मार्गदर्शन करणे हे या विभागाचे प्रमुख कार्य आहे. महाविद्यालयातील संपूर्ण विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा त्यांना रोजगार संधी उपलब्ध व्हावी याकरिता संपूर्ण देशातून विविध तज्ज्ञ मार्गदर्शकांद्वारे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले जाते. त्यासोबतच स्पर्धा परीक्षाची तयारी, त्यांच्या मुलाखती, त्याकरिता लागणारे पाठ्यपुस्तक अभ्यासक्रम इत्यादी विषयावरसुद्धा या विभागाद्वारे वेळोवेळी मार्गदर्शन केले जाते. विभागात याकरिता स्वतंत्र ग्रंथालयसुद्धा महाविद्यालयाने उपलब्ध करून दिलेले आहे. यात विद्यार्थी महाविद्यालयातील तासिके व्यतिरिक्त त्यांना जेव्हा जेव्हा वेळ मिळते तेव्हा तेव्हा ते या ग्रंथालयाचा उपयोग करतात.

१. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये महाविद्यालयाने रोजगार मार्गदर्शन केंद्र मार्फत माननीय प्राचार्य डॉ. राजाभाऊ मुनघाटे यांच्या मार्गदर्शनात दिनांक ५ ऑगस्ट २०२४ ला पर्यावरण सुरक्षा आणि युवक यावर EIA कोऑर्डिनेटर श्री. सचिन जैन यांनी महाविद्यालयातील ८० हून अधिक विद्यार्थ्यांना आभासी कार्यशाळेतून मार्गदर्शन केले. या मार्गदर्शनात पर्यावरण विषयक खाते कसे सांभाळले जातात आणि त्यात कुठले कार्य केले जातात यावर खोलवर प्रकाश टाकला.

२. दिनांक ऑगस्ट २०२४ रोज मंगळवारला महाविद्यालयात बी.एस्सी. स्नातक पदवी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांकरिता ANACON INDIA PVT. LTD, NAGPUR या कंपनीकरिता कॅम्पस रिक्रुटमेंट ड्राईव्ह घेण्यात आला त्यात ६८ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती त्यापैकी ४८ विद्यार्थ्यांनी मुलाखत दिली. यात महाविद्यालयातील ११ विद्यार्थ्यांची कंपनीने निवड केलेली होती. परंतु त्या ठिकाणी तीन विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष नोकरीत रुजू झाले.

३. कौशल्य रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या शासन निर्णय अन्वये महाविद्यालयात मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना राबविण्यात आली आणि आता सुद्धा सुरळीत रित्या सुरू आहे यामध्ये ३१ ऑगस्ट २०२४ ला अर्ज मागविण्यात आले. यात १२८ अर्जदारांनी अर्ज सादर केला त्यापैकी २५ अर्जदारांना मुलाखतीकरिता संकेतस्थळावरूनच बोलविण्यात आले. दिनांक २० सप्टेंबर २०२४ ला महाविद्यालयातील कमिटीने मुलाखत घेऊन



## मुनघाटे महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची पर्यावरण भूगर्भशास्त्रज्ञ म्हणून निवड

### कॉलेज कॅम्पस इंटरव्यूमध्ये यश

देशोन्नती वृत्तसंकलन

कुरखेडा : दंडकारण्य शैक्षणिक व सांस्कृतिक विकास संशोधन संस्था गडचिरोली द्वारा संचालित स्थानिक श्री गोविंदराव मुनघाटे कला व विज्ञान महाविद्यालयाच्या रोजगार मार्गदर्शन केंद्र व ॲनाकॉन प्रायव्हेट लिमिटेड नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने ६ ऑगस्ट ला महाविद्यालयात कॅम्पस प्लेसमेंट ड्राईव्हच्या आयोजन करण्यात आलेले होते. सदर कॅम्पस मुलाखत ॲनाकॉन पुणे श्रीकांत व्यवहारे, अंजू नायक आणि डॉ. प्रियंका मजुमदार यांनी घेतले. यात महाविद्यालयातील व परिसरातील शेकडो विद्यार्थ्यांनी मुलाखती दिल्यात.

महाविद्यालयातील तुषार सहारे, निखिल लेंढे, अभिषेक पिलारे या विद्यार्थ्यांची टाटा ग्रुप ऑफ इंडस्ट्रीज अंतर्गत झारखंड येथील लोहखनिज खान येथे पर्यावरण भूगर्भ शास्त्रज्ञ म्हणून निवड झाली आहे. स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून या विद्यार्थ्यांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजाभाऊ मुनघाटे यांच्याहस्ते नियुक्तीपत्र देण्यात आले व त्यांना गौरविण्यात आले.

यापूर्वीही महाविद्यालयात अशा प्रकारच्या विविध कंपन्यांचे प्लेसमेंट ड्राईव्ह आयोजित करून महाविद्यालयातील व परिसरातील अनेक विद्यार्थ्यांना विविध कंपन्या मध्ये रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिलेल्या होत्या.

सदर विद्यार्थ्यांनी [illegible] यशाची श्रेय महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजाभाऊ मुनघाटे व महाविद्यालयाच्या रोजगार मार्गदर्शन केंद्राचे समन्वयक तथा भूगर्भशास्त्र विभाग प्रमुख डॉ. गुणवंत वडपल्लीवार, डॉ. गणेश सातपुते यांना दिलेली आहे.

या सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन प्राचार्य डॉ. राजाभाऊ मुनघाटे, दंडकारण्य संस्थेचे सर्व सन्माननीय [illegible]



त्यात सहा युवा प्रशिक्षणार्थ्यांची निवड करण्यात आली. आजतागायत संपूर्ण सहाही प्रशिक्षणार्थी यशस्वीरित्या प्रतिमहा रुपये दहा हजार प्रमाणे अनियमित तत्त्वावर प्रशिक्षण घेत आहेत.

४. सांस्कृतिक कार्य विभाग महाराष्ट्र शासनाद्वारे दिनांक १० ते २२ फेब्रुवारी २०२५ दरम्यान दहा दिवसीय झाडीपट्टी नाट्य प्रशिक्षण २०२५ महाविद्यालयात पार पडले यामध्ये ३० गुण अधिक विद्यार्थ्यांनी युवकांनी नाट्य प्रशिक्षण घेतले या प्रशिक्षणात संपूर्ण महाराष्ट्रातील शिक्षित गाजलेले नाट्यकलावंत सिनेकलावंत यांनी मार्गदर्शन केले सदर नाट्य संमेलन नाट्य प्रशिक्षण कार्यशाळा पद्मश्री डॉ. परशुराम खुणे यांच्या प्रमुख उपस्थितीत शिबीर प्रमुख म्हणून पार पडले यात मराठी चित्रपट सृष्टीतील 'तानी' चित्रपटातील प्रमुख नाईका 'वत्सला पोलकमवार' यांनी अभिनयावर सखोल असे मार्गदर्शन केले. त्यासोबतच प्रभाकर आंबोणे, मीना देशपांडे, डॉ. शेखर डोंगरे, डॉ. खुणे, संगीता टेकाडे, डॉ. राजकुमार मुसने, डॉ. धनराज खानोरकर, श्री. हिरालाल पेंटर इत्यादी कलाकारांनी सलग दहा दिवस नाट्यशास्त्रावर मार्गदर्शन केले. प्रसिद्ध नाटचलेखक, नाटचदिग्दर्शक, नाट्यकलावंत प्राचार्य सदानंद बोरकर सर यांनी नाट्यलेखन आणि नाट्यतंत्र यावर खोलवर प्रकाश टाकला तर श्री. विजय मुळे सर यांनी नाट्यदिग्दर्शन नेपथ्य रंगभूषा आणि वेशभूषा कशी असावी यावर खोलवर चर्चा केली. या नाट्य प्रशिक्षणातून २० हून अधिक युवक नाट्य कलाकार तयार झाले. हे या झाडीपट्टी नाट्य प्रशिक्षणाचे फलित. याकरिता उपसंचालक माननीय संदीप शेंडे सांस्कृतिक कार्य विभाग महाराष्ट्र शासन, मुंबई यांचे विभाग हृदयातून आभार मानत आहे. सदर नाट्य प्रशिक्षणाचे उद्घाटन माननीय प्राचार्य डॉ. राजाभाऊ मुनघाटे, पद्मश्री डॉ. परशुराम खुणे आणि कार्यक्रमाचा समारोप संस्थेचे उपाध्यक्ष माननीय देवाजी पाटील नरूले यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला.



यावर्षी राबविलेल्या पार पाडलेल्या विविध उपक्रमातून युवकांचा, शेतकऱ्यांचा आणि विद्यार्थ्यांचा आर्थिक विकास व्हावा याकरिता महाविद्यालयातील रोजगार मार्गदर्शक केंद्र सदैव क्रियाशील व मदतीकरिता तयार असेल.

**डॉ. गुणवंत वडपल्लीवार**
संयोजक

# सांस्कृतिक विभाग




**महाविद्यालयातील** विद्यार्थ्यांमध्ये व्यक्तिमत्त्व विकास, सामाजिक बांधिलकी, राष्ट्रभक्ती, सांस्कृतिक जाणिवा आणि कलात्मक अभिव्यक्ती यांचा विकास होण्यासाठी सांस्कृतिक विभागामार्फत वर्षभर विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. विध्यार्थ्यांना हवाहवासा वाटणारा सांस्कृतिक विभाग नवोदित विद्यार्थ्यांच्या स्वागत समारंभापासून विद्यार्थ्यांच्या मनात घर करीत जातो. प्राचार्य महोदयांच्या मार्गदर्शनात या विभागाची जबाबदारी डॉ. हेमराज मेश्राम, प्रा. तृप्ता वाकडे, डॉ. संजय महाजन, प्रा. धनराज लंजे आणि प्रा. हेमलता उराडे यांच्याकडे आहे. सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना सामाजिक मूल्यांची जाणीव, बौद्धिक समृद्धीचा अनुभव, राष्ट्रप्रेमाची भावना तसेच भारतीय इतिहासातील प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वांची ओळख होईल, यासाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन विभागाद्वारे केले जाते.

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये कलात्मक क्षमता, नेतृत्वगुण, सामाजिक जाणीव व सांस्कृतिक मूल्ये विकसित व्हावीत, या उद्देशाने सांस्कृतिक विभागामार्फत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. पुढीलप्रमाणे वर्षभर घेतलेल्या कार्यक्रमांचा संक्षिप्त आढावा खाली दिला आहे :

**१. इंडक्शन प्रोग्राम (स्वागत समारंभ)**

नवीन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे महाविद्यालयात स्वागत करण्यासाठी जुलै महिन्यात इंडक्शन प्रोग्रामचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात प्राचार्य डॉ. आर.जी. मुनघाटे सर, विविध विभाग प्रमुख व प्राध्यपकांनी उपस्थित विद्यार्थ्यांना महाविद्यालयातील शैक्षणिक, सहशैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रमांची माहिती दिली. विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढवण्यासाठी प्रेरणादायी भाषणे, सांस्कृतिक कार्यक्रम व संवाद सत्र घेण्यात आले.

**२. शिक्षक दिन (५ सप्टेंबर)**

भारतरत्न डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त शिक्षक दिन साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांनी स्वतः शिक्षक म्हणून वर्ग घेतले आणि प्राध्यापकांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. प्राचार्य, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचा सत्कार करण्यात आला.

**३. गायन स्पर्धा (ऑक्टोबर २०२४)**

विद्यार्थ्यांमधील संगीत प्रतिभेला प्रोत्साहन देण्यासाठी खुल्या गायन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाची सुरुवात आमच्या महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजाभाऊ मुनघाटे सर यांच्या गीताने झाली.

यामध्ये एकूण २५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. देशभक्तीपर, शास्त्रीय, सुगम संगीत या प्रकारांतील गीते सादर करण्यात आली. सर्वोत्कृष्ट गायक आणि गायिका यांना प्रमाणपत्र व पारितोषिक देण्यात आले.

**४. नृत्य स्पर्धा (नोव्हेंबर २०२४)**

विद्यार्थ्यांच्या नृत्य कौशल्याला वाव मिळावा यासाठी नृत्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. सामूहिक व एकल नृत्य प्रकारात विद्यार्थ्यांनी विविध लोकनृत्य, कथ्थक, बॉलीवुड शैलीचे नृत्य सादर केले. उत्कृष्ट सादरीकरणासाठी विशेष पारितोषिके देण्यात आली. कार्यक्रमास विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

**५. वार्षिक स्नेहसंमेलन (फेब्रुवारी २०२५)**

महाविद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन फेब्रुवारी महिन्यात मोठ्या उत्साहात पार पडले. या कार्यक्रमात गायन,



विद्यार्थ्यांनो, कोणतीही कला मानवी जीवन समृद्ध करते

परशुराम खुणे प्रतिपादन : सांस्कृतिक महोत्सव साजरा

यांचा झाला सत्कार..

३३२

राकेश उईके 'बेस्ट स्टुडंट'

वादन, नृत्य, फॅशन शो, नाट्य सादरीकरण यांचा समावेश होता. वार्षिक स्नेहसंमेलनाला उद्घाटक म्हणून प्रा. पुनीत मातकर सर उपस्थित होते. तर बक्षीस वितरण समारंभ पद्मश्री डॉ. परशुराम खुणे सर यांच्या उपस्थितीत पार पडला. विद्यार्थ्यांच्या विविध सांस्कृतिक कौशल्यांचे कौतुक करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन, सजावट, व्यवस्थापन सर्व काही विद्यार्थ्यांनीच केले.

६. **निरोप समारंभ (मार्च २०२५)**

अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांना निरोप देण्यासाठी निरोप समारंभाचे आयोजन करण्यात आले. ज्येष्ठ विद्यार्थ्यांनी आपल्या आठवणी सांगितल्या, तसेच कनिष्ठ विद्यार्थ्यांनी नृत्य, गीते व भाषणांद्वारे त्यांचे मनःपूर्वक स्वागत व निरोप केला. या प्रसंगी प्राध्यापकांनी शुभेच्छा दिल्या व विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी आशीर्वाद दिले.

**महत्त्वाचे उपक्रम व साजरे केलेले दिवस :**

१. **२६ जून २०२४ –** सामाजिक न्याय दिन
राजश्री छत्रपती शाहू महाराज जयंती साजरी करण्यात आली. यावेळी सामाजिक न्याय व संविधान मूल्यांवर आधारित सामूहिक वाचन व व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले.

२. **२५ ऑगस्ट २०२४ –** नवीन विद्यार्थी स्वागत समारंभ (फ्रेशर्स पार्टी)
प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांचे मनपूर्वक स्वागत करण्यात आले. विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले.

३. **५ सप्टेंबर २०२४ –** शिक्षक दिन म्हणून डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांची जयंती साजरी केली. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी सर्व वर्गांवर विविध विषयांचे अध्यापन केले व संपूर्ण महाविद्यालय प्रशासनातील विविध जबाबदारी पार पाडत स्वयंशासन राबविले. सर्व वर्गांनी विविध उपक्रमांद्वारे आपल्या शिक्षकांचा गौरव केला. विद्यार्थ्यांनी नृत्य, भाषण, कविता सादरीकरण केले.

४. **२९ सप्टेंबर २०२४ –** सामूहिक नृत्य स्पर्धा
विविध लोकनृत्य प्रकार सादर करण्यात आले. विद्यार्थ्यांनी आनंदाने सहभाग घेतला.

५. **२ ऑक्टोबर २०२४ –** महात्मा गांधी जयंती
स्वच्छता मोहिम, निबंध स्पर्धा व गांधी विचारांवर आधारित कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

६. **६ डिसेंबर २०२४ –** महापरिनिर्वाण दिन (डॉ. आंबेडकर)
यानिमित्ताने विविध व्याख्याने, निबंध स्पर्धा आणि विचारमंथन सत्रांचे आयोजन झाले.

७. **२१ डिसेंबर २०२४ –** संवाद उपक्रम
विद्यार्थ्यांमधील संवाद कौशल्य वाढवण्यासाठी चर्चासत्र व कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले.

८. **३ जानेवारी २०२५ –** क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती
स्त्री शिक्षण, महिला सबलीकरण व सामाजिक परिवर्तनावर केंद्रित कार्यक्रम घेण्यात आले.

९. **१२ जानेवारी २०२५ –** युवा दिन (स्वामी विवेकानंद जयंती) युवांना प्रेरणा देणारे व्याख्यान व समूहगीताचे आयोजन झाले.

१०. **१९ फेब्रुवारी २०२५ –** छत्रपती शिवाजी महाराज जयंती शिवचरित्रावर आधारित निबंध, वक्तृत्व व शौर्यगान सादरीकरण झाले.

११. **११ एप्रिल २०२५ –** महात्मा फुले जयंती

१२. **१४ एप्रिल २०२५ –** डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती

**इतर उपक्रम व सहभाग :**

- विविध ऑनलाईन व ऑफलाइन उपक्रम, कार्यशाळा व स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग.
- लोककलांचे जतन व सादरीकरण हे विशेष वैशिष्ट्य ठरले.
- सांस्कृतिक विभागाने एकात्मिक नियोजनाद्वारे सर्व कार्यक्रम पार पाडले.

सांस्कृतिक विभागाने विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता, नेतृत्वगुण, राष्ट्रीय मूल्यांची जाणीव आणि कलात्मक अभिव्यक्ती या सर्व अंगांचे पोषण करण्याचे कार्य अत्यंत यशस्वीरित्या केले आहे. विभागातील सर्व शिक्षक, समन्वयक व विद्यार्थ्यांचे योगदान अत्यंत उल्लेखनीय राहिले.

**डॉ. हेमराज मधुकर मेश्राम**
सांस्कृतिक विभागप्रमुख

# महात्मा गांधी अध्ययन केंद्र



**महात्मा** गांधीजींच्या विचाराचे पाईक असलेल्या संस्थाध्यक्ष स्वर्गीय गोविंदराव मुनघाटे साहेब यांच्या प्रेरणा आणि मार्गदर्शनाखाली महाविद्यालयात सत्र २०१०-११ पासून यु.जी.सी. पुरस्कृत महात्मा गांधी अध्ययन केंद्र कार्यरत आहे. सुरुवातीस तीन वर्ष युजीसीचे सहाय्याने व त्यानंतर स्वबळावर महात्मा गांधीजींच्या विचारधारेवर आधारीत विविध उपक्रमांच्या आयोजनाद्वारे गांधीजींच्या तत्त्वज्ञानाचा प्रचार-प्रसार महाविद्यालयीन विद्यार्थी आणि परिसरातील जनतेमध्ये करण्याचे कार्य या केंद्रामार्फत केल्या जात आहे.

महात्मा गांधीजींच्या 'खेड्याकडे चला' या संकल्पनेनूसार भारत सरकारच्या मानव संसाधन व विकास मंत्रालयामार्फत 'उन्नत भारत अभियान' अंतर्गत पांच दत्तक गावातील शेतकरी आणि युवकांना वेळोवेळी विविध प्रकारे प्रोत्साहन देण्याचे कार्य केल्या गेले.

दिनांक २ ऑक्टो. २०२४ ला राष्ट्रपिता महात्मा गांधीजींची जयंती साजरी करण्यात आली. हा दिवस आंतरराष्ट्रीय अहिंसा दिन म्हणून साजरा करण्यात आला. तसेच महाविद्यालयाच्या परीसरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

दिनांक १२ जाने. २०२५ ला दंडकारण्य शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष स्वर्गीय गोविंदराव मुनघाटे साहेबांच्या स्मृतिदिन प्रसंगी गांधीजींच्या विचारधारेनुसार सामाजिक उत्तरदायित्व म्हणून म्हणून रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. यामध्ये नियमित व माजी विद्यार्थी आणि कर्मचारी रक्तदात्यांनी रक्तदान केले. रक्तदात्यांच्या रक्तगटाची यादी तयार करण्यात आली. तसेच याप्रसंगी इतर विद्यार्थ्यांची रक्तगट व हिमोग्लोबीन तपासणी करण्यात आली. याप्रसंगी जिल्हा रुग्णालय गडचिरोलीचे रक्त संक्रमण अधिकारी डॉ. मुकुंद ढबाले, तंत्र सहाय्यक अजय ठाकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत उपजिल्हा सामान्य रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉक्टर जगदीश बोरकर यांनी विद्यार्थ्यांना रक्तदान का केले पाहिजे, रक्तदान कोणी करावे, रक्तदान कोणी करू नये आणि रक्तदानाबाबतचे समज गैरसमज यावर मार्गदर्शन केले.

दिनांक १९ ते २५ नोव्हेंबर या कालावधीतील राष्ट्रीय सांप्रदायिक सद्भावना सप्ताहा अंतर्गत कुरखेडा नगरात राष्ट्रीय एकात्मता व अखंडतेच्या संवर्धनासाठी सद्भावना संदेश व ध्वज निधी संकलन रॅली काढण्यात आली. महाविद्यालयापासून निघालेल्या ह्या रॅलीचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजाभाऊ मुनघाटे यांनी हिरवी झेंडी दाखवून तसेच ध्वज निधीच्या पेटीत मदतनिधी टाकून करण्यात आले. याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. अभय साळुंके व प्रा. पी.एस. खोपे उपस्थित होते. ह्या रॅलीला कुरखेडा येथील व्यावसायिक, दुकानदार, प्रतिष्ठीत नागरिक, कर्मचारी, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांनी आर्थिक सहकार्य केले. सर्वांच्या सहकार्यातून **एकूण ७८२२/- (सात हजार आठशे बावीस)** रुपयांचा निधी विद्यार्थ्यांनी गोळा केला. सदर निधी राष्ट्रीय सांप्रदायिक सद्भावना प्रतिष्ठान नवी दिल्ली यांचेकडे पाठविण्यात आला.

दिनांक ३० जाने. २०२५ ला **महात्मा गांधीजींचा स्मृतिदिन** तथा हुतात्मा दिनानिमित्त भारतीय शहिदांना मौन

श्रद्धांजली वाहण्यात आली. सकाळी दत्तकग्राम येरंडी येथे ग्रामस्वच्छता अभियान राबवून गावाची साफसफाई करण्यात आली. तसेच रासेयोच्या शिबिरामध्ये 'गांधीजी व युवक' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महात्मा गांधी अध्ययन केंद्राचे मुख्य संयोजक तथा इतिहास विभागप्रमुख प्रा. डॉ. दशरथ आदे आणि मुख्य मार्गदर्शक मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. नरेंद्र आरेकर यांनी विद्यार्थी व ग्रामस्थांना मार्गदर्शन केले. याशिवाय महाविद्यालयाच्या **मुव्ही क्लब** अंतर्गत इतिहास विभाग आणि गांधी अध्ययन केंद्र यांचे संयुक्त विद्यमाने महात्मा गांधीजींच्या जीवन चरित्र आणि भारतीय स्वातंत्र्य चळवळीवर आधारीत **चित्रफित** दाखविण्यात आली.

**गांधी विचार संस्कार परीक्षा डिसेंबर २०२४**

डिसेंबर २०२४ मध्ये **गांधी रिसर्च फॉऊंडेशन जळगांवद्वारा गांधी विचार संस्कार** परीक्षेचे आयोजन महाविद्यालयाच्या **महात्मा गांधी अध्ययन केंद्राद्वारे** करण्यात आले. महात्मा गांधीजीं लिखित हिंद स्वराज, राष्ट्रपिता बापू, मोहन ते महात्मा या त्यांच्या जीवनकार्यावरील पुस्तकावर आधारीत सदर परीक्षेकरीता २१९ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली, त्यापैकी २०४ विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष परीक्षा दिली. जाने. २०२४ मध्ये सदर परीक्षेचा निकाल जाहीर करण्यात आला. निकाल १०० टक्के लागला. महत्त्वाचे म्हणजे गडचिरोली जिल्हाभर घेण्यात आलेल्या या परीक्षेत महाविद्यालयाचे ०२ विद्यार्थी प्रथम क्रमांकाचे सुवर्ण पदक, ०१ विद्यार्थी द्वितीय क्रमांकाचे रौप्य पदक आणि ०१ विद्यार्थी तृतीय क्रमांकाचे कांस्य पदक असे एकूण ०४ विद्यार्थी **गडचिरोली जिल्हा** पुरस्काराचे मानकरी ठरले. महाविद्यालयाच्या वार्षिक बक्षिस वितरण समारंभात सदर पुरस्कारार्थींना जिल्हा पुरस्काराने गौरविण्यात आले.

वरील सर्व उपक्रम यशस्वीरीत्या पार पाडण्याकरिता महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजाभाऊ मुनघाटे यांचे कुशल मार्गदर्शनाखाली उपप्राचार्य प्रा. पी.एस. खोपे, उपप्राचार्य

**गांधी विचार संस्कार परीक्षा डिसेंबर. २०२४**
**गडचिरोली जिल्ह्यातून प्रथम, द्वितीय व तृतीय पुरस्कार प्राप्त विद्यार्थी.**

| अ.क्र. | विद्यार्थ्याचे नांव | पुरस्कार |
|---|---|---|
| १. | कु. खुशबु गोपाल नंदेश्वर | प्रथम क्रमांक - सुवर्ण पदक व प्रमाणपत्र |
| २. | कु. भावना नारायण नेवारे | प्रथम क्रमांक - सुवर्ण पदक व प्रमाणपत्र |
| ३. | कु. नुरअफसा आसिफ शेख | द्वितीय क्रमांक - रौप्य पदक व प्रमाणपत्र |
| ४. | कु. रेहान फिरोजखाँ पठाण | तृतीय क्रमांक - कांस्य पदक व प्रमाणपत्र |



## मुनघाटे महाविद्यालयात गांधी विचार व संस्कार परीक्षा

कुरखेडा : दंडकारण्य शैक्षणिक व सांस्कृतिक विकास संशोधन संस्था गडचिरोली द्वारा संचालित श्री. गोविंदराव मुनघाटे कला व विज्ञान महाविद्यालयात प्राचार्य डॉ. राजाभाऊ मुनघाटे यांच्या मार्गदर्शनात महाविद्यालयातील महात्मा गांधी अध्ययन केंद्राच्या वतीने राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या हिंद स्वराज्य, राष्ट्रपिता बापू, मोहन ते महात्मा या गांधीजींच्या जीवन कार्यावरील पुस्तकांवर आधारित गांधी रिसर्च फाउंडेशन जळगाव द्वारा आयोजित गांधी विचार व संस्कार परीक्षा नुकतीच झाली.

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या विचार आणि कार्याचा प्रचार आणि प्रसार व्हावा, गांधीजींचे विचार विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचावे, विद्यार्थ्यांना गांधीजींचे तत्वज्ञान [illegible] जीवनकार्याची माहिती व्हावी, त्या माध्यमातून गांधीजींचे विचार कार्य परिसरातील जनतेपर्यंत पोहोचावे याकरिता सदर परीक्षेचे आयोजन जळगाव येथील गांधी रिसर्च फाउंडेशन यांच्यावतीने दरवर्षीच करण्यात येत असते.

दंडकारण्य संस्था ही गांधीजींच्या विचाराची पाईक संस्था आहे. म्हणूनच यापूर्वीही चंद्रकांत वानखेडे यांचे 'गांधी का मरत नाही?' यावरील व्याख्यान तसेच सुप्रसिद्ध पत्रकार तथा विचारवंत सुरेश द्वादशीवार यांचे 'गांधी समजून घेताना', भुजंगराव बोबडे यांचे गांधीजी वरील व्याख्यान, चित्रपट, व्हिडिओ आणि राष्ट्रपिता महात्मा गांधीजी यांच्या जीवन कार्यावरील विविध कार्यक्रमांचे [illegible] महाविद्यालयात [illegible] होते.

प्रा. डॉ. अभय साळुंके, या केंद्राचे सहाय्यक प्रा. डॉ. नरेंद्र आरेकर व प्रा. गणेश सातपुते तसेच सर्व प्राध्यापक वर्ग, महाविद्यालयातील विद्यार्थी आणि शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद यांचे सक्रीय सहकार्य लाभले.

**प्रा. डॉ. दशरथ ध. आदे**
केंद्र संयोजक



# टोबॅको अवेअरनेस सेंटर

## मुनघाटे महाविद्यालयातर्फे तंबाखूमुक्तीवर जनजागृती

कुरखेडा, (ता.प्र). स्थानिक श्री गोविंदराव मुनघाटे कला व विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजाभाऊ मुनघाटे यांच्या मार्गदर्शनात महाविद्यालयाच्या टोबॅको कंट्रोल अवेअरनेस सेंटर व मुक्तीपथ, कुरखेडा यांच्या संयुक्त विद्यमाने अरततोंडी येथील यात्रेत तंबाखू, खर्रा मुक्तीवर विविध उपक्रमांद्वारे जनजागृती करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी केंद्रप्रमुख विवेक बुध्दे होते. तर प्रमुख अतिथी म्हणून देवानंद पाटील खुणे, नानाजी खुणे, हेमंत पाटील खुणे, रामदास परशुरामकर, खुशाल फुलबांधे, टोबॅको कंट्रोल अवेअरनेसचे समन्वयक डॉ. रवींद्र विखार, मुक्तीपथच्या शारदा मेश्राम, प्रा. नरेंद्र आरेकर, प्रा.




हेमलता उराडे उपस्थित होते. याप्रसंगी प्रा. डॉ. रवींद्र विखार यांनी तंबाखू, गुटखा, खर्रा इत्यादी व्यसनाची सवय माणसाला कशी लागते व या सवयीचा शारीरिक, मानसिक, आर्थिक, सामाजिक दुष्परिणामाला कसे सामोरे जावे लागते, हे विविध उदाहरणासहित पटवून दिले. यात्रेमध्ये ...

तंबाखू, गुटखा, खर्रा मुक्तीचे हँडबिल वाटप करण्यात आले. व्यसनाविषयी जनजागृती करण्यासाठी या यात्रेमध्ये रॅली सुद्धा काढण्यात आली. यात्रेकरूंना व्यसनांपासून दूर राहण्याचे आवाहन करण्यात आले. यापूर्वी या विभागाद्वारे व्यसन मुक्तीवर पथनाट्य, बाजारात हॅन्डबिल वाटप, व्यसन मुक्तीवर स्लाईड शो, तज्ञांची व्याख्याने इत्यादी घेण्यात आली. सर्व उपक्रमाची दखल महाराष्ट्र शासनाने घेतली असून, शासनाच्या राष्ट्रपिता महात्मा गांधी व्यसनमुक्ती पुरस्काराने महाविद्यालयाला सन्मानित करण्यात आले. ...

**महाविद्यालयात** मागील अनेक वर्षांपासून आदरणीय प्राचार्य डॉ. राजाभाऊ मुनघाटे साहेबांच्या मार्गदर्शनाखाली टोबॅको अवेअरनेस सेंटर सुरू आहे. या माध्यमातून आजपर्यंत मुखदंत रोग चिकित्सा शिबिर, यात्रा व बाजारातून तंबाखू विरोधी जनजागृतीसाठी व्याख्याने, भित्ती पत्रक वाटप, दरवर्षी १५ ऑगस्टला स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून तंबाखू विरोधी प्रतिज्ञा, सलाम बॉम्बे संस्थेच्या वतीने टोबॅको अवेअरनेसवर तज्ज्ञांची व्याख्याने, स्लाईड शो अशा विविध उपक्रमांचे आयोजन केल्या गेले आहे.

यावर्षी सुद्धा १५ ऑगस्ट २०२४ ला महाविद्यालयातील ध्वजारोहण आटोपल्यानंतर दंडकारण्य संस्थेचे अध्यक्ष तथा महाविद्यालयाचे आदरणीय प्राचार्य डॉ. राजाभाऊ मुनघाटे यांच्या प्रमुख उपस्थितीत महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना तंबाखू विरोधी प्रतिज्ञा देण्यात आली. महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष शिबीर उन्नत भारत अभियान अंतर्गत दत्तक ग्राम येरंडी येथे घेण्यात आला. या शिबिरांतर्गत गावात तंबाखू, गुटखा, खर्रा, दारू इत्यादी व्यसनांवर जनजागृती होण्याच्या दृष्टीने विविध पथनाट्यांचे आयोजन करण्यात आले. या पथनाट्यात तंबाखू, गुटखा, खर्रा, दारू, इत्यादी व्यसन लागण्याची कारणे, त्यांचे कुटुंबावर होणारे दुष्परिणाम व ते सोडविण्यासाठी उपाय योजना इत्यादींवर विद्यार्थ्यांनी उत्तम सादरीकरण करीत गावकरी मंडळींना या व्यसनाविषयी जनजागृती करण्यात आली. तसेच पहाटेला रामधून काढण्यात येऊन संत व समाजसुधारकांची व्यसनविरोधी रचलेली भजने, भारूडे, घोषवाक्य इत्यादी गाऊन गावामध्ये जनजागृती करण्यात आली.

महाविद्यालय व जिल्हा परिषद गडचिरोली यांच्या संयुक्त विद्यमाने शहरात तंबाखू विरोधी रॅली काढण्यात आली. तंबाखू मतलब खल्लास, वाईट व्यसनाच्या आहारी जाऊन जीवन संपवू नका, इत्यादींवर नारे देत जनजागृती करण्यात आली. सर्च संस्था गडचिरोली व महाविद्यालयाचे टोबॅको अवेअरनेस सेंटर यांच्या माध्यमातून कुरखेडा तालुक्यातील २४ गावांमध्ये तंबाखू, खरा, सर्वेक्षण करण्यात आले. महाशिवरात्रीचे औचित्य साधून कुरखेडा तालुक्यातील अरकतोंडी महादेवगड येथे दरवर्षी मोठ्या यात्रेचे आयोजन केल्या जाते. या यात्रेमध्ये गोंदिया, भंडारा, गडचिरोली, चंद्रपूर, नागपूर अशा पूर्व विदर्भातील वेगवेगळ्या ठिकाणाहून अनेक भाविक दर्शनाला येत असतात. या भाविकांमध्ये तंबाखू विरोधी जनजागृती होण्याच्या दृष्टीने यात्रेत रॅली काढून तसेच विविध भित्ती पत्रके लावून, व्याख्यान देऊन जनजागृती करण्यात आली.

अशा प्रकारे सदर केंद्राच्या माध्यमातून तंबाखू विरोधी जनजागृतीचे कार्य सातत्याने करण्यात येत आहे.

संयोजक
**प्रा. डॉ. रवींद्र विठोबा विखार**

# महिला अध्ययन केंद्र व लोकसंख्या शिक्षण

**आज** एकविसाव्या शतकातील मानवाने प्रगतीचे शिखर गाठले आहे. भारतीय संविधानाने पंचायतराज व्यवस्थेत महिलांना आरक्षणाचा लाभ मिळवून दिलेला असल्यामुळे स्त्रिया राजकारणात सक्रियतेने सहभाग घेऊन राजकारणातील सर्वोच्च स्थान प्राप्त करीत आहेत. त्याचबरोबर कुटुंबामध्ये निर्णय निर्धारण प्रक्रियेत सहभागी होत आहेत. ही महत्त्वाची उपलब्धी असली तरी अजूनही विविध स्तरांवर महिलांवरील अन्याय, अत्याचार आणि शोषणामध्ये वाढ होतच आहे.



मुनघाटे महाविद्यालय कुरखेडा

**कुरखेडा** : दंडकारण शैक्षणिक व सांस्कृतिक विकास संशोधन संस्था गडचिरोली द्वारा संचालित स्थानिक श्री गोविंदराव मुनघाटे कला व विज्ञान महाविद्यालयात प्राचार्य डॉ. राजाभाऊ मुनघाटे यांच्या मार्गदर्शनात महाविद्यालयाच्या महिला अध्ययन केंद्राच्या वतीने आंतरराष्ट्रीय महिला दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. राखी शंभरकर होत्या तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून पंचायत समितीच्या कनिष्ठ प्रशासकीय अधिकारी माया बाळराजे, प्रा .हेमलता उराडे, प्रा. रूपाली तोंडरे ,प्रा. बाळबुद्धे आदी मान्यवर उपस्थित होत्या.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व संचालन महिला दिन केंद्राच्या प्रमुख प्रा. तृप्ता वाकडे यांनी केले तर आभार कीर्ती पेंदराम यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी [illegible]

गोंडवाना विद्यापीठाच्या प्रौढ व निरंतर शिक्षण आणि विस्तार सेवा विभागांतर्गत प्रत्येक महाविद्यालयात महिला अध्ययन व लोकसंख्या शिक्षणविविध उपक्रम राबविले जातात. यामध्ये वर्तमानकालीन महिलांच्या समस्येविषयी, त्यांच्या सक्षमीकरणाविषयी, कौशल्य विकासाच्या दृष्टिकोनातून, आरोग्यविषयक आणि एकविसाव्या शतकातील आव्हाने व उपायांसंदर्भात मार्गदर्शन करण्याकरिता वेगवेगळ्या क्षेत्रातील नामवंत तज्ज्ञ मंडळींना आमंत्रित करून विद्यार्थिनींना त्यांच्या अनुभवाचा लाभ मिळवून देण्यात येतो.

महाविद्यालयाच्या महिला अध्ययन केंद्राच्यावतीने सातत्याने विद्यार्थ्यांचा विविध क्षेत्रात विकास घडवून आणण्याच्या दृष्टीने व त्यांना सक्षम जीवन जगता यावे यासाठी विविध उपक्रम आयोजित करीत असतो. या केंद्राच्यावतीने विद्यार्थ्यांना स्वच्छता, आरोग्य तसेच अधिकार व सन्मानांची शिकवण देण्याचे कार्य पार पाडीत असते.

**उद्दिष्टे**

- स्त्रियांना देशाच्या विकासात त्यांच्या दर्जा व भूमिकेची जाणीव करून देणे.
- स्त्रियांना त्यांच्या अधिकाराबाबत कायद्यातील तरतुदीची जाणीव करून देणे.
- समाज विकासात स्त्रीयांच्या भूमिका व योगदानाचे अध्ययन करणे.
- स्त्रियांच्या विविध क्षेत्रात होणारे सर्व प्रकारच्या शोषणाविरुद्ध उपाययोजना सुचविणे.
- स्त्रियांना समान दर्जा देणाऱ्या विविध सिद्धांताची चर्चा करणे.

वरील उद्दिष्टे साध्य करण्याच्या उद्देशाने महाविद्यालयाच्या महिला अध्ययन केंद्राद्वारे विविध कार्यक्रमाचे आयोजन करून विद्यार्थीनींचे उद्‌बोधन केले जाते. यासाठी प्रत्येक वर्षी कार्यक्रमाच्या आयोजनाचे प्राचार्यांच्या सहकार्याने वेळापत्रक जाहीर केले जाते.

**वेळापत्रक**

| अ.क्र. | कार्यक्रम | दिनांक |
|---|---|---|
| १. | लोकसंख्या दिन | ११ जुलै २०२४ |
| २. | महिला लोकशाही दिन | १० डिसेंबर २०२४ |
| ३. | सावित्रीबाई फुले जयंती | ३ जानेवारी २०२५ |
| ४. | महिला दिन | ८ मार्च २०२५ |

**१. लोकसंख्या दिन साजरा करणे**

११ जुलै २०२४ रोजी आंतरराष्ट्रीय लोकसंख्या दिनानिमित्त महाविद्यालयात लोकसंख्या दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे ज्येष्ठ प्रा. डॉ. दशरथ आदे होते व मार्गदर्शक म्हणून समाजशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. रवींद्र विखार उपस्थित होते. नैसर्गिक साधनसंपत्ती व पर्याप्त भौतिक सुविधा अतिरिक्त लोकसंख्येमुळे उपलब्ध होऊ शकत नाही.

त्यामुळे नियंत्रित लोकसंख्या हीच समतोल साधू शकते असे विचार डॉ. आदे यांनी मांडले. प्रा. डॉ. रवींद्र विखार यांनी भारताची लोकसंख्या ही चिंतेची बाब असून सर्व सामाजिक समस्यांचे मूळ हे लोकसंख्या वाढिचे परिणाम असल्याचे प्रतिपादन त्यांनी या प्रसंगी केले. कार्यक्रमाचे संचालन व आभार डॉ. गणेश सातपुते यांनी केले.

## जागतिक लोकसंख्यादिन




**कुरखेडा :** स्थानिक श्री गोविंदराव मुनघाटे कला व विज्ञान महाविद्यालयात प्राचार्य डॉ. राजाभाऊ मुनघाटे यांच्या मार्गदर्शनात जागतिक लोकसंख्या दिवस महाविद्यालयाच्या लोकसंख्या विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे ज्येष्ठ प्राध्यापक डॉ. दशरथ आदे तर प्रमुख अतिथी म्हणून डॉ. रवींद्र विखार उपस्थित होते. यावेळी डॉ. दशरथ आदे यांनी वाढती लोकसंख्या ही भौतिक सुविधांचा अभाव आहे. नैसर्गिक साधनसंपत्ती व पर्यास भौतिक सुविधा उपलब्ध होऊ शकत नाही. त्यामुळे नियंत्रित लोकसंख्या हीच बैलेन्स करु शकते, असे विचार मांडले. प्रा डॉ. रवींद्र विखार यांनी जागतिक लोकसंख्या ही अतिशय चिंतेची बाब असून ती भारताची लोकसंख्या ही अतिरिक्त लोकसंख्या आहे. सर्व सामाजिक समस्यांचे मूळ ही लोकसंख्या वाढ असल्याचे प्रतिपादन करीत हे नियंत्रित करण्यासाठी समाजात लोकसंख्या शिक्षणविषयी जनजागृती करण्याचे आवाहन याप्रसंगी केले. संचालन व [illegible] डॉ. गणेश सातपुते यांनी मानले. कार्यक्रमाच्या [illegible] संजय महाजन, डॉ. गुणवंत वडपल्ली[illegible] आदींनी सहकार्य केले.

### २. महिला लोकशाही दिन

१० सप्टेंबर रोजी कुरखेडा शहरात आणि परिसरात महिला लोकशाही दिन साजरा करण्यात आला. या रॅलीचे उद्घाटन महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. पी.एस. खोपे यांनी केले. सुमारे २०० विद्यार्थ्यांना उत्साहाने सहभागी करून घेण्यात आले. सर्व प्राध्यापकांनीही पुढाकार घेऊन रॅलीमध्ये सहभाग घेतला आहे.

### ३. ३ जानेवारी – सावित्रीबाई फुले जयंती आणि वाचन दिन उत्सव

सावित्रीबाई फुले या एक प्रख्यात समाजसुधारक, शिक्षणतज्ज्ञ आणि कवयित्री होत्या. त्यांचा जन्म ३ जानेवारी १८३१ रोजी महाराष्ट्रातील नायगाव येथे झाला. सावित्रीबाई फुले यांना भारतातील महिला शिक्षणाच्या प्रणेत्यांपैकी एक मानले जाते. लिंगविषमतेच्या कठीण काळात त्यांनी सामाजिक समानता आणि महिला हक्कांसाठी उल्लेखनीय कार्य केले. सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी आणि त्यांच्या समाजसुधारणेतील योगदानाबद्दल जनजागृती करण्यासाठी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. हा कार्यक्रम महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागाच्या सहयोगाने आयोजित करण्यात आला होता, संचालन डॉ. अनिल भोयर यांनी केले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर.जी. मुनघाटे यांनी भूषविले, तर उपप्राचार्य डॉ. अभय सोळुंखे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाला मराठी विभागाच्या प्रा. हेमलता उराडे ह्या प्रमुख वक्त्या म्हणून उपस्थित होत्या.

कार्यक्रमात मार्गदर्शकांनी सावित्रीबाई फुले यांचे कार्य, महिलांच्या भूतकाळातील आणि वर्तमान स्थितीतील बदल, तसेच महिलांच्या जीवनाची गुणवत्ता सुधारण्यासाठी सावित्रीबाईंनी घेतलेल्या पुढाकारांवर विद्यार्थ्यांशी संवाद साधला. याच कार्यक्रमाप्रसंगी वाचनदिन उत्सव साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांना वाचनाचे महत्त्व समजावून सांगण्यात आले आणि त्यांना नियमितपणे वाचनाची सवय लावण्यासाठी प्रेरित करण्यात आले. हा दिवस केवळ सावित्रीबाई फुले यांचे स्मरण करण्यापुरता मर्यादित राहत नाही, तर महिलांच्या सक्षमीकरणासाठी सुरू असलेल्या संघर्षाची आणि शिक्षणाच्या मूल्यमहत्त्वाची आठवण करून देतो. त्यांच्या कार्यावर चिंतन करण्याचा आणि त्यांनी सुरू केलेली सामाजिक क्रांती पुढे नेण्याची प्रेरणा देणारा हा महत्त्वाचा दिवस ठरतो.

### ४. महिला दिन साजरा करणे

महिला दिन हा दरवर्षी ८ मार्च रोजी साजरा केला जाणारा जागतिक उत्सव आहे. हा दिवस विविध क्षेत्रातील महिलांच्या कामगिरी आणि योगदानाचा सन्मान करण्यासाठी आणि त्यांचे कौतुक करण्यासाठी आणि लिंग समानतेसाठी सुरू असलेल्या संघर्षाची ओळख पटविण्यासाठी समर्पित आहे. महिला दिन महिलांच्या हक्कांबद्दल जागरूकता निर्माण

करण्यासाठी, लिंग समानतेला प्रोत्साहन देण्यासाठी आणि जगभरातील महिलांच्या सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि राजकीय कामगिरीवर प्रकाश टाकण्यासाठी एक व्यासपीठ म्हणून काम करतो.

महाविद्यालयात महिला दिनही साजरा करण्यात आला आणि या प्रसंगी महाविद्यालयाच्या वनस्पतीशास्त्र विभागाच्या डॉ. राखी शंभरकर मॅडम कार्यक्रमाच्या अध्यक्षा होत्या, मराठी विभागाच्या प्रा. उराडे मॅडम कार्यक्रमाचे पाहुणे होते तर आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त माया बाळराजे कनिष्ठ प्रशासकीय अधिकारी, पंचायत समिती, कुरखेडा ह्या प्रमुख मार्गदर्शक होत्या.

या कार्यक्रमात मोठ्या संख्येने महिला विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्ज्वलन करून आणि सर्व मान्यवरांचे स्वागत करून करण्यात आले. महिला दिन साजरा करण्याचे महत्त्व आणि या उत्सवामागील इतिहास महिला दिनाचे साक्षीदार विभागाचे सहाय्यक प्राध्यापक शंभरकर यांनी विद्यार्थ्यांसमोर मांडला. या प्रसंगी मुलींना त्यांनी तोंड दिलेल्या विविध परिस्थितींचे जिवंत उदाहरण देण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात आले. हे लक्षात ठेवणे महत्त्वाचे आहे की महिला दिन हा केवळ एक दिवसाचा कार्यक्रम नाही. तो वर्षभर लिंग समानता आणि महिला सक्षमीकरणासाठी काम करत राहण्याची आठवण करून देतो.

**५. 'सॅनिटरी नॅपकिन्सचा योग्य वापर आणि विल्हेवाट' या विषयावर जागरूकता कार्यक्रम.**

महाविद्यालयाच्या महिला अभ्यास केंद्राने महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी सॅनिटरी नॅपकिन्सचा योग्य वापर आणि विल्हेवाट या विषयावर जागरूकता कार्यक्रम आयोजित केला. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना रियलाइज प्रायव्हेट लिमिटेड कंपनीच्या प्रतिनिधी श्रीमती उमा यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहाय्यक प्रा. तृप्ता वाकडे यांनी केले. याप्रसंगी, मुलींना बाजारात उपलब्ध असलेल्या विविध ब्रँडच्या सॅनिटरी नॅपकिन्सचे जिवंत उदाहरण देण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात आले.

**६. मतदान जनजागृती**

महिला सशक्तीकरण आणि लोकशाही प्रक्रियेत महिलांचा सक्रीय सहभाग वाढविण्यासाठी महिला अध्ययन केंद्र आणि अंगणवाडी केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने मतदान जनजागृती मोहीम राबविण्यात आली.

या मोहिमेचा उद्देश महिलांमध्ये मतदानाबाबत जागरूकता निर्माण करणे, त्यांचा लोकशाही प्रक्रियेतील सहभाग वाढवणे, तसेच प्रत्येक मताचे महत्त्व समजावून देणे हा होता. मोहीमेद्वारे महिलांना खालील गोष्टींबाबत मार्गदर्शन करण्यात आले :

- मतदानाचे संविधानिक महत्त्व
- स्वतःचे मताधिकाराचे मूल्य
- योग्य उमेदवाराची निवड करताना विचार करावयाचे मुद्दे
- मतदान प्रक्रियेतील पारदर्शकता आणि गोपनीयता

या मोहिमेंतर्गत पथनाट्य सादरीकरण करण्यात आले. महिलांनी उत्स्फूर्तपणे सहभागी होत मतदान हक्काबाबत आपली भूमिका समजून घेतली.

या उपक्रमामध्ये अंगणवाडी सेविका, आणि महाविद्यालयातील विद्यार्थी यांचा उत्स्फूर्त सहभाग होता. मुलांनी आणि महिलांनी आपले अनुभव कथन करत मतदानासंदर्भातील आपली जागरूकता वाढविली. ही मोहीम महिलांमध्ये फक्त मतदानाविषयी जागरूकता निर्माण करणारीच नव्हे तर लोकशाही प्रक्रियेच्या बळकटीसाठी एक प्रभावी पाऊल ठरले.

**प्रा. तृप्ता डी. वाकडे**
**प्रा.डॉ. गणेश सातपुते**
समन्वयक



# मानव्यशास्त्र विभाग



'Any academic research should be such that it benefits the society'

Dr Rajabhau Munghate addressing students as other dignitaries look on.

■ District Correspondent
GADCHIROLI, Sept 30

'ANY research should be done wholeheartedly. Our research needs to be useful to the society as well. The quality of research that is done from the heart is always better and it can open many doors for the others. Hence, it is necessary to think carefully while doing any research," said Dr Rajabhau Munghate, Principal of Shri Govindrao Munghate College of Arts and Sciences, Kurkheda.

He was addressing PhD scholars of the research centre of the college.

Munghate further said, "Our research should not stay limited to libraries but should be useful for the development and betterment of the society".

Dr Vijay Bevatkar, Head of Marathi Department of Mahatma Gandhi College, Armori, was the subject expert. Gajendra Kadav of Department of Sociology, Vice-Princ... Khope, Head of ... Dr Ravi...

Narendra Arekar were prominently present.

Dr Munghate extended best wishes to all the researchers who have registered for the PhD degree, wishing them bright future.

It may be mentioned here that total 16 students have registered at the research centre of the college for the degree of PhD in Marathi and Sociology.

The half-yearly report was presented to the subject expert Dr Bevatkar and Dr Khadhan. They also answered the questions of researchers.

Also on the occasion, Dr Dinesh Kumar Ambade and Ashish Yellewar, who received State Teacher Awards, Jitendra Saha who cleared the examination of Extension Officer, and Santosh Chalakh, who cleared the NET, were felicitated at the hands of Dr Rajabhau Munghate. Narendra Arekar conducted the prog... Dr Ravindra ...

**महाविद्यालयातील** मानवशास्त्र विभागाद्वारे या शैक्षणिक सत्रामध्ये विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आलेले होते.

### अर्थशास्त्र विभाग

दिनांक १४ सप्टेंबर २०२४ ला महाविद्यालयाच्या अर्थशास्त्र विभाग व सेबी संस्था मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने वित्तीय साक्षरता कार्यशाळा घेण्यात आली. याप्रसंगी वित्तीय साक्षरते बाबत विद्यार्थ्यांना धडे देण्यात आले. भारतीय प्रतिभूती व विनिमय मंडळ मुंबई (सेबी) हे कार्यालय भारतामध्ये वित्तीय साक्षरता आयोजित करीत असते. या कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य पी.एस. खोपे हे होते तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून सेबी संस्था मुंबईचे एडवोकेट माननीय राजेश पालीवाल कार्यक्रमाचे समन्वयक डॉ. संजय महाजन उपस्थित होते. कुरखेडा सारख्या ठिकाणी असणाऱ्या महाविद्यालयात सेबी मुंबई द्वारे वित्तीय साक्षरता कार्यशाळा आयोजित केल्याबद्दल सेबी संस्थेचे आभार मानीत प्रत्येकाने या आर्थिक प्रशिक्षण कार्यशाळेचा लाभ घ्यावा व आर्थिक गुंतवणूक कुठे आणि का करावी यासंदर्भात मार्गदर्शकांनी केलेल्या मार्गदर्शनाचा फायदा आपल्या दैनंदिन व्यवहारात गुंतवणूक करताना करण्याचे आवाहन याप्रसंगी केले. प्रमुख मार्गदर्शक सेबी संस्था मुंबईचे एडवोकेट मा. राजेश पालीवाल यांनी सेबी संस्थेचे कार्य विशद करीत शिका, कमवा व गुंतवणूक करा या त्रिसूत्रीचा वापर कधी, केव्हा व कुठे करावा यावर विस्तृत विवेचन केले. पैशाची गरज कशासाठी, पैसे कशासाठी कमवायचे, महागाईचा दर, पैसे कसे कमवायचे, धंद्यावर लक्ष कसे केंद्रित करायचे, शेअर मार्केट, पैशाची गुंतवणूक, पैशाची सुरक्षितता, लाभांश म्हणजे काय, तो केव्हा दिला जातो, आपली फसवणूक कशा पद्धतीने होते. यावरही विस्तृत मार्गदर्शन करीत खोट्या व अल्प कालावधीत श्रीमंत बनण्याची स्वप्न न बघता योग्य त्याच ठिकाणी गुंतवणूक करून आर्थिक फसवणूक टाळण्याचे व आपली पुंजी सुरक्षित ठेवण्याचे आवाहन करीत सायबर क्राईम यावरही मार्गदर्शन केले. याप्रसंगी त्यांनी आर्थिक गुंतवणुकीच्या संदर्भातील व्हिडिओ क्लिप विद्यार्थ्यांना दाखविली.



आर्थिक गुंतवणूक का आणि कुठे करावी? कुरखेडात विद्यार्थ्यांना धडे

मार्गदर्शन : गोविंदराव मुनघाटे महाविद्यालयात कार्यक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

कुरखेडा : येथील श्री गोविंदराव मुनघाटे कला व विज्ञान महाविद्यालयाचा अर्थशास्त्र विभाग व सेबी संस्था मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने वित्तीय साक्षरता कार्यशाळा गुरुवारी पार पडली. याप्रसंगी वित्तीय साक्षरतेबाबत धडे देण्यात आले. विशेषत: आर्थिक गुंतवणूक करण्याबाबत धडे दिले.

अध्यक्षस्थानी उपप्राचार्य पी. एस. खोपे होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून सेबी संस्था मुंबईचे ॲड. राजेश पालीवाल, कार्यक्रमाचे समन्वयक डॉ. संजय महाजन उपस्थित होते. आर्थिक गुंतवणूक कुठे आणि का करावी यासंदर्भात मार्गदर्शकांनी दिलेल्या मार्गदर्शनाचा फायदा आपल्या दैनंदिन व्यवहारात गुंतवणूक करताना करण्याचे आवाहन याप्रसंगी मान्यवरांनी केले. याप्रसंगी आर्थिक गुंतवणुकीच्या संदर्भातील चित्रफित विद्यार्थ्यांना दाखविली. सदर कार्यक्रम प्राचार्य डॉ. राजाभाऊ मुनघाटे यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला. मानले ... कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन ... समन्वयक डॉ. संजय ... केले, तर आभार ...

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ॲड. राजेश पालीवाल.

गुंतवणूक करताना राहा सावध

▪ ॲड. राजेश पालीवाल यांनी सेबी संस्थेचे कार्य विशद करीत शिका, कमवा व गुंतवणूक करा या त्रिसूत्रीचा वापर कधी, केव्हा व कुठे करावा यावर विस्तृत विवेचन केले. पैशाची गरज कशासाठी, पैसे कशासाठी कमवायचे, महागाईचा दर, पैसे कसे कमवायचे, धंद्यावर लक्ष कसे केंद्रित करायचे, शेअर मार्केट, पैशाची गुंतवणूक, पैशाची सुरक्षितता, लाभांश म्हणजे काय, तो केव्हा दिला जातो, आपली फसवणूक कशा पद्धतीने होते, यावरही विस्तृत मार्गदर्शन करीत योग्य त्याच ठिकाणी गुंतवणूक करून आर्थिक फसवणूक टाळावी, असे आवाहन केले.

### राज्यशास्त्र विभाग

२९ फेब्रुवारी २०२४ ला राज्यशास्त्र विभागाद्वारे महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या विशेष शिबिरात भारतीय संविधान व इतर देशातील संविधान यावर उपप्राचार्य पी.एस. खोपे यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी शहर विचार मंचचे संयोजक माधवशेठ निरंकारी हे होते. तर प्रमुख वक्ते प्रा.डॉ. अमोल

शेंडे यांनी याप्रसंगी भारतीय संविधान, संविधान सभेची निर्मिती, मसुदा समिती, भारतीय राज्यघटना व इतर राज्यघटनेतील फरक, भारतीय राज्यघटनेचे वैशिष्ट्ये, संविधान दिन, इत्यादींवर विस्तृत मार्गदर्शन केले.




**इतिहास विभाग**

महाविद्यालयाच्या इतिहास विभागाद्वारे महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना शिबिर मोजा येरंडी येथे ३० जानेवारीला राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची पुण्यतिथी हुतात्मा दिन म्हणून साजरी करण्यात आली. सर्वप्रथम ग्रामसफाई करण्यात आली व सायंकाळी बौद्धिक क्षेत्रामध्ये 'गांधी का मरत नाही' यावर प्रोफेसर डॉक्टर नरेंद्र आरेकर यांनी मार्गदर्शन केले गांधीजींचे तत्त्व आजही समाजाला कसे उपयुक्त आहेत जगाला ते कसे दीपस्तंभ आहेत हे विविध उदाहरणे देत पटवून दिले गांधीजी हे मजबूत मजबुरी नाही तर मजबुतीचे नाव आहे असेही ते म्हणाले. याप्रसंगी डॉ. दशरथ आदे यांनी मार्गदर्शन केले. २६ जानेवारीला ग्रंथालय विभाग व महाविद्यालयाच्या इतिहास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने प्रजासत्ताक दिनी प्रश्नमंजुषा स्पर्धा घेण्यात आली. दिनांक ६ मार्च २०२५ ला पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या जयंतीनिमित्त महाराष्ट्र शासनाचा सांस्कृतिक विभाग व महाविद्यालयाचा इतिहास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने अहिल्याबाई होळकर यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकणाऱ्या विविध सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आले यात पोवाडा, लावणी, भारुड असे विविध कार्यक्रम पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांवर आधारित घेण्यात आले. डॉ. दशरथ आदे यांची सन २०२५-२६ या शैक्षणिक सत्रातील विदर्भ इतिहास परिषदेच्या ५८व्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली.

**समाजशास्त्र विभाग**

दिनांक२५ सप्टेंबर २०२४ ला महाविद्यालयाच्या समाजशास्त्र विभागाद्वारे 'आदिवासींचे समाजशास्त्र' याविषयी महात्मा गांधी महाविद्यालय आरमोरी येथील समाजशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. गजेंद्र कढव यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला समाजशास्त्र विभागप्रमुख प्रा.डॉ. रवींद्र विखार उपस्थित होते. प्रा. डॉ. गजेंद्र कढव यांनी भारतातील आदिवासी समाज, विविध राज्यात असणारे आदिवासी व त्यांची नावे, आदिवासीचे क्षेत्रफळ, विभागणी, आदिवासी कोणाला म्हणतात, त्यांची सण-समारंभ, विवाह पद्धती, संस्कृती, आदिवासींची जादू करण्याची पद्धती, विवाहाचे प्रकार, कुटुंब प्रकार, आदिवासींची अर्थव्यवस्था, त्यांची शेती करण्याची पद्धती, इत्यादींवर विस्तृत मार्गदर्शन केले. तसेच प्रा. डॉ. रवींद्र विखार यांनी आदिवासींच्या समस्या, आदिवासीच्या समस्या व त्यावर उपाययोजना, शासनाच्या आदिवासींसाठी असणाऱ्या तरतुदी इत्यांदींवर त्यांनी विस्तृत मार्गदर्शन केले.

**प्रा. पी. एस. खोपे**
समन्वयक

• • •



# राष्ट्रीय संप्रदायिक सद्‌भावना विभाग



## मुनघाटे महाविद्यालयात सांप्रदायिक सद्भावना रॅली

### राष्ट्रीय एकात्मता व अखंडतेच्या संवर्धनासाठी दिला सद्भावना संदेश

**राष्ट्रीय एकात्मतेच्या कार्यात महाविद्यालयाचा खारीचा वाटा**

**राष्ट्रीय** संप्रदायिक सद्‌भावना भारत सरकारच्या गृहमंत्रालयाद्वारे १९ फेब्रुवारी १९९२ ला सुरू करण्यात आली होती. त्याचा मुख्य उद्देश राष्ट्रीय एकात्मता वाढीसोबतच सांप्रदायिक जातीय, वांशिक, आतंकवादी यात बळी पडलेल्या मुलांचे संरक्षण व संवर्धन, शिक्षण प्रशिक्षणावर भर देऊन त्यांनाही देशाचा उत्तम नागरिक बनविणे आहे. मुनघाटे महाविद्यालयात मागील अनेक वर्षापासून १९ ते २५ नोव्हेंबर या कालावधीत हा राष्ट्रीय संप्रदायिक सद्‌भावना सप्ताह उत्साहात साजरा केला जातो.

या उपक्रमांतर्गत श्री गोविंदराव मुनघाटे कला व विज्ञान महाविद्यालयात सांप्रदायिक सद्‌भावना व झेंडा निधीचे संकलन प्राचार्य डॉ. राजाभाऊ मुनघाटे यांच्या प्रमुख उपस्थित महाविद्यालयातील सांप्रदायिक सद्‌भावना विभागाच्या वतीने करण्यात आले. यावेळी राष्ट्रीय एकात्मता व अखंडतेच्या संवर्धनासाठी सद्‌भावना संदेश देत कुरखेडा येथे रॅली काढण्यात आली. या रॅली च्या माध्यमातून दरवर्षी निधी गोळा करून तो भारत सरकारच्या राष्ट्रीय सांप्रदायिक सद्‌भावना प्रतिष्ठान, नवी दिल्ली येथे पाठविला जातो. यावर्षी सुद्धा निघालेल्या रॅलीला कुरखेडा येथील लहान मोठे व्यावसायिक, दुकानदार, प्रतिष्ठित नागरिक, विविध कर्मचारी, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी सढळ हाताने आर्थिक मदत केली. व ७८२२ रुपयाचा निधी गोळा करण्यात आला. देशाच्या राष्ट्रीय एकात्मतेच्या कार्यात महाविद्यालय नेहमीच खारीचा वाटा उचलत आहे. महाविद्यालयाने यापूर्वीही ग्रामीण भागातील अंधांसाठी शिक्षण प्रशिक्षण नोकरी व पुनर्वसन कार्य करणाऱ्या 'इंडियन असोसिएशन फॉर द ब्लाइंड', 'आयएबी' या संस्थेला निधी पाठविलेला असून सामाजिक बांधिलकी जोपासत आत्महत्याग्रस्त कुटुंबीयांना मदत देण्याच्या दृष्टीने 'नाम' संस्थेला तसेच महापुरामुळे क्षतिग्रस्त झालेल्या गडचिरोली जिल्ह्यातील भामरागड, कोल्हापूर येथील गरजूंना सुद्धा मदतीचा हात दिलेला आहे.




सदर रॅलीचे उद्‌घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजाभाऊ मुनघाटे, उपप्राचार्य पी.एस. खोपे, यांनी ध्वज निधीच्या पेटीत निधी टाकून केले. या उपक्रमाच्या यशस्वीतेकरिता राष्ट्रीय संप्रदायिक विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. संजय महाजन, सहाय्यक प्रा.डॉ. रवींद्र विखार, डॉ. दशरथ आदे, प्रा. डॉ. गणेश सातपुते, डॉ. पमेश दाणी, डॉ. दीपक बन्सोड, डॉ. गुणवंत वडपल्लीवार डॉ.भास्कर तुपटे, प्रा. तिरुपती बोरकर, प्रा. सुभाष घोंगडे तसेच शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी सहकार्य केले.

समन्वयक – **प्रा. डॉ. संजय महाजन**

# सहल विभाग



5-day geological study tour for students taken out

The students visiting the geological sites.

■ District Correspondent

**पदवी** शिक्षण घेत असताना फक्त महाविद्यालयाच्या परिसरात राहून विषयाचे सर्वांगीण पैलू, विषयाची व्याप्ती, विषयाच्या रोजगार संधी, विषयाची व्यावसायिक उपलब्धता इत्यादी बाबींवर जागतिक स्तरावर ज्ञान प्राप्त करण्याकरिता फक्त महाविद्यालयात राहून तासिका आणि प्रात्यक्षिकातून पूर्ण होणे शक्य नाही त्यामुळे श्री गोविंदराव मुनघाटे कला व विज्ञान महाविद्यालय कुरखेडा आणि संत गाडगेबाबा विद्यापीठ अमरावती अंतर्गत भूगर्भशास्त्र विभाग यांच्या संयुक्त आयोजनात पाच दिवसीय भूविज्ञान अभ्यास सहलीचे आयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजाभाऊ मुनघाटे यांच्या मार्गदर्शनात पार पडले. या अभ्यासात विद्यार्थ्यांनी खनिज उत्पत्ती आणि उत्खनन या विषयावर ज्ञान प्राप्त केले.

सदर क्षेत्र भेटी दरम्यान सौंसर ग्रुप ऑफ रॉक्स, साकोली फोल्ड बेल्ट, खुर्शीपार लोहखनिज साठा, नवरगाव चोवा कायनाईट खान, चिरचारड बंद मेटामोरफिक्स सोबतच इटियाडोह डॅम ची इंजिनिअरिंग जिओलॉजी, खंडेश्वर लोहसाठा, साकोली ग्रुप ऑफ रॉक्स, आमगाव नायसिक कॉम्प्लेक्स आधी विविध ठिकाणी जाऊन खनिज भूगर्भ शास्त्रीयअभ्यास केला. यावेळी भूगर्भशास्त्र विभागप्रमुख डॉ. वाई. ए. मावळे, संत गाडगेबाबा विद्यापीठ अमरावती, डॉ. गुणवंत गणपती वडपल्लीवार, भूगर्भशास्त्र विभाग प्रमुख मुनघाटे महाविद्यालय, कुरखेडा, श्री विजयानंद कोलवते, श्री उत्तम खराबे, खान व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य खनिकर्म विभाग, इटियाडोह प्रकल्पाचे अभियंता श्री. गिरीपुंजे सर इत्यादी मार्गदर्शकांनी प्रत्यक्ष भेट देऊन भूगर्भशास्त्रातील विविध बाबी उलगडून दाखविल्या. या अभ्यास दौऱ्यात ५० हून अधिक विद्यार्थी उपस्थित होते. पर्यावरणाचे दगडावर होणारे विविध परिणाम, धरणांसाठी क्षेत्र निवड उत्खनन प्रक्रियेचे वैज्ञानिक घटक, अशा विविध विषयावर मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांपुढे पर्यावरण संरक्षण व खनिज संवर्धन हे मोठे आव्हान आहे असे सांगितले. स्थानिक परिसरातील भूशास्त्रीय माहिती असावी याकरिता विभागाद्वारे महाविद्यालयाच्या परिसरातील आणि तालुक्यात लघु स्तरावर अभ्यास सहल सुद्धा घेण्यात आली. यामध्ये महाविद्यालयातील विज्ञान शाखेतील तीनही वर्षातील विद्यार्थ्यांचा सहभाग होता. ज्यामध्ये विद्यार्थ्यांना अरततोंडी महादेवगड येथे डोंगरगड ग्रॅनाईट खडकाची उत्पत्ती यावर सविस्तर असे मार्गदर्शन करण्यात आले, त्यासोबतच तालुक्यालगत असलेल्या वडसा देसाईगंज येथील दगडांचा व भूजल, जलधर व भूजल व्यवस्थापन यावर क्षेत्र सर्वेक्षण सुद्धा करण्यात आले. दरम्यान विद्यार्थ्यांनी खनिज दगड व भूजलाचे विविध नमुने कसे घेतले जातात यावर ज्ञान प्राप्त केले सोबतच क्षेत्र सर्वेक्षण दरम्यान नकाशाचे उपयोग व त्याचे ओरिएंटेशन याबाबत अभ्यास केला.

समन्वयक
**डॉ. गुणवंत वडपल्लीवार**



# SCIENCE STUDY FORUM

**चिमणी संवर्धन ● गोविंदराव मुनघाटे महाविद्यालय व वनचेतना फाऊंडेशनचा पुढाकार**

## कुरखेडात राज्यस्तरीय चिमणी गणना उपक्रम

कुरखेडा (ता.प्र.) स्थानिक गोविंदराव मुनघाटे कला व विज्ञान महाविद्यालयाच्या वनस्पतीशास्त्र व प्राणीशास्त्र विभागाद्वारे तसेच वनचेतना फाउंडेशन व महाराष्ट्र पक्षी मित्र संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र राज्यस्तरीय ऑनलाईन चिमणी गणना उपक्रम प्राचार्य डॉ. राजाभाऊ मुनघाटे यांच्या मार्गदर्शनात जागतिक चिमणी दिनानिमित्त सुरु करण्यात आला. चिमण्यांची संख्या कमी होणे अतिशय चिंतनीय बाब आहे. शेतात फवारले



जाणारे हानिकारक रासायनिक खाते व कीटकनाशके तसेच मोबाइल टॉवरच्या विद्युत चुंबकीय लहरीमुळे चिमण्यांच्या वास्तव्याला धोका निर्माण झाला आहे. त्यासाठी नागरिकांनी चिमण्यांच्या संवर्धनासाठी जागरूक राहणे आवश्यक आहे. म्हणूनच गोविंदराव मुनघाटे महाविद्यालयाचे प्राणीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. दीपक बन्सोड व वनस्पतीशास्त्र विभागाच्या डॉ. राखी शंभरकर यांच्या संकल्पनेतून जागतिक चिमणी दिनानिमित्त महाराष्ट्र राज्यस्तरीय ऑनलाईन चिमणी गणना कार्यक्रम हाती घेण्यात आलेला आहे. यात गडचिरोली जिल्ह्यातील कुरखेडा तालुक्यातील विविध गावातील चिमण्याची वस्तीस्थाने, त्यांचे प्रकार, संख्या, दिवसेंदिवस चिमण्यांची होणारी घट व त्यावर परिणाम करणारे घटक या संपूर्ण बाबींचा अभ्यास तसेच चिमण्यांचे संवर्धन होण्याच्या दृष्टीने सदर उपक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे. अधिकाधिक संख्येने या उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

Science study forum organized various student oriented programs & encourage them to participate in various skill oriented programs & competitions during the session.

### Programs & Participation

- **Tree Plantation & QR Coding**

During the session, students of Botany made their valuable contribution towards nature by planting medicinal plants in College medicinal garden & maintain them throughout the year in order to conserve some rare valuable plants in the garden.

Major plant based activities made by students of Botany were making QR Codes of college premise plants. A modern technology based information system that tells Bio- data of plant by scanning the code using mobile phone.

- **National Science Day**

National Science Day is celebrated in India every year on 28th February to commemorate the discovery of the Raman Effect by the renowned Indian physicist Sir C.V. Raman, who was awarded the Nobel Prize in Physics in 1930. The day highlights the importance of science in everyday life and encourages students to engage with scientific learning and innovation. The Program was celebrated in Physics department of college. On the occasion of National Science Day, Various Science Related video clips & Science fiction films shown to the student on LCD Projector.

- **Online Sparrow Counting Venture (state level)**

Keeping the spirit of wild life conservation alive among the students & society, our college organize online sparrow counting venture in collaboration with Vanchetana foundation & Maharashtra birds friend society on the occasion of world sparrow day under the guidance of our principal Dr. R. G. Munghate.

World Sparrow Day is celebrated every year on March 20 to raise awareness about the decline in the population of house sparrows and the need for their conservation.

The objective of this venture is to aware the society about continuous decline the populations of sparrow and its possible causes, To create awareness about the importance of sparrows and biodiversity, To educate people, especially the younger generation, on how they can help in sparrow conservation, To encourage community involvement in building a sparrow-friendly environment.

### Students Achievements

- **Merit students**

This session brings a proud moment for our college. The academic success of merit students reflects their hard work, consistency, and commitment. The college takes pride in celebrating their achievements and aims to continue nurturing such talent through dedicated support and opportunities.

The students of B. Sc. Final year **Mr. Chakradhar Bhoyar** & **Mr. Kunal Kumare** mark their appearance at Eighth & ninth position respectively in general merit list of B. Sc. Gondwana University Gadchiroli.

**Dr. Pramesh A. Dani**
Coordinator
Science study forum

# महाविद्यालयाच्या उपक्रमांची वर्तमानपत्रांनी घेतलेली दखल



राजाभाऊ मुनघाटे यांचे रशियातील परिषदेत मार्गदर्शन

Shri Govindrao Munghate College ties up with SPIC MACAY to establish culture club

७ खेळाडूंची अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेसाठी निवड

कुरखेडा येथील विद्यार्थ्यांना नाटकाचे प्रशिक्षण

Vidyabharti College students hold 'Ek Ped Maa Ke Naam' campaign

मुनघाटे महाविद्यालयात गांधी विचार व संस्कार परीक्षा

मराठी बोलीभाषा ध्वनीसंकलन उपक्रम

मुनघाटे महाविद्यालयाच्या मृदगंध वार्षिकांकास विद्यापीठाचा पुरस्कार

मुनघाटे महाविद्यालयात एड्स जनजागृती

अमरावती विद्यापीठ व मुनघाटे महाविद्यालयाचा संयुक्त अभ्यास दौरा

अरततोंडी येथील यात्रेमध्ये भाषाविषयक जनजागृती

मुनघाटे महाविद्यालयात मतदान जनजागृती

कुरखेडात राज्यस्तरीय चिमणी गणना उपक्रम

Your research should be useful to society, says Dr Munghate

विदर्भ इतिहास परिषद के अध्यक्ष बने प्रा. डा. आदे

गुन्हा घडल्यानंतर कायद्याच्या अज्ञानाला माफी नसते

मुनघाटे महाविद्यालयाच्या सांस्कृतिक महोत्सवाचे बक्षीस वितरण

मुनघाटे महाविद्यालयाच्या मुलींच्या कबड्डी संघाला तृतीय स्थान

मुनघाटे महाविद्यालयाची लक्ष्मी गोंडवानाच्या मिनी गोल्फ चमुचे करणार नेतृत्व

मुनघाटे महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा

रासेयोच्या विभागीय समन्वयकपदी डॉ. वडपल्लीवार

मुनघाटे महाविद्यालयात तंबाखू मुक्तीची शपथ

मुनघाटे महाविद्यालयात गुणवंत पाल्य व सेवानिवृत्त सभासदांचा सत्कार

विद्यार्थ्यांची पर्यावरण भूगर्भशास्त्रज्ञ म्हणून निवड

मुनघाटे महाविद्यालयाचे विद्यार्थी विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत

अहिल्यादेवी होळकर यांच्या विचारातून समाजाला प्रेरणा

मुनघाटे महाविद्यालयात जनजागृती कार्यशाळा

मुनघाटे महाविद्यालयाच्या पाच खेळाडूंची निवड

भावना प्रबंधन कर जीवन समृद्ध बनाएं

मुनघाटे महाविद्यालयाची साधना कांबळे सेट परीक्षा उत्तीर्ण

5-day geological study tour for students taken out

मुनघाटे महाविद्यालयात झाडीपट्टी नाट्य प्रशिक्षण शिबिराचे आयोजन

मुनघाटे महाविद्यालयाचा महेंद्र कचलाम सेट परीक्षा उत्तीर्ण

मुनघाटे महाविद्यालयाच्या 3 खेळाडूंची आंतर विद्यापीठ स्पर्धेसाठी निवड

# महाविद्यालयीन प्राध्यापकांची प्रकाशित ग्रंथसंपदा व गौरवमुद्रा




डॉ. अभय सोळुंके




डॉ. भास्कर तुपटे




डॉ. रवींद्र विखार




डॉ. अभय सोळुंके




डॉ. दीपक बन्सोड




डॉ. दीपक बन्सोड




डॉ. अभय सोळुंके







डॉ. दीपक बन्सोड

# महाविद्यालयीन प्राध्यापकांच्या गौरवमुद्रा


Telangana Council of Higher Education

IAE

Sl.No. : 5310/IN/2025

CERTIFICATE

OF PARTICIPATION

National Level Awareness Program on

Institutional Development Plan (IDP)

For Higher Educational Institutions (HEIs)

This is to certify that the Faculty of M/s **Shri Govindrao Munghate Arts and Science College Kurkheda** has participated in the "**National Level Awareness Program on Institutional Development Plan (IDP) for Higher Education Institutions**" held on 6th March, 2025 through Online, jointly conducted by Telangana Council of Higher Education (TGCHE), and Institute for Academic Excellence (IAE), Hyderabad.

DIRECTOR

CHAIRMAN


GONDWANA UNIVERSITY, GADCHIROLI

National Service Scheme

डॉ. संजय महाजन


Certificate of Registration for a UK Design

Intellectual Property Office

डॉ. गुणवंत वडपल्लीवार


GONDWANA UNIVERSITY GADCHIROLI

Doctor of Philosophy

डॉ. निकेश लोखंडे


विदर्भ इतिहास परिषद

डॉ. दशरथ आदे


Certificate of Registration for a UK Design

Intellectual Property Office

डॉ. दीपक बन्सोड


GONDWANA UNIVERSITY, GADCHIROLI

National Service Scheme

डॉ. गुणवंत वडपल्लीवार

# महाविद्यालयाची उप्रमशीलता




पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३००व्या जयंती निमित्त महाविद्यालयातर्फे आयोजन



पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३००व्या जयंती निमित्त सांस्कृतिक कार्यविभाग मुंबई व गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयात आयोजित प्रसंगी मार्गदर्शन करताना प्राचार्य व उपस्थित इतर मान्यवर



पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३००व्या जयंती निमित्त महाविद्यालयात आयोजित कार्यक्रमात डॉ. विजय रैवतकर यांचा सत्कार करताना प्राचार्य आणि मान. सुशील सहारे व उपस्थित इतर



पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३००व्या जयंती निमित्त महाविद्यालयात आयोजित कार्यक्रमात मल्हार नृत्य सादर करताना कलावंत



महाविद्यालयाच्या वार्षिक सांस्कृतिक कला महोत्सवातील फॅशन शोमधील सहभागी विद्यार्थी



महाविद्यालयाच्या वार्षिक सांस्कृतिक कला महोत्सवात आदिवासी लोकनृत्य सादर करताना विद्यार्थी

# महाविद्यालयाची उप्रमशीलता



मौजा येरंडी येथे आयोजित रासेयो विशेष शिबिराच्या उद्‌घाटनप्रसंगी मार्गदर्शन करताना उपविभागीय अधिकारी रणजित यादव (भा.प्र.से.) व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजाभाऊ मुनघाटे



रासेयो विशेष शिबिराच्या समारोपीय कार्यक्रमाप्रसंगी मार्गदर्शन करताना 'आम्ही आमच्या आरोग्यासाठी' संस्थेचे संचालक डॉ. सतिश गोगुलवार व उपस्थित विभागीय समन्वयक प्रा. प्रदीप चापले




रासेयो विशेष शिबिराप्रसंगी आयोजित आरोग्य शिबिरात गावकऱ्यांची वैद्यकीय तपासणी करताना जिल्हा रुग्णालय कुरखेडाची चमू



रासेयो विशेष शिबिराच्या उद्‌घाटनप्रसंगी सुप्रसिद्ध समाजसेविका श्रीमती शुभदाताई देशमुख यांचे स्वागत करताना प्राचार्य डॉ. राजाभाऊ मुनघाटे



रासेयो विशेष शिबिरात जनावरांचे लसीकरण करताना डॉ. मेश्राम, पशुधन विकास अधिकारी



रासेयो विशेष शिबिरात येरंडी येथील शेतकऱ्यांना डिजिटल किसान कार्ड काढून देताना

# महाविद्यालयाची उप्रमशीलता



१५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिनाच्या प्रसंगी प्लेसमेंट सेलच्या माध्यमातून निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करताना प्राचार्य डॉ. राजाभाऊ मुनघाटे, समन्वयक डॉ. गुणवंत वडपल्लीवार व इतर




मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना उपक्रमांतर्गत उद्घाटनप्रसंगी प्राचार्य डॉ. राजाभाऊ मुनघाटे, प्रमुख उपस्थिती तहसिलदार मा. रमेश कुमरे, गटशिक्षणाधिकारी मा. शिवणकर व इतर




रासेयोच्या विशेष शिबिरात संविधान सन्मान रॅलीत महाविद्यायीन विद्यार्थी



उन्नत भारत अभियाना अंतर्गत दत्तक ग्राम धमदीटोला येथे वृक्षारोपण करताना महाविद्यालयाचे विद्यार्थी आणि रासेयोचे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. रवींद्र विखार




रासेयो विभागाद्वारे प्रदूषण मुक्त दिवाळी साजरी करण्याबाबत जाणीव जागृती करताना रासेयो स्वयंसेवक



राष्ट्रीय सांप्रदायिक सद्भावना सप्ताहात ध्वजनिधी देताना शहर विचार मंचचे संयोजक मान. माधवदासजी निरंकारी आणि माजी नगराध्यक्ष मान. रवींद्रजी गोटेफोडे

# महाविद्यालयाची उपक्रमशीलता



आचार्य पदवी संशोधन पूर्व आराखडा सादरीकरणप्रसंगी समितीचे (आर.ए.सी.) अध्यक्ष म्हणून मार्गदर्शन करताना प्राचार्य महोदय




महाविद्यालयाचे वरिष्ठ लिपिक मान. मधुकररावजी बोबाटे यांचा सेवानिवृत्ती प्रसंगी सपत्नीक सत्कार करताना संस्थाध्यक्ष प्राचार्य राजाभाऊ मुनघाटे, उपाध्यक्ष देवाजी पाटील नरुले, संस्थेचे ज्येष्ठ सदस्य डॉ. सुरेश लडके व सदस्य सौरभजी मुनघाटे




सांस्कृतिक विभागाद्वारे आयोजित गीतगायन स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. राजाभाऊ मुनघाटे




स्पर्धा परीक्षा व रोजगार मार्गदर्शन केंद्राद्वारे आयोजित कार्यक्रमात मार्गदर्शन करताना Anacon Pvt. Ltd.चे तज्ज्ञ श्री. श्रीकांत व्यवहारे



संस्थापक अध्यक्ष श्रद्धेय गो. ना. मुनघाटे साहेब यांच्या जयंती निमित्त आयोजित रक्तदान शिबिरात रक्तदान करताना महाविद्यालयाचे विद्यार्थी



रासेयो व रेड रिबन क्लब द्वारा आयोजत एड्स जनजागृतीवर मार्गदर्शन करताना उपप्राचार्य डॉ. अभय साळुंखे व उपजिल्हा रुग्णालयातील श्रीमती साधनाताई कांबळे

# महाविद्यालयाच्या गौरवमुद्रा




महाविद्यालयाच्या तंबाखू नियंत्रण कक्षाद्वारे आयोजित व्यसनमुक्तीची शपथ देताना मा. प्राचार्य राजाभाऊ मुनघाटे व समन्वयक डॉ. रवींद्र विखार



ग्रंथालय (ज्ञानस्रोत) विभागाद्वारे आयोजित दिवाळी अंक प्रदर्शनी पाहणी करताना मा. प्राचार्य डॉ. राजाभाऊ मुनघाटे व प्राध्यापक वृंद




स्कूल कनेक्ट (NEP कनेक्ट) संपर्क अभियाना अंतर्गत मार्गदर्शन करताना साधन व्यक्ती प्रा.डॉ. दीपक बन्सोड



गांधी रिसर्च फाऊंडेशन जळगाव द्वारा आयोजित गांधी विचार संस्कार परीक्षा देताना महाविद्यालयाचे विद्यार्थी



Placement Cell द्वारा आयोजित उपक्रमात विद्यार्थ्यांची मुलाखत घेताना Anacon Pvt. Ltd.चे तज्ज्ञ श्री. श्रीकांत व्यवहारे, श्रीमती अंजू नायक व डॉ. प्रियंका मुजुमदार



महिला अध्ययन केंद्र द्वारा आयोजित उपक्रमात मार्गदर्शन करताना प्राचार्य

# महाविद्यालयाची उप्रमशीलता



‘व्हाईट केन सेफ्टी डे’ अंतर्गत विद्यार्थ्यांकडे मदतनिधी सुपूर्द करताना प्राचार्य




अर्थशास्त्र विभागाद्वारे आयोजित वित्तीय साक्षरता कार्यशाळेत मार्गदर्शन करताना सेबी सल्लागार मा. राजेश पालीवाल, मुंबई



‘हर घर तिरंगा’ आणि ‘एक पेड़ माँ के नाम’ या उपक्रमांतर्गत दत्तक ग्राम धमदी टोला येथे विद्यार्थ्यांनी काढलेली जाणीव जागृती रॅली



राष्ट्रीय सांप्रदायिक सद्भावना सप्ताहात कुरखेडा येथील व्यापारी बांधवांकडून ध्वजनिधी गोळा करताना विद्यार्थी



आय.आय.टी. मद्रास अंतर्गत ‘मराठी ध्वनी उच्चार संकलन’ उपक्रमात आय.आय.टी.चे कौस्तुभ शिरोळकर मार्गदर्शन करताना




रासेयो अंतर्गत आयोजित ‘कायदेविषयक शिक्षण शिबिरात’ मार्गदर्शन करताना पोलीस निरीक्षक मा. वाघ साहेब, मंचावर उपस्थित वरिष्ठ दिवाणी न्यायधीश मा. आर.आर. पाटील व प्राचार्य

# महाविद्यालयाची उप्रमशीलता



भूगर्भशास्त्र विभागाद्वारे आयोजित क्षेत्रभेटी अंतर्गत संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे भूगर्भशास्त्र विभागप्रमुख डॉ. वाय.ए. मावळे व डॉ. गुणवंत वडपल्लीवार विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना



भूगर्भशास्त्र विभागाद्वारे आयोजित क्षेत्रभेटी अंतर्गत विभागप्रमुख डॉ. गुणवंत वडपल्लीवार विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना



गोंडवाना विद्यापीठातर्फे आयोजित शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या क्रीडा स्पर्धे अंतर्गत रनिंग स्पर्धेत प्रथम विजेते महाविद्यालयाचे वरीष्ठ लिपिक श्री. रत्नाकर वासेकर



ज्ञान स्त्रोत केंद्र विभागाद्वारे आयोजित दिवाळी अंकाच्या प्रदर्शनाला आर.जे.व्ही. कॉन्व्हेंटच्या विद्यार्थ्यांनी दिलेली भेट



महात्मा गांधी अध्ययन केंद्राद्वारे आयोजित दत्तक गाव येरंडी येथे ग्राम स्वच्छता अभियान राबविताना महाविद्यालयाचे विद्यार्थी




रासेयो शिबिरात 'गांधीजी व युवक' या विषयावर शिबिरार्थ्यांना मार्गदर्शन करताना इतिहास विभागप्रमुख डॉ. दशरथ आदे व मंचावर उपस्थित प्रमुख वक्ते मराठी विभागप्रमुख डॉ. नरेंद्र आरेकर

# महाविद्यालयाच्या गौरवमुद्रा



गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली द्वारा आयोजित आंतरमहाविद्यालयीन बॉल बॅडमिंटन (मुले) स्पर्धेत सलग दुसऱ्यांदा चॅम्पीयनशीप पटकावणाऱ्या महाविद्यालयाच्या चमूचे अभिनंदन करताना प्राचार्य



गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली द्वारा आयोजित आंतरमहाविद्यालयीन बॉल बॅडमिंटन (मुली) स्पर्धेत तृतीय क्रमांक पटकावणाऱ्या महाविद्यालयाच्या चमूचे अभिनंदन करताना प्राचार्य



महाविद्यालयाच्या वार्षिक क्रीडा महोत्सवा अंतर्गत व्हॉलीबॉल स्पर्धेचे उद्घाटन करताना उपप्राचार्य प्रा. किशोर खोपे, उपप्राचार्य डॉ. अभय साळुंके, शारीरिक शिक्षण विभाग प्रभारी डॉ. दशरथ आदे व इतर



गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली द्वारा आयोजित आंतरमहाविद्यालयीन कबड्डी (मुली) स्पर्धेत तृतीय क्रमांक पटकावणाऱ्या महाविद्यालयाच्या चमूचे अभिनंदन करताना प्राचार्य



अखिल भारतीय आंतर विद्यापीठ मिनी गोल्फ स्पर्धेत गोंडवाना विद्यापीठाच्या चमूचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या कु. लक्ष्मी कोडापे हीचा महाविद्यालयाद्वारे सत्कार




अखिल भारतीय आंतर विद्यापीठ बॉल बॅडमिंटन स्पर्धेत गोंडवाना विद्यापीठाच्या चमूचे प्रतिनिधीत्व करणारे हरीष नन्नावरे, अस्पाक शेख आणि साहिल पेंद्राम




अखिल भारतीय आंतर विद्यापीठ बॉल बॅडमिंटन स्पर्धेत गोंडवाना विद्यापीठाच्या चमूचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या कु. भूमिका वट्टी आणि कु. कल्याणी उईके

# महाविद्यालयाच्या गौरवमुद्रा



गोंडवाना विद्यापीठाद्वारे आयोजित शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या कला व क्रीडा स्पर्धेतील व्हॉलीबॉल चॅम्पीयनशिप पटकाविल्याबद्दल विद्यापीठाचे शारीरिक शिक्षण विभाग संचालिका डॉ. अनिता लोखंडे महाविद्यालयाचा शिक्षकेतर कर्मचारी विजेता संघाचे अभिनंदन करताना



गोंडवाना विद्यापीठाद्वारे आयोजित शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या कला व क्रीडा स्पर्धेतील व्हॉलीबॉल चॅम्पीयनशिप पटकाविल्याबद्दल दण्डकारण्य शिक्षण संस्थेच्या कार्यालयात मा. अध्यक्ष प्राचार्य डॉ. राजाभाऊ मुनघाटे शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या क्रीडा स्पर्धेतील विजेत्या संघाचे गौरव करताना



गोंडवाना विद्यापीठाद्वारे आयोजित शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या कला व क्रीडा स्पर्धेत कर्मचारी रत्नाकरजी वासेकर यांना सर्वोत्कृष्ठ खेळाडूचा पुरस्कार प्रदान करताना मा. प्र-कुलगुरू डॉ. श्रीराम कावळे



गोंडवाना विद्यापीठाद्वारे आयोजित शिक्षक कर्मचाऱ्यांच्या कला व क्रीडा स्पर्धेत मा. प्र-कुलगुरू डॉ. श्रीराम कावळे यांच्या हस्ते बुद्धिबळ स्पर्धेतील पुरस्कार स्वीकारताना उपविजेते प्रा. धनराज लंजे



गोंडवाना विद्यापीठाद्वारे आयोजित शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या कला व क्रीडा स्पर्धेतील व्हॉलीबॉल चॅम्पीयनशिप मा. प्र-कुलगुरू डॉ. श्रीराम कावळे यांच्या हस्ते स्वीकारताना महाविद्यालयाचा शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा संघ



गोंडवाना विद्यापीठाद्वारे आयोजित शिक्षक कर्मचाऱ्यांच्या कला व क्रीडा स्पर्धेत बॅटमिंटन स्पर्धेचे विजेते डॉ. संजय महाजन व डॉ. प्रमेश दाणी मा. प्र-कुलगुरू डॉ. श्रीराम कावळे यांच्या हस्ते पुरस्कार स्वीकारताना

# महाविद्यालयात आयोजित नाट्य-प्रशिक्षण शिबिर



झाडीपट्टी नाट्य-प्रशिक्षण शिबिरात सुप्रसिद्ध कलावंत दिग्दर्शक प्रभाकर आंबोने व वत्सला पोलकमवार, नृत्यदिग्दर्शक सिनेस्टार मीना देशपांडे यांच्या सहप्रशिक्षणार्थी



नाट्य-प्रशिक्षण शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी पद्मश्री डॉ. परशुराम खुणे, प्राचार्य डॉ. राजाभाऊ मुनघाटे व समन्वयक डॉ. गुणवंत वडपल्लीवार



नाट्य-प्रशिक्षणार्थींना प्रमाणपत्र प्रदान सोहळा




नाट्य-प्रशिक्षण शिबिरात सुप्रसिद्ध नाटक लेखक व दिग्दर्शक प्राचार्य डॉ. सदानंद बोरकर व सुप्रसिद्ध नाट्यकलावंत प्रा. डॉ. शेखर डोंगरे मार्गदर्शन करताना



नाट्य-प्रशिक्षणाची फलश्रृती

✤ आमचे प्रेरणास्थान ✤



**श्रद्धेय गो. ना. मुनघाटे**

संस्थापक अध्यक्ष
दंडकारण्य शैक्षणिक व सांस्कृतिक
विकास संशोधन संस्था,
गडचिरोली

## सन्मान

- संचालक संस्था, दंडकारण्य शैक्षणिक व सांस्कृतिक विकास संशोधन संस्था, गडचिरोली राज्यातील सर्वोत्कृष्ट संस्था म्हणून एक लक्ष रुपयांचा विशेष पुरस्कार : १९९८
- महाराष्ट्र शासनाचा आदिवासी सेवा संस्था पुरस्कार : १९९४
- महाविद्यालयास इंटरनॅशनल बिझनेस कौन्सील दिल्ली तर्फे गोल्ड स्टार पुरस्कार : २००१-०२
- राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता पुरस्कार : २००२-२००३
- मृद्‌गंध वार्षिकास गोंडवाना विद्यापीठाचा उत्कृष्ट वार्षिकांक पुरस्कार : २०१३ व २०१५
- महाविद्यालयाच्या प्राचार्यांना गोंडवाना विद्यापीठाचे 'आदर्श प्राचार्य पुरस्कार' : २०१३-१४
- महाविद्यालयाच्या रासेयो विभागास रातुम नागपूर विद्यापीठाचा पुरस्कार
- महाविद्यालयाच्या रासेयो विभागास गोंडवाना विद्यापीठचा पुरस्कार
- उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार : २०१६-१७
- ग्रीन कॉलेज पुरस्कार : २०१६-१७
- महाराष्ट्र शासनाचा राष्ट्रपिता महात्मा गांधी राज्यस्तरीय व्यसनमुक्ती सेवा पुरस्कार : २०१७-१८
- महाविद्यालयाच्या प्राचार्यांना गडचिरोली प्रेस क्लबद्वारे गडचिरोली जिल्हा गौरव पुरस्कार : जानेवारी २०१९
- मृद्‌गंध वार्षिकास गोंडवाना विद्यापीठाचा सलग पाच वर्षे प्रथम पुरस्कार : २०१७-१८, २०१८-१९, २०१९-२०, २०२०-२१, २०२१-२२.
- बेस्ट अंडर ग्रॅज्युएट कॉलेज ऑफ महाराष्ट्र फॉर इण्डस्ट्री इंटरफेस पुरस्कार २०२१
- नवभारत वृत्तपत्र समूहाद्वारा SCHOOL SUMMIT 2022 पुरस्कार
- सकाळ वृत्तपत्र समूहाद्वारा YIN SUMMER YOUTH SUMMIT 2022 पुरस्कार
- Prime Time Global Icon Awards 2023 चा Service Excellence (Tribal Education) of the Year 2022 पुरस्कार
- गोंडवाना विद्यापीठात नॅक मूल्यांकनात उच्च क्रमांकाचे गुण प्राप्त करणारे महाविद्यालय


**श्री गोविंदराव मुनघाटे कला व विज्ञान महाविद्यालय, कुरखेडा, जिल्हा गडचिरोली**
चलभाष : ८९५६२६२२६३, www.sgmunghatecollege.in / e-mail : vidyakurkheda@rediffmail.com


